# रेडक्रॉस भवनचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते लोकार्पण



जळगाव : येथील इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगावचे नूतनीकरण केलेल्या 'रेडक्रॉस भवन' सिव्हिल हॉस्पिटल जवळ, येथे स्थलांतर करण्यात आले आहे. इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगावचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी किशोरराजे निंबाळकर यांचेहस्ते कोनशीला अनावरण करून नुकताच रेडक्रॉस भवनचे लोकार्पण करण्यात आले. पासष्ट वर्षापूर्वी इंडियन रेडक्रॉस सोसायटीची स्थापना १३ जुलै, १९५३ रोजी झाली. १९८० साली रेडक्रॉस अंतर्गत रक्तपेढीची सुरुवात झाली. आता या रेडक्रॉस भवनचे भव्यदिव्य वास्तूत रूपांतर करण्यात आले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत असलेली व गुणवत्तायुक्त रक्तघटक पुरविणारी रेडक्रॉसची ही रक्तपेढी नावारूपाला आलेली आहे, असे उद्‌गार कोनशीला अनावरणप्रसंगी जिल्हाधिकारी तसेच संस्थेचे अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर यांनी काढले.

# नूतनीकरण केलेल्या 'रेडक्रॉस भवन'च्या लोकार्पणासह कोनशीलाचेही अनावरण



रेडक्रॉस भवनाच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित जिल्हाधिकारी किशोर राजेनिंबाळकर, समवेत पदाधिकारी.

**प्रतिनिधी** | जळगाव

इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या जळगाव जिल्हा शाखेने नूतनीकरण केलेल्या 'रेडक्रॉस भवन'चे सिव्हिल हॉस्पिटलजवळ स्थलांतर करण्यात आले आहे. या भवनाच्या कोनशीलाचे इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगावचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी किशोर राजेनिंबाळकर यांचे हस्ते अनावरण करून रेडक्रॉस भवनचे लोकार्पण करण्यात आले.

गेल्या ६५ वर्षापूर्वी १३ जुलै १९५३ रोजी इंडियन रेडक्रॉस सोसायटीची स्थापना झाली. १९८० साली रेडक्रॉस अंतर्गत रक्तपेढीची सुरुवात झाली. आता या रेडक्रॉस भवनचे भव्य दिव्य वास्तूत रुपांतर करण्यात आले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत असलेली व गुणवत्तायुक्त रक्तघटक पुरवणारी रेडक्रॉसची ही रक्तपेढी नावारुपाला आलेली आहे, असे उद्‌गार जिल्हाधिकारी राजेनिंबाळकर यांनी काढले.

या वेळी उपाध्यक्ष गनी मेमन, मानद सचिव विनोद बियाणी, रक्तपेढीचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, कोषाध्यक्ष सतीश चरखा, सहसचिव राजेश यावलकर, सह कोषाध्यक्ष अनिल कांकरिया, कार्यकारिणी सदस्य घन:श्याम महाजन, सुभाष सांखला, डॉ. विजय चौधरी, अनिल शिरसाळे, डॉ. अपर्णा मकासरे, डॉ. पी.बी. जैन, लक्ष्मण तिवारी, डॉ. अनिल चौधरी, महेश सोनगिरे, उज्ज्वला वर्मा, संजय साळुंखे रेडक्रॉसची कार्यकारिणी, पदाधिकारी व कर्मचारी कुटुंबियांसमवेत उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिर 'रेडक्रॉस भवन' येथे आयोजित करून राष्ट्र कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. तिलोत्तम जोशी व वर्षा जोशी यांचे हस्ते वास्तू व सत्यनारायण पूजन करण्यात आले. १ जानेवारीपासून इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या रक्तपेढीचे कार्य रेडक्रॉस भवन येथे कार्यरत झाले आहे.

सकाळ

## अवतीभवती



जळगाव : रेडक्रॉस जळगाव शाखेला जाहीर झालेला दिव्यांग प्रेरणा पुरस्कार राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्या हस्ते स्वीकारताना गनी मेमन, मानद सचिव विनोद बियाणी आदी.

# रेडक्रॉस शाखेला दिव्यांग प्रेरणा पुरस्कार

जळगाव : इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखेला जिल्हा स्तरावरील 'दिव्यांग प्रेरणा पुरस्कार' कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्या हस्ते देण्यात आला. जळगाव इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव अनेक वर्षांपासून जिल्ह्यात विविध समाजोपयोगी उपक्रम राबवीत आहे. मागील वर्षापासून जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र सुरू ठेवण्याची रेडक्रॉसने जबाबदारी घेतली आहे. त्यानुसार अपंगाचे पुनर्वसन व सामाजिक क्षेत्रात अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम शाखेतर्फे केले जात आहे. या कार्याची दाखल घेऊन अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे, यांच्या वतीने प्रजासत्ताक दिनी 'दिव्यांग प्रेरणा पुरस्कार-२०१९' हा रेडक्रॉस सोसायटीच्या जळगाव शाखेला देण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी निंबाळकर, महापालिका आयुक्त चंद्रकांत डांगे उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारताना उपाध्यक्ष गनी मेमन, मानद सचिव विनोद बियाणी, सहसचिव राजेश यावलकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मेंदूतील गाठीवर यशस्वी शस्त्रक्रिया

जळगाव : अकोला जिल्ह्यातील गोरव्हा येथील सतरावर्षीय मुलीच्या मेंदूतील गाठीवर डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात तज्ज्ञांच्या टीमने यशस्वी शस्त्रक्रिया करत तिला जीवदान दिले आहे. या मुलीस मेंदूतील कवटीच्या पायथ्याशी जन्मतःच गाठ झाली होती. वयानुसार ही गाठ वाढून ती नाकात उतरली होती. त्यामुळे या मुलीला श्वास घ्यायला मोठा त्रास होत होता. डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात डॉ. स्वप्नील पाटील व नाक-कान-घसा तज्ज्ञ डॉ. अनुश्री अग्रवाल, डॉ. विक्रांत वझे, डॉ. शहनाज शेख यांनी तपासणी करून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. तज्ज्ञांच्या टीमने कवटी न उघडता दुर्बिणीद्वारे मुलीच्या नाकात उतरलेली गाठ काढण्यात आली. साडेतीन तासांच्या शर्थीच्या प्रयत्नानंतर मुलीवर करण्यात आलेली शस्त्रक्रिया यशस्वी ठरली.

Jalgaon, Main
30/01/2019 Page No. 2



# इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे शहिदांना श्रद्धांजली

जळगाव : काश्मीरमधील पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्याचा निषेध करून आणि शहीद झालेल्या ४४ केंद्रीय राखीव पोलीस फोर्सचे भारतीय जवान यांना इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्यावतीने रेडक्रॉस भवन येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# ‘जनसेवा ईश्वर सेवा’ मानून काम केल्याने लोकांचे प्रेम मिळाले

**प्रतिनिधी** | जळगाव



तत्कालीन जिल्हाधिकारी किशोर राजेनिंबाळकर यांचा सत्कार करताना नूतन जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे, सोबत गनी मेनन

‘जन सेवा ईश्वर सेवा’ मानून काम केल्यानेच मला लोकांचे अधिक प्रेम मिळाल्याच्या भावना इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या शुभचिंतन आणि स्वागत सोहळा व रेडक्रॉसच्या ई-सेतू आधार केंद्राच्या उद्घाटनाप्रसंगी मंत्रालयीन सचिव म्हणून बदली झालेले किशोर राजेनिंबाळकर यांनी व्यक्त केल्या.

राजेनिंबाळकर म्हणाले की, शहरात नवीनच रुजू झालेले नूतन जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे व मी अशा आम्ही दोघांनी मंत्रालयात काम केले आहे. ज्या माणसाला गरिबीची जाण आहे, तोच माणुस चांगले काम करु शकतो. डॉ. ढाकणे हे माझ्यापेक्षा चांगले काम करणारे असल्यामुळे जिल्ह्याचा विकास अधिक होईल, यात शंका नाही. काम करणारा माणूस म्हणून मीच त्यांची शिफारस केली होती, असे राजेनिंबाळकर यांनी सांगितले. या वेळी संगीता राजेनिंबाळकर, प्रसन्नकुमार रेदासनी, सिव्हिल सर्जन नागोजीराव चव्हाण, प्रा. शेखर सोनाळकर, गनी मेनन, अनिल कांकरिया यांनी मनोगत व्यक्त केले. राजेश यावलकर यांनी सूत्रसंचालन केले.

**तुमचा प्रभाव जाणवत नाही ?**

राजेनिंबाळकरांनी जिल्हाधिकारी म्हणून चांगले काम केले आहे. आम्ही मंत्रालयात सोबत काम केले असल्याने मी त्यांना फार पूर्वीपासून ओळखतो. ते पंढरपूरला असताना त्यांनी बडव्यांचे प्रस्थ मोडून काढले होते. जळगावात त्यांनी मोठ्या प्रमाणावर सामाजिक कामात पुढाकार घेतल्याने सर्वसामान्यांत ते प्रसिद्ध झाले. त्यामुळेच की काय मला एका कालच एकाने प्रश्न केला की, तुम्हाला येऊन महिना होत आला पण तुमचा प्रभाव जाणवत नाही? पण ज्याची त्याची काम करण्याची पद्धत वेगळी आहे. मी येथे येण्यास नाखुश होतो; पण मला येथे आणण्यात राजेनिंबाळकरांचा मोठा वाटा असल्याची भावना नूतन जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांनी व्यक्त केली.

# मलेरिया दिनानिमित्त मच्छरदाणी वाटप



जळगाव : जागतिक मलेरिया दिनानिमित्त रेडक्रोस सोसायटीतर्फे रिमांड होम आणि मातोश्री वृद्धाश्रम येथे मच्छरांपासून बचाव होण्यासाठी मच्छरदाणी वाटप करण्यात आली. मच्छरांमुळे मलेरिया किंवा टायफाईड होऊ नये म्हणून रिमांड होममधील मुलामुलींना व वृद्धाश्रमातील आजी व आजोबांना मच्छरदाणी देण्यात आली. यावेळी रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, उपक्रम समिती चेअरमन डॉ. अपर्णा मकासरे, जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा, मातोश्री आनंदाश्रमच्या प्रमुख अनीता कांकरीया व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

रविवारी जळगावात कार्यक्रम घेवून जाणून घेतली माहिती

# रक्ताच्या टंचाईवर मात करण्यासाठी बांगड भावंडांचा राज्यभर जनजागृती दौरा

## रक्ताचे नाते चॅरीटेबल ट्रस्टचा पुढाकार : २ ते १० मे दरम्यान प्रत्येक जिल्ह्याला भेट देवून साधताहेत संवाद

। जळगाव प्रतिनिधी।

उन्हाळ्यात स्व:इच्छेनुसार रक्तदान करणाऱ्यामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये ५० टक्के घट झाली आहे. त्यामुळे रुग्णांना रक्तपेढ्यांमध्ये रक्त उपलब्ध होत नाही, नागरिकांमध्ये रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी तसेच रक्तदान एक चळवळ म्हणून राज्यभरातील रक्तदाते व ब्लड बँका यांचे संघठन व्हावे, यासाठी पुणे येथील रक्ताचे नाते या चॅरीटेबल ट्रस्टतर्फे राज्यभर भेटी देत विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे. याच पार्श्वभूमिवर रविवारी ट्रस्टचे महेश बांगड व त्यांची बहिणी स्नेहल बांगड यांनी जळगावला भेट देवून माहिती जाणून घेत कार्यक्रमातून मार्गदर्शन केले.




पुणे येथील महेश बांगड व त्यांची बहिण स्नेहल बांगड या दोघांकडून विविध शहरात जनजागृती करण्यात येत आहे. रविवारी दोघांनी जळगाव येथील रेडक्रास सोसायटीच्या रक्तपेढीला भेट दिली. तसेच येथे आयोजित कार्यक्रमात दोघांनी रक्तदानाविषयी मार्गदर्शन केले. यावेळी रेडक्रासचे उपाध्यक्ष गणी मेमन, सचिव राजेश यावलकर यांनी दोघांचा सत्कार केला. भावंडांनी शहरातील इतर खाजगी ब्लड बँका, व रेडक्रॉस सोसायटीची भेट घेवून रक्तदात्यांची माहिती घेवून संवाद साधला.

**ब्लड लाईन महाराष्ट्र उपक्रम** - पुणे येथील रक्ताचे नाते चॅरिटेबल ट्रस्टचे महेश बांगड व स्नेहल बांगड यांनी ब्लड लाईन महाराष्ट्र हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत दोघे भाऊ- बहिण महाराष्ट्रातील विविध शहरामध्ये जाऊन तेथील ब्लड बँकांची भेट घेत आहे. तसेच रक्तदान चळवळीची संबंधितांबरोबर संवाद साधत आहे. दि.२ ते १० मे दरम्यान ते राज्यातील २० शहरामध्ये जाऊन जनजागृती करणार आहेत. अद्यापर्यंत सोलापूर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, अकोला या ठिकाणी बांगड भावंडांनी भेटी दिल्या आहेत. रविवारी त्यांनी जळगावात कार्यक्रम घेतला. पुढील टप्प्यात ते औरंगाबाद, जालना, अहमदनगर, शिर्डी, नाशिक, नवी मुंबई, लोणावळा, कराड, इचलकरंजी, कोल्हापूर शहरामधील ब्लड बँकांना भेट देवून जनजागृतीपर कार्यक्रम, रक्तदान शिबीर घेणार आहेत.

### कोणत्याही जिल्ह्यात रक्ताचा तुटवडा पडू नये

» सध्या परिस्थितीत रक्तदान शिबिर घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहे. त्यामुळे ब्लड बँकामध्ये रक्त उपलब्ध नाही, म्हणून रक्तदान शिबिरांची संख्या वाढावी, तसेच राज्यात कोणात्याही रुग्णाला रक्ताचा तुटवडा निर्माण होणार नाही, असा उपक्रमाचा उद्देश असून दौरा सुरु असल्याचेही महेश बांगड, स्नेहल बांगड यांनी बोलतांना सांगितले.

जनशक्ति Mon, 06 May 2019
epaper.ejanshakti.com/c/39305974

# रेडक्रॉसचे सामाजिक कार्य प्रशंसनीय : जिल्हाधिकारी

## जागतिक रेडक्रॉस दिन अन् थेलेसिमिया दिन विविध उपक्रमांनी साजरा

तभा वृत्तसेवा
**जळगाव, ८ मे**

जागतिक रेडक्रॉस दिन आणि थेलेसिमिया दिन रेडक्रॉस सोसायटी येथे साजरा करण्यात आला. रेडक्रॉसच्या सामाजिक कार्याची जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस जिल्हाध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांनी प्रशंसा केली. त्यांच्या हस्ते रेडक्रॉस ध्वजारोहण करण्यात आले.



रेडक्रॉस रक्तपेढी प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुनीता वाघ आणि प्रयोगशाळा सहायक सतीश मराठे यांना २०१८-१९ चा श्रीमती सरला दाते उत्कृष्ट सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांना बोधचिन्ह व धनादेश डॉ. ढाकणे यांचे हस्ते देण्यात आले.

रेडक्रॉसचे संस्थापक सर हेन्री ड्युनांट यांच्या प्रतिमेला यावेळी माल्यार्पण करण्यात आले. प्रसंगी रेडक्रॉस गीत उज्ज्वला वर्मा यांनी सादर केले. दरम्यान, रक्तदाता अपघात विमा पॉलिसीमार्फत रक्तदाते स्व. उमेश वारुळे यांचे वारस त्यांच्या आई वर्षा वारुळे यांना धनादेश देण्यात आला.

ल्युको व नॅट टेस्टेड मशीनरीच्या सहाय्याने रेडक्रॉसतर्फे वेळोवेळी जगातील सर्वोत्कृष्ट गुणवत्तेचे रक्त घटकाचा पुरवठा जळगाव रेडक्रॉसतर्फे करण्यात येतो. रुग्णांची काळजी घेतली जाते, यात रेडक्रॉस पदाधिकारी, कर्मचारी व कार्यकारिणी तत्परतेने काम करतात, असे सांगून डॉ. ढाकणे यांनी शुभेच्छा दिल्या.

थॅलेसीमिया रुग्ण बालमित्र आणि त्यांच्या पालकांसाठी रेडक्रॉस भवन येथे दिवसभर विविध कार्यक्रम घेण्यात आले. त्यात महाराणी लक्ष्मीबाई चित्रपट, विविध मनोरंजनाचे लहान मुलांचे खेळ, त्यांचे मनोगत, कविता व गाणी तसेच नृत्य, सांघिक व बैठे खेळ आदींमध्ये त्यांनी सहभाग घेतला. दुपारी जादूगर अविनाश यांनी जादूचे प्रयोग सादरीकरण केले. थॅलेसीमिया मुलांना प्रोटिनयुक्त ब्रेप्टिनच्या बिस्किट डबे व चॉकलेट देण्यात आले. थॅलेसीमियाच्या लहान मुलांना विविध खेळणी देण्यात आली.

उपाध्यक्ष गनी मेमन, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, राजेश यावलकर, डॉ. अपर्णा मकासरे, विनोद बियाणी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उज्ज्वला वर्मा यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अनेक जणांनी रक्तदान केले आणि सेल्फी पॉइंटवर सेल्फी काढली.

सहकोषाध्यक्ष अनिल कांकरिया, सुभाष सांखला, घनश्याम महाजन, पुष्पा भंडारी, अनिल शिरसाळे, अपर्णा मकासरे, दिलीप चौबे, डॉ. प्रकाश जैन, लक्ष्मण तिवारी, डॉ. अनिल चौधरी, डॉ. जयप्रकाश खडसे, डॉ. एस.बी. सोनवणे, उज्ज्वला वर्मा, महेश सोनगिरे, संजय साळुंखे, टी.आर. जोशी, अनिल भोळे, निशिगंधा बागुल, पुरस्कारार्थी सुनीता वाघ, सतीश मराठे, सीमा शिंदे, मनोज वाणी, सिद्धी पाटील, स्नेहल मालसरे, रवींद्र जाधव, किरण बावस्कर, योगेश पाटील, शीतल शिंपी, दीपा तापडिया, अनुपकुमार आगीवाल व थॅलेसीमिया मुलांचे आई-वडील उपस्थित होते.

लोकमत

## दोन कर्मचाऱ्यांना पुरस्कार : अनेकांचे स्वयंस्फूर्तीने रक्तदान, मनोरंजनपर कार्यक्रम

# रेडक्रॉस व थॅलेसेमिया दिनानिमित्त विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : जागतिक रेडक्रॉस दिन आणि थॅलेसेमिया दिन रेडक्रॉस सोसायटी येथे विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. रेडक्रॉसच्या कार्याची जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉसचे जिल्हाध्यक्ष डॉ. अविनाश ढाकणे यांनी प्रशंसा केली.

डॉ. ढाकणे यांच्याहस्ते यावेळी रेडक्रॉस ध्वजारोहण करण्यात आले. प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुनीता वाघ आणि प्रयोगशाळा सहायक सतीश मराठे यांना २०१८-१९ चा सरला दाते उत्कृष्ट सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

रेडक्रॉसचे संस्थापक सर हेनरी ड्यूनांट यांचा जन्मदिवस रेडक्रॉस दिन साजरा केला जातो. जिल्हाधिकाऱ्यांनी रक्तपेढीची पाहणी केली. दरम्यान रक्तदाता अपघात विमा पॉलिसी योजनेत उमेश संजय वारुळे यांचे वारस त्यांच्या आई वर्षा संजय वारुळे यांना धनादेश देण्यात आला.

उपाध्यक्ष गनी मेमन, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, सहसचिव राजेश यावलकर, डॉ. अपर्णा मकासरे, विनोद बियाणी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन उज्ज्वला वर्मा यांनी केले.

### थॅलेसेमिया रुग्णांसाठी जादूचे प्रयोग

◆ थॅलेसेमिया रुग्ण आणि त्यांच्या पालकांसाठी रेडक्रॉस भवन येथे दिवसभर विविध कार्यक्रम घेण्यात आले. त्यात महाराणी लक्ष्मीबाई चित्रपट, विविध मनोरंजनाचे लहान मुलांचे खेळ, त्यांचे मनोगत, कविता व गाणी तसेच नृत्य, सांघिक व बैठे खेळ इत्यादीमध्ये त्यांनी सहभाग घेतला. दुपारी जादूगार अविनाश यांनी जादूचे प्रयोग सादरीकण केले.

राहुल सुरळकर, उत्कर्ष चौधरी, मोहम्मद रहेमान गवळी, जितेंद्र गणेश मोरे, शेख इमरान शेख आसिफ, सलीम रहेमान गवळी, राहुल चौधरी, विशाल अनिल देवरे, टिने एकनाथ खंबायत, योगेश कन्हैया गवळी, मिलिंद खांबायांत, प्रशांत पाटील, आसिफ मुरशी, केतन प्रमोद शर्मा, विजय वानखेडे यांनी रक्तदान केले.

सचिव विनोद बियाणी, सहकोषाध्यक्ष अनिल कांकरिया, सुभाष सांखला, घनश्याम महाजन, पुष्पा भंडारी, अनिल शिरसाळे, अपण मकासरे, दिलीप चौबे, डॉ. प्रकाश जैन, लक्ष्मण तिवारी, डॉ. अनिल चौधरी, सेवानिवृत्त डीएचओ डॉ जयप्रकाश खडसे, डॉ. एस.बी सोनवणे, महेश सोनगीरे, संजय साळुंखे, टी.आर. जोशी, अनिल भोळे, निशिगंधा बागुल, सीमा शिंदे मनोज वाणी, सिद्धी पाटील स्नेहल मालसरे, रवींद्र जाधव किरण बावस्कर, योगेश पाटील शीतल शिंपी, दीपा तापडिया अनुपकुमार आगीवाल व थॅलेसेमिय मुलांचे आई, वडील उपस्थित होते.

Hello Jalgaon
Page No. 4 May 10, 2019
Powered by: erelego.com

# रेडक्रॉसतर्फे दिव्यांग 'यूडीआयडी' नोंदणी प्रशिक्षण कार्यशाळा

तभा वृत्तसेवा
जळगाव, १३ मे

जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था व इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचालित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र यांच्या सहकार्याने सोमवार, १३ मे रोजी समग्र शिक्षा अभियान अंतर्गत तालुका स्तरावरील विशेष शिक्षकांकरिता दिव्यांग विद्यार्थ्यांचे निदान, प्रमाणिकरण आणि यूडीआयडी नोंदणीविषयक प्रशिक्षण कार्यशाळा रेडक्रॉस भवन येथे झाली.

यावेळी संपूर्ण जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत विशेष शिक्षक व कर्मचारी तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण पाटील, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. कांचन पाटील आदी उपस्थित होते.

दिव्यांग विद्यार्थ्यांची यूडीआयडी कार्डकरिता नोंदणी करताना अनेक अडचणी येत असल्याने त्यांच्या अडचणींचे तज्ज्ञांकडून निराकरण करून जिल्ह्यातील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांचे नोंदणीकरण पूर्ण व्हावे, हा प्रमुख उद्देश या कार्यशाळेचा असल्याचे डीडीआरसीचे नोडल ऑफिसर घनश्याम महाजन यांनी प्रास्ताविकात सांगितले.

दिव्यांग बांधवांच्या सेवेसोबत आपण सर्वांनी आपापल्या तालुक्यात रक्तदान शिबिराचेही आयोजन करावे, असे आवाहन



रेडक्रॉस रक्तपेढीचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी यावेळी केले.

परमेश्वराने आपल्याला सोपविलेली जबाबदारी आपण संपूर्ण प्रयत्नाने पूर्ण करणे आपले कर्तव्यच आहे, सर्वांनी आपापली जबाबदारी पूर्ण करावी, असे मार्गदर्शन रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन यांनी केले. नोंदणी करताना येणाऱ्या अडचणी, रजिस्ट्रेशन करताना अपलोड करावयाचे कागदपत्रे यांची संपूर्ण माहिती, दिव्यांग बांधवांची मानसिकता याविषयी सविस्तर मार्गदर्शन वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण पाटील, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. कांचन पाटील यांनी केले.

कार्यक्रमासाठी शिक्षा समग्र अभियानाचे समन्वयक दत्तू पाटील, डीडीआरसीचे समन्वयक सोपान गणेशकर आणि रेडक्रॉसचे चंद्रकांत पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्ज्वला वर्मा यांनी केले तर आभार दत्तू पाटील यांनी मानले. यातून नक्कीच परिवर्तन होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आल्याने उत्साह संचारलेला दिसून आला.

# विपरीत परिस्थितीतही अभ्यास करून यश संपादन करणे कौतुकास्पद : अपर जिल्हाधिकारी गाडीलकर

जळगाव : इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव आणि जाणीव बहुद्देशीय संस्था सामनेर यांच्या संयुक्त विद्यमाने एचआयव्ही ग्रस्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि शालेय साहित्याचे वाटपाचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. दरम्यान, विपरीत परिस्थितीतही अभ्यास करुन यश संपादन करणे विद्यार्थ्यांची ही बाब कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात जाणीव बहुद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा मनीषा बागुल यांनी सांगितले की, एचआयव्ही ग्रस्त विद्यार्थ्यांना मुख्य शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्या मनातील संकुचितपणा कमी करणे आणि त्यांना शक्य असलेली मदत पुरविणे या प्रमुख उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्या म्हणाल्या.

विद्यार्थ्यांना उद्देशून पुढे बोलतांना अपर जिल्हाधिकारी गोरक्ष गाडीलकर म्हणाले की, अत्यंत विपरीत परिस्थितीतही आपण जे यश संपादन केले ते कौतुकास्पद आहे. अशाच प्रकारे यश संपादन करत रहा आणि काहीही सहकार्य लागल्यास आम्ही सदैव आपल्या पाठीशी आहोत, असे आश्वासन दिले. यावेळी सुधीरकुमार वाघुळदे आणि डॉ. अपर्णा मकासरे यांनी मुलांना आनंदी व आहे त्या परिस्थितीत मनासारखे जगण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच वैशाली कुऱ्हाडे यांनी मुलांशी मनमोकळ्या गप्पा केल्या. इयत्ता दहावीमध्ये उत्कृष्ट गुणांसह पास झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विश्वनाथ आर. पाटील ज्वेलर्सचे मनोज पाटील, माऊली क्लिनिकचे डॉ. धनंजय जाधव, रेडक्रॉसचे मानद सचिव विनोद बियाणी, रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, सहसचिव राजेश यावलकर, कार्यकारिणी सदस्य सुभाष सांखला, कार्यकारिणी सदस्य अनिल शिरसाळे, कार्यकारिणी सदस्य डॉ. अपर्णा मकासरे, प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण तिवारी, स्वप्नील वाघ, निशिगंधा बागूल, जाणीव बहूद्देशीय संस्थेचे सचिव प्रवीण पाटील, लिना पवार हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार रेडक्रॉसच्या जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा यांनी केले.

---

# रेडक्रॉसच्या पुढाकाराने थॅलेसीमिया बालक दत्तक योजनेचा शुभारंभ

जळगाव : शहरातील अग्रोया परिवाराने समाजासमोर एक वेगळा आदर्श ठेवत आजोबांच्या गंधमुक्ती कार्यक्रमात रक्तदान शिबिर ठेवले तसेच आजोबांचा सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत थॅलेसीमिया असलेल्या ५ बालकांना दत्तक घेऊन थॅलेसीमिया बालक दत्तक योजनेची सुरुवात केली.



नातू धिरज अग्रोया यांना हा सेवेचा वारसा पुढे न्यावा असे मनापासून वाटत होते. परिवारातील इतर सर्व सदस्यांनी मिळून रक्तदान शिबिराचे आयोजन करावे, असा असा निर्णय घेतला. लगेचच रेडक्रॉस रक्तपेढीत येऊन जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा यांच्याशी चर्चा केली असता सौ. वर्मा यांनी थॅलेसीमिया बालक दत्तक योजनेची माहिती दिली. थॅलेसीमिया बालकांना प्रत्येक महिन्याला रक्तपिशवी द्यावी लागते आणि या बालकांना नॅट टेस्टेड व ल्युको रिड्यूस्ड रक्त मिळाल्यास या बालकांना रक्त संक्रमणापासून होणाऱ्या आजारापासून वाचविता येणे शक्य होईल तसेच त्यांचे आयुष्य पण वाढेल. परंतु आर्थिक परिस्थितीचा विचार करता सर्व पालकांना ते इच्छा असूनही शक्य होत नाही. आर्थिकदृष्ट्या दुर्बल बालकांना दत्तक घेऊन त्यांना लागणाऱ्या नॅट टेस्टेड व ल्युको रिड्यूस्ड तपासणीचा खर्च उचलून खूप मोठा आधार या बालकांना व त्यांच्या पालकांना देता येऊ शकतो. धिरज अग्रोया व परिवाराला ही संकल्पना मनापासून आवडली. त्यांनी ५ मुलांना दत्तक घेऊन त्यांचा खर्च उचलण्याची तयारी दर्शविली. स्व. हरिरामजी अग्रोया यांच्या गंधमुक्ती कार्यक्रमाप्रसंगी संपूर्ण समाज बांधवांच्या उपस्थितीत धिरज अग्रोया व परिवाराने या योजनेची सुरुवात केली. विश्वनाथ आर.पाटील ज्वेलर्सचे मनोज पाटील यांनीही एका थॅलेसीमियाग्रस्त बालकाला दत्तक घेतले आहे. या प्रसंगी रेडक्रॉस रक्तपेढीचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी संपूर्ण अग्रोया परिवाराचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला व दातृत्वाबद्दल आभार व्यक्त केले. यावेळी होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ.नरेंद्र सोनार, विश्वनाथ आर.पाटील ज्वेलर्सचे मनोज पाटील आणि रेडक्रॉसच्या जनसंपर्क उज्ज्वला वर्मा, अग्रोया परिवारातील नातेवाईक आप्तेष्ट, मित्र व सर्व समाजबांधव उपस्थित होते.

divyamarathi.com
28, Aug | Jalgaon



# पाच थॅलॅसिमिया बालके दत्तक घेऊन अग्रोया परिवाराची आजोबांना श्रद्धांजली

## खर्च उचलल्याने बालकांना मिळाला मोठा आधार

प्रतिनिधी | जळगाव

जळगाव शहरातील अग्रोया परिवाराने आजोबांच्या गंधमुक्ती कार्यक्रमात रक्तदान शिबिर ठेवले. तसेच थॅलॅसिमिया असलेल्या ५ बालकांना दत्तक घेऊन थॅलॅसिमिया बालक दत्तक योजनेची सुरुवात करून आजोबांना अनोखी श्रद्धांजली अर्पण केली.

अग्रोया परिवाराचे हरिराम अग्रोया यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे नातू धीरज यांनी परिवारातील इतर सर्व सदस्यांनी मिळून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी रेडक्रॉस रक्तपेढीच्या जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा यांच्याशी चर्चा केली असता वर्मा यांनी थॅलॅसिमिया बालक दत्तक योजनेची माहिती दिली. विश्वनाथ आर. पाटील ज्वेलर्सचे मनोज पाटील यांनीही एका थॅलॅसिमिया बालकाला दत्तक घेतले आहे. याप्रसंगी रेडक्रॉस रक्तपेढीचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी अग्रोया परिवाराचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला. या वेळी होमिओपॅथीतज्ज्ञ डॉ.नरेंद्र सोनार आदी उपस्थित होते.



अग्रोया परिवाराचा सत्कार करताना डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी व मान्यवर.

## थॅलॅसिमिया बालकांना दर महिन्याला लागते रक्तपिशवी

थॅलॅसिमिया बालकांना प्रत्येक महिन्याला रक्तपिशवी द्यावी लागते. या बालकांना नॅट टेस्टेड व ल्युको रिड्यूस्ड रक्त मिळाल्यास या बालकांना रक्त संक्रमणापासून होणाऱ्या आजारापासून वाचवता येणे शक्य होईल; परंतु आर्थिक परिस्थितीचा विचार करता सर्व पालकांना ते इच्छा असूनही शक्य होत नाही. आर्थिकदृष्ट्या दुर्बल बालकांना दत्तक घेऊन त्यांना लागणाऱ्या नॅट टेस्टेड व ल्युको रिड्यूस्ड तपासणीचा खर्च उचलून खूप मोठा आधार या बालकांना व त्यांच्या पालकांना देता येऊ शकतो. त्यामुळे धीरज अग्रोया व परिवाराला ही संकल्पना मनापासून आवडली. त्यांनी ५ मुलांना दत्तक घेऊन त्यांचा खर्च उचलण्याची तयारी दर्शवली. स्व. हरिराम अग्रोया यांच्या गंधमुक्ती कार्यक्रमप्रसंगी संपूर्ण समाजबांधवांच्या उपस्थितीत धीरज व परिवाराने या योजनेची सुरुवात केली. यावेळी घेतलेल्या रक्तदान शिबिरात अग्रोया परिवारातील ३१ जणांनी रक्तदान केले. या वेळी उपस्थित नागरिकांनी या अभिनव निर्णयाचे स्वागत केले. तसेच या उपक्रमाचा इतरांनी आदर्श घ्यावा असे आवाहन देखील केले.

**लोकमत**

# 'रेडक्रॉस'चे प्रथमोपचार पथक

**जळगाव:** गुरुवारी बाप्पाला निरोप देण्यात येणार आहे. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीत आपत्कालीन परिस्थितीत मदत व प्रथमोपचार सेवा देण्यासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे ५० जणांचे प्रथमोपचार व स्वयंसेवक पथक सज्ज राहणार आहेत.

या पथकात डॉक्टरांचा सुध्दा समावेश असेल. दरम्यान, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे पथक हे मेहरुण तलावावरील गणेश घाट व शहरातील भिलपुरा येथे सेवा प्रदान करणार आहे.

पथकाला संस्थेचे मानद सचिव विनोद बियाणी, चेअरमन आपत्ती व्यवस्थापन सुभाष सांखला व घन:श्याम महाजन व उज्ज्वला वर्मा यांचे मार्गदर्शन असणार आहे. शेवटपर्यंत वैद्यकीय पथक कार्यरत राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

Hello Jalgaon
Page No. 3 Sep 12, 2019
Powered by: erelego.com

रॅलीत १२५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, रक्तदान प्रचाराचा उद्देश

# आटत नसतो कधीच रक्ताचा झरा... दर तीन महिन्यांनी करा रक्तदान !

। जळगाव प्रतिनिधी ।

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव संचलित रक्तपेढीच्यावतीने मंगळवारी जागतिक स्वेच्छा रक्तदान दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांची सायकल रॅली काढण्यात आली. रॅलीत सेंट टेरेसा स्कूल आणि उज्ज्वल स्पाऊटर इंटरनॅशनल स्कूलमधील १२५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.
सकाळी काव्यरत्नावली चौक येथून रॅलीला सुरुवात झाली. रॅलीच्या उद्घाटनप्रसंगी उपाध्यक्ष गनी मेमन, मानद सचिव विनोद बियाणी, कोषाध्यक्ष सतीश चरखा, रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, कार्यकारणी सदस्य जी.टी.महाजन, डॉ.अपर्णा मकासरे, प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण तिवारी, आरोग्य अधिकारी उदय पाटील, महेंद्र पाटील, जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा, शिक्षक शैलेश जाधव आणि पवन सोनार व रेडक्रॉसचे पदाधिकारी उपस्थित होते. ही रॅली काव्यरत्नावली चौक, आकाशवाणी चौक, स्वातंत्र्य चौक, पांडे चौक, रेडक्रॉस भवन, चित्रा चौक, नेहरू चौक, खान्देश सेंट्रल मार्गेमार्गस्थ झाली. रक्तदान प्रचार प्रसार जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत व्हावा, असा त्यामागचा उद्देश आहे. सूत्रसंचालन रेडक्रॉसच्या जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा तर आभार विनोद बियाणी यांनी मानले.

## या घोषवाक्यांनी लक्ष वेधले




**रक्तदान** श्रेष्ठदान, रक्तदान जीवनदान, जात धर्म पंथ कुठला ही भेद मानत नाही रक्तदान, रक्तदान करून वाढवूया आपल्या देह मंदिराची शान, आटत नसतो कधीच रक्ताचा झरा...दर तीन महिन्यांनी रक्तदान करा.. नॅट सुरक्षित रक्ताची मागणी करूया. आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांचे जीवन अधिक सुरक्षित बनवूया.., नॅट प्रमाणित रक्त, सर्वात सुरक्षित रक्त, रक्तदान करके देखिये.. अच्छा लगता है.... कुणाला तरी आयुष्य भेट म्हणून देऊ या...चला रक्तदान करूया.. अशा प्रकारचे रक्तदानाचे स्लोगण लिहिलेले पोस्टर मुलांच्या सायकलवर लावण्यात आले. रॅलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. 'बना ये स्वच्छ सुरक्षित देश, इसलीये प्लास्टीक का करे निषेध', 'पर्यावरण को अगर बचाना है..तो प्लास्टीक को उपयोग मे नाही लाना है', 'सबको आगे आना है, धरती को बचाना है', 'प्लास्टीक मुक्त जीवन, निरोगी आयुष्याला आमंत्रण' 'कहो प्लास्टीक को ना...पर्यावरण को हा.'.. अशा प्रकारचे प्लास्टीक मुक्तिचे स्लोगन लिहिलेले पोस्टर मुलांच्या सायकलवर लावण्यात आले होते.

जनशक्ति Wed, 02 October 2019
epaper.ejanshakti.com/c/44249935

लोकमत

## जैन युवा फाउंडेशनतर्फे शाकाहार रॅली : रेडक्रॉस सोसायटीतर्फे रक्तदान जनजागृती

# रॅलीद्वारे शाकाहार, रक्तदानाचा संदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** शाकाहाराचा प्रचार, प्रसार तसेच रक्तदान व पर्यावरण रक्षणाविषयी जनजागृती करण्यासाठी मंगळवारी सकाळी शहरातून जैन युवा फाउंडेशनच्यावतीने शाकाहार रॅली तर इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्यावतीने जागतिक स्वेच्छा रक्तदान दिन रॅली काढण्यात आली.

**शाकाहाराच्या प्रचार, प्रसार व जनजागृतीसाठी जैन युवा फाउंडेशनतर्फे काढण्यात आलेल्या रॅलीद्वारे 'शाकाहार हाच शुद्ध आहार' आहे असा संदेश देण्यात आला.** शाकाहाराचे महत्त्व दर्शविणाऱ्या देखाव्यांनी लक्ष वेधले. या रॅलीचे गांधी उद्यानात सभेत रुपांतर समारोप करण्यात आला. या ठिकाणी बक्षीस वितरण झाले.

जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे, मनपा आयुक्त डॉ. उदय टेकाळे, संघपती दलुभाऊ जैन, जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष अशोक जैन, अजय ललवाणी, कस्तुरचंद बाफना, माजी महापौर विष्णू भंगाळे यांच्याहस्ते शिवतीर्थ मैदानावर रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली.

यात २५ शाळेतील विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर फलक हातात घेऊन सहभाग नोंदविला. जयगुरूदेव सेवा मंडळ व सुशील बहू मंडळ या संघटनांनीही शाकाहाराचा संदेश दिला. गांधी उद्यानात शाकाहार सभा झाली. यावेळी शाकाहार अभ्यासक तुषार चोथानी यांच्यासह उपस्थितांनी मार्गदर्शन केले. शाकाहार प्रणेते रतनलाल बाफना, फाउंडेशनचे अध्यक्ष दर्शन टाटिया आदी व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन दिलीप गांधी यांनी केले तर सचिव रितेश छोरीया यांनी आभार केले. रॅली व सभेसाठी फाउंडेशनचे कोषाध्यक्ष पियुष संघवी, प्रवीण पगारिया, प्रवीण छाजेड, गीतेश चोरडिया, अल्पेश कोठारी, प्रणव मेहता, रिकेश गांधी, चंद्रशेखर राका, विनय गांधी राहुल बांठीया, पारस कुचेरीया यांनी परिश्रम घेतले.

### रक्तदान व पर्यावरण रक्षणाचा संदेश

इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित रक्तपेढीच्यावतीने जागतिक स्वेच्छा रक्तदान दिनानिमित्त मंगळवारी काढण्यात आलेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या सायकल रॅलीद्वारे विद्यार्थ्यांनी दिला रक्तदान व पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. या रॅलीमध्ये सेंट टेरेसा स्कूल आणि उज्ज्वल स्पाउटर इंटरनॅशनल स्कूलमधील १२५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. काव्यरत्नावली चौक येथून रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे उपाध्यक्ष गनी मेमन, मानद सचिव विनोद बियाणी, कोषाध्यक्ष सतीश चरखा, रक्तपेढीचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, कार्यकारणी सदस्य जी.टी.महाजन, डॉ.अपर्णा मकासरे, प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण तिवारी, जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा, शिक्षक शैलेश जाधव आणि पवन सोनार उपस्थित होते. सूत्रसंचालन उज्ज्वला वर्मा यांनी केले तर विनोद बियाणी यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांकडून रक्तदान, प्लॅस्टिकमुक्तीचे आवाहन

स्वेच्छा रक्तदान दिन रॅलीच्या समारोप प्रसंगी महानगरपालिका आयुक्त डॉ. उदय टेकाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संगितले की, तुम्ही सर्व भावी रक्तदाते आहात. आपल्या रक्तदानामुळे चार रुग्णांना जीवनदान मिळते. आपण रक्तदान करण्यासाठी इतरांना प्रेरित करा. गनी मेमन यांनी 'सिंगल युज' प्लॅस्टिक वापर बंद करण्याबाबत आवाहन केले. डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व संगितले. आरोग्य अधिकारी उदय पाटील, महेंद्र पाटील व रेडक्रॉसचे पदाधिकारी उपस्थित होते. रक्तदान जनजागृती तसेच प्लॅस्टिक मुक्तिविषयीचे फलक विद्यार्थ्यांच्या सायकलवर लावण्यात आले होते.

Hello Jalgaon
Page No. 4 Oct 02, 2019
Powered by: erelego.com

# जळगावात दिव्यांगांतर्फे मतदार जनजागृती



रॅलीच्या उद्घाटनप्रसंगी निवडणूक निरीक्षक डॉ. पार्थसारथी मिश्रा, उपजिल्हा निवडणूक अधिकारी तुकाराम हुलवळे.

**प्रतिनिधी** | जळगाव

विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. बुधवारी सकाळी स्वीप कार्यक्रमांतर्गत शहरात दिव्यांग मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये दिव्यांग मतदारांबरोबर शहरातील विद्यार्थीही सहभागी झाले होते. हातात घोषणा फलक घेऊन मतदान करा, लोकशाही बळकट करा, असा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

निवडणूक निरीक्षक तथा ओडिशाचे गृह विभागाचे अप्पर सचिव डॉ. पार्थसारथी मिश्रा, उपजिल्हा निवडणूक अधिकारी तुकाराम हुलवळे उपस्थित होते. प्रास्ताविक नोडल अधिकारी डॉ. मिलिंद बागुल यांनी केले. डॉ. मिश्रा म्हणाले, भारतीय लोकशाही जगात वेगळेपण जपणारी आणि इतर देशांना दिशादर्शक अशी आहे. लोकशाहीचा हा उत्सव पाच वर्षांनी येत असतो. या उत्सवात प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची असून, मूल्य जोपासणाऱ्या लोकशाही उत्सवात प्रत्येकाने मतदान करणे आवश्यक आहे. ती आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. मुक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष तसेच जिल्हा आयकॉन मुकुंद गोसावी, रेडक्रॉसचे गणी मेमन यांनी मतदानासंदर्भात आवाहन केले. जिल्हा शल्यचिकित्सक नागोजीराव चव्हाण, उपायुक्त अरविंद मोरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी अतुल कुलकर्णी, स्वीप नोडल अधिकारी बी.जे. पाटील, तहसीलदार सुनील समदानी, बाबासाहेब गाढवे, मतदान जागृती करणारी विद्यार्थिनी वेदिका दारकुंडे व अनेक मान्यवर उपस्थित होते. रॅलीत अपंग सेवा मंडळ मूकबधिर विद्यालय, उत्कर्ष मतिमंद विद्यालय, श्रवण विकास मंदिर सावखेडा बुद्रूक, अंध औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मुक्ती फाउंडेशन, दीपस्तंभ मनोबल केंद्रातील विद्यार्थी सहभागी झाले होते. हमाल-मापाडी संघटनेचे अध्यक्ष शेषराव वलकर व गणेश ठाकूर हेही या जनजागृतीपर रॅलीत सहभागी झाले होते.

लोकमत



रेडक्रॉसतर्फे मनपाकडे साबणांचा साठा सुपुर्द करताना रेडक्रॉसचे पदाधिकारी. सोबत महापौर भारती सोनवणे.

# रेडक्रॉसतर्फे मनपाला साबणांचा साठा

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** शहर मनपाच्या आरोग्य आणि स्वच्छता विभागातील अधिकारी, मुकादम, कर्मचाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महापौर भारती सोनवणे यांनी केले होते. महापौरांच्या आवाहनाला प्रतिसाद देत निर्जंतुकीकरणासाठी साबणांचा साठा रेडक्रॉस सोसायटीमार्फत मनपाकडे सुपूर्द केला.

महापौरांच्या आवाहनाला प्रतिसाद देत केमिस्ट असोसिएशन, संपर्क फाउंडेशन, भारत विकास परिषद, रेडक्रॉस यासारख्या अनेक संस्था पुढे येत आहे. शनिवारी देखील जिल्हाधिकारी डॉ.अविनाश ढाकणे, उपजिल्हाधिकारी प्रांताधिकारी दीपमाला चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली साबणांचा साठा महापौरांकडे सुपूर्द केला.यावेळी नगरसेवक कैलास सोनवणे, अतुलसिंग हाडा, मनोज काळे, सहायक आयुक्त पवन पाटील, रेडक्रॉस सोसायटीचे अध्यक्ष गनी मेमन, सचिव विनोद बियाणी, डॉ.प्रसन्नसुमार रेदासनी, सुभाष साखला, उज्ज्वला वर्मा, जळगाव शहर मंडळ अधिकारी योगेश नन्वरे आदी उपस्थित होते.

प्रशासनाकडून देण्यात आलेल्या साबणांच्या साठ्याचे वितरण केले जाणार आहे. त्यात कायम कामगार ४३२, मक्तेदाराचे कामगार ४००, वाहनचालक, हेल्पर २५०, कायम वाहनचालक ६३, व्हक्युम गार्ड ३३, आरोग्य निरीक्षक १९, मुकादम ४० अशा १२२७ कर्मचाऱ्यांना वितरित केले जाणार आहे.

Hello Jalgaon
Page No. 4 Apr 19, 2020
Powered by: erelego.com

TODAY
f SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800780

सकाळ माध्यम समूहाच्या 'ई-पेपर' ग्रुपवरील बातम्यांसाठी वाचकांनी
9130002025
हा क्रमांक सेव्ह करावा आणि व्हॉट्सॲपला जाऊन Hi असा मेसेज पाठवावा. यामुळे वाचक या ग्रुपशी जोडले जातील.
- निवासी संपादक

# 'रेडक्रॉस'ने सुरु केले फिरते रुग्णालय

## दोन दिवसांत 204 जणांची तपासणी : स्थानिक नगरसेवकांची मदत



जळगाव : 'रेडक्रॉस'तर्फे फिरत्या रुग्णालयात रुग्ण तपासणी करताना डॉक्टर.

सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. ४ : 'कोरोना'मुळे ा 'लॉकडाउन' करण्यात आलेले सून, राज्यात संचारबंदी लागू केलेली हे. त्यामुळे अनेक खासगी रुग्णालये आहेत. त्यामुळे शहरातील विविध नगरांतील रुग्ण उपचाराविना घरीच आहेत. त्यावर उपाय म्हणून येथील 'इंडियन रेडक्रॉस सोसायटी'च्या जिल्हा शाखेतर्फे शहरात 'फिरते रेडक्रॉस रुग्णालय' सुरू करण्यात आल्याने अनेक रुग्णांना दिलासा मिळाला आहे. दोन दिवसांत दोनशेवर रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर मोफत औषधोपचारही करण्यात आला.

» विधायक

'कोरोना'च्या भीतीमुळे विविध भागांत, उपनगरांत खासगी रुग्णालये संबंधित डॉक्टरांनी बंद ठेवली आहेत. सद्यःस्थितीत थंडी, ताप, खोकला यावरही प्राथमिक स्तरावर औषधोपचार होत नाहीत. त्यामुळे ही स्थिती लक्षात घेता 'रेडक्रॉस'ने फिरते रुग्णालय म्हणून एक व्हॅनच तयार केली. त्यात दोन डॉक्टर, एक नर्स, तीन स्वयंसेवक असतात. फिरत्या रुग्णालयाची व्हॅन विविध उपनगरांत जाते. तेथे जाण्याअगोदर संबंधित वॉर्डातील नगरसेवकाला संपर्क साधून त्या वॉर्डात फिरते रुग्णालय येणार आहे. ज्यांना गरज आहे त्यांनीच अमुक वेळेत संपर्क साधा. त्यानुसार नगरसेवक वॉर्डात सूचना देतात. फिरत्या रुग्णालयाची व्हॅन आली की रुग्ण अंतरा-अंतराने तपासणीसाठी जातात. अगोदर या रुग्णांचे सॅनिटायझेशन केले जाते. रुग्णांना मास्क लावणे, सतत हात धुण्यास सांगितले जात आहे. सॅनिटराइझ झाल्यानंतर डॉक्टर रुग्णांची तपासणी करून तीन दिवसांची औषधी दिली जात आहे. आतापर्यंत कांचननगर, दिनकरनगर या परिसरात रुग्णांची तपासणी केली. याप्रमाणे विविध भागांत फिरते रुग्णालय नेऊन रुग्णांची तपासणी केली जाईल.



### रुग्णांपर्यंत जाऊन सेवा

संचारबंदीच्या काळात अनेक रुग्णांना घराबाहेर पडणे शक्य नाही. खासगी रुग्णालयेही बंद आहेत. अशा रुग्णांना त्यांच्या परिसरात जाऊन सेवा देण्याची संकल्पना मला सुचली. 'रेडक्रॉस'तर्फे आपण फिरते रुग्णालय करून रुग्णसेवा देऊ शकतो, ही बाब जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांना सांगितली. त्यांनी त्याला होकार देताच फिरते रुग्णालय सुरू करून मोफत औषधांचे वितरणही सुरू करण्यात आले आहे. त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती 'रेडक्रॉस'चे मानद सचिव विनोद बियाणी यांनी 'सकाळ'ला दिली.

**आज या भागात रुग्णालय**

फिरते रुग्णालय आतापर्यंत कांचननगर, गोपाळपुरा, दिनकरनगर, श्रीकृष्णनगरात नेले. उद्या (५ मार्च) निमखेडी, आहुजानगरात, तर सोमवारी (६ मार्च) हरिविठ्ठलनगर, मोहननगरात नेण्यात येणार आहे.

जळगाव प्रतिनिधी

# 'रेडक्रॉस' सोशल मिडियाच्या मदतीला

देशात कोरोनाच्या संसर्गाची व्याप्ती झपाट्याने वाढत असतांना त्याविरोधातील लढाईसुद्धा अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर पोहचली आहे. या लढाईत पत्रकारांची भूमिका खूपच मोलाची आहे. ''रेडक्रॉस'' तर्फे फिरता दवाखाना प्राथमिक आरोग्य तपासणी उपक्रम गेल्या एक महिन्यापासून जळगावच्या विविध क्षेत्रात राबवित आहे

त्याचाच एक भाग आज गोलाणी परिसरातील सर्व प्रिंट, ईलेक्ट्रानिक मिडीयातील पत्रकार, फोटोग्राफर्स, प्रेसमध्ये काम करीत असलेले कर्मचारी यांची रेडक्रॉसच्या तज्ञ व अनुभवी डॉक्टरांकडून प्रत्येकाचे शरीराचे तापमान- हृदयाचे ठोके - रक्तातील ऑक्सिजन संपृक्ततेचे प्रमाण ( ) तपासणी व प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली त्यात एकूण १३१ कर्मचाऱ्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी व मोफत औषधे देण्यात आली. या तपासणी अंतर्गत कोरोना पार्श्वभूमीवर संसर्गाचा पूर्व इतिहास, त्याची शक्यता अत्यंत धोकादायक व प्रतिकूल परीस्थितीत काम करीत असतांना घ्यावयाची काळजी, पथ्ये इ.बाबत समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात आले.



आजपर्यंत रेडक्रॉस च्या फिरत्या दवाखानच्या उपक्रमात ४२७६ रुग्णांची मोफत तापसणी त्यांना मोफत औषधपचारही करण्यात आला आहे. आज चया उपक्रमात दैनिक देशोन्नती, दैनिक पुण्यनगरी, दैनिक सकाळ, दैनिक लोकमत,दैनिक बातमीदार,दैनिक तरुण भारत, दैनिक साईमत तसेच विविध कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. श्री. मिलिंद कुळकर्णी, श्री. राहून रनाळक र,श्री. सचिन जोशी, श्री. अनिल पाटील, श्री. दिनेश दगडकर, श्री. हेमंत पाटील, श्री.प्रदिप गायके. श्री. प्रवीण चोधरी श्री. प्रवीण सपकाळे या सर्वांनी सहकार्य केले.

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणजे पत्रकारिता. कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु झाल्यापासून प्रिंट मिडीया, ईलेक्ट्रानिक मिडीया, फोटोग्राफर्स, दुसऱ्या फळीत काम करणारे कर्मचारी, पेपर्स विक्रेते, वाटप करणारी यंत्रणा अहोरात्र अथकपणे अत्यंत प्रतिकूल परीस्थितीत जीवावर उदार होऊन काम करीत आहेत. कोरोनाच्या जनजागृती पासून ते शासन राबवित असलेल्या अनेकविध शासकीय उपक्रमांची अद्यावत माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याचे महत्वपूर्ण काम पत्रकार करीत आहेत. मिडीया च्या माध्यमातून जनतेपर्यंत अचूक माहीती जात असल्याने कोरोनामुळे निर्माण झालेल्या भितीदायक वातावरणात काही अंशी सहजता आली आहे.त्यांच्या पत्रकारितेमुळे समाजात निर्माण झालेला समन्वय, सामजस्य हे कोरोनाविरूध्दचे युद्ध जिंकणयासाठी निर्णायक ठरत आहे.

लोकशाही
Thu, 30 April 2020
https://www.readwhere.com/read/c/51457956

लोकमत

# वृत्तपत्र विक्रेता मंडळातर्फे आरोग्य तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : जळगाव शहर वृत्तपत्र विक्रेता मंडळ व इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने वृत्तपत्र विक्रेते व वृत्तपत्र वाटप करणाऱ्यांची रविवारी सकाळी गोलाणी मार्केट येथे तपासणी करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश सुरळकर यांनी ही तपासणी केली. यावेळी प्रतिकार शक्ती वाढीसाठी गोळ्याही वाटप करण्यात आल्या.




**वृत्तपत्र विक्री करणाऱ्या बांधवांच्या आरोग्य तपासणीप्रसंगी उपस्थित वृत्तपत्र विक्रेता मंडळाचे व रेडक्रॉस सोसायटीचे पदाधिकारी व मान्यवर.**

तपासणीसाठी रेडक्रॉसचे संचालक राजेश यावलकर, अनिल पाटील, शीतल शिंपी, अन्वर खान, जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा, स्वप्नील वाघ यांनी परिश्रम घेतले. यावेळी वृत्तपत्र विक्रेता मंडळाचे अध्यक्ष विलास वाणी यांनी वृत्तपत्राला हात लावून कोरोना झाला असता तर आम्हीच वृत्तपत्र हातात घेतले नसते. वृत्तपत्राच्या माध्यमातून कोरोना होत नाही. त्यामुळे वाचकांनी कुठल्याही खोट्या अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन वाणी यांनी केले. तसेच वृत्तपत्र वाटप करणाऱ्या मुलांची आम्ही काळजी घेत असल्याचेही वाणी यांनी सांगितले.

विलास वाणी, खान्देश सचिव गोपाळ चौधरी, उपाध्यक्ष नितीन चौधरी, रविंद्र जोशी यांनी तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी विजय कोतकर, महेश सोनार, तुषार चौधरी, हरिष चौधरी, राजेंद्र मराठे, सी.आर. जगताप, आनंद साळी, विकास पोतदार, संजय जोशी, अविनाश चिरमाडे यांच्यासह मोठ्या संख्येने वृत्तपत्र विक्रेते बांधव उपस्थित होते.

Hello Jalgaon
Page No. 2 May 11, 2020
Powered by: erelego.com

## शहरातील ३५० फळ-भाजीपाला विक्रेत्यांची केली आरोग्य तपासणी



भाजीपाला विक्रेत्याची तपासणी करताना डॉक्टर.

**जळगाव** | कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव व रोटरी क्लब जळगाव वेस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांच्या मार्गदर्शनात ३५० फळ व भाजीपाला विक्रेत्यांची संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच त्यांना मास्क व सॅनिटायझरचे देखील वाटप करण्यात आले. आरोग्य तपासणी उपक्रमात असोसिएशनचे डॉ. धनराज चौधरी, डॉ. राहुल सुरळकर, डॉ. अल्ताफ खान यांचे सहकार्य मिळाले. भाजीपाला व फळे विक्री करणाऱ्या गोलाणी मार्केट, सुभाष चौक, गणेश कॉलोनी, सिंधी कॉलनी, बहिणाबाई चौक, ख्वाजामियाँ चौक, बळीरामपेठ, शनिपेठ, कालिका माता चौक, शिवाजी रोड, महाबळ रोड येथील विक्रेत्यांची आरोग्याची तपासणी करण्यात आली.

# मानसशास्त्रीय कौन्सिलिंगसाठी हेल्पलाईन सुरू

## रेडक्रॉस आणि सायकॉलॉजिकल कौन्सिलर्स असोसिएशनचा पुढाकार

**जळगाव** प्रतिनिधी

कोरोना च्या वाढत्या प्रादुर्भावावर मात करण्यासाठी सुरू असलेल्या संचारबंदीचे काळात मानसशास्त्र तज्ज्ञांनी समुपदेशन करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. सद्यस्थितीशी जुळवुन घेतांना ज्यांना अवघड जाऊन निद्रानाश, चिडचिड, बेचैनी,चिंता, नैराश्य किंवा मानसिक दौर्बल्य जाणविते आहे, अश्या व्यक्तिंसाठी विनामूल्य टेली काऊन्सलिंग सेवा उपलब्ध केली आहे.

रेडक्रॉस सोसायटी जळगाव शाखा आणि सायकॉलॉजिकल कौन्सिलर्स असोसिएशन च्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. लॉक डाऊन च्या काळात पहिल्यांदा समुपदेशनाची सेवा देणारा हा उपक्रम होय. समुपदेशक टेली काऊन्सलिंग द्वारे मार्गदर्शन करीत आहे. कोणत्याही अबाल वृद्धास निद्रानाश, चिडचिड, बेचैनी, चिंता किंवा मानसिक दौर्बल्य, नैराश्य जाणवत असेल त्यांनी खास हेल्प लाईन वर सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत केव्हाही हेल्पलाईन नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

समुपदेशनासाठी ९४०३३८२५५०, ७८८८२१५२३१ हे दोन विशेष नंबर्स हेल्पलाईन साठी असुन गरजवंत कोणीही निसंकोच संपर्क करावा. समुपदेशक आणि मानसशास्त्रज्ञ मार्गदर्शन करतील. या बहुउपयोगी कार्यासाठी विणा महाजन, आनंदराव जाधव, मृदुला कुलकर्णी ॲड. अनुराधा वाणी, पियाली पुरोहित, लीना जैन, ऋषीकेश शिंपी, वृषाली व्यवहारे, संगीता संघव, किशोर राजे, शरद अकोले, सुधीर वाघुळदे, विवेक कुलकर्णी, शुभांगी मोहरीर, प्रो.एस पी भावसार, शैलजा पप्पु, चंचल रत्नपारखी, निलिमा मेंडकी, जयश्री देवरे डॉ. बालाजी राऊत, डॉ.प्रतिभा हरणखेडकर, डॉ. राणी त्रिपाठी, डॉ. अपर्णा मकासरे, धनंजय जकातदार, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी हे सर्व समुपदेशक मार्गदर्शन करण्यासाठी तत्पर राहणार आहे. सर्व समाजाचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव शाखा आणि सायकॉलॉजिकल कौन्सिलर्स असोसिएशन जळगाव च्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती एका पत्रकान्वये देण्यात आली. हा उपक्रम राबविण्यासाठी रेडक्रॉस चे आणि सायकॉलॉजी कोन्सिलर्स असोसिएशनचे पदाधिकारी प्रयत्न करीत आहे.

लोकशाही
Wed, 22 April 2020
https://www.readwhere.com/read/c/51197435

# रेडक्रॉस सोसा.तर्फे एमआयडीसी पोलिस स्टेशनला आरोग्य तपासणी

जळगाव : प्रतिनिधी

सध्या कोरोना या विषाणूसोबत वैद्यकीय क्षेत्रातील योद्धा मुकाबला करत आहेत. आपल्याला रुग्णांसोबत लढायचे नसून त्यांच्या आजारासोबत लढायचे असल्याचे आवाहन फोनवर आपण दररोज ऐकत आहोत. याच उद्देशाने शहरातील रेड क्रॉस सोसायटीचे पथक सर्वत्र जावून कोरोनाची तपासणी करत आहेत.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाची तपासणी आज सकाळी करण्यात आली. या प्रसंगी डॉ. राजेश सुरळकर यांच्या अख्त्यारीत



स्वयंसेवक अनिल पाटील, अनवर खान, जनसंपर्क अधिकारी स्वप्नील वाघ असे तपासणीकामी पोलिस स्टेशनला आपल्या व्हॅनसह दाखल झाले. यावेळी पो.नि.विनायक लोकरे, स.पो.नि.हजारे, पोलिस उपनिरिक्षक संदिप पाटील, पोलिस उपनिरिक्षक कोळी, सहायक फौजदार रामकृष्ण पाटील, सहायक फौजदार अतुल वंजारी, महिला पो.कॉ.सपना पाटील यासह एकुण ७२ कर्मचारी वर्गाने तपासणीत सहभाग घेतला.

लोकमत

**१६00 रुग्णांना लाभ** : रेडक्रॉस सोसायटीचा पुढाकार, लक्षणे पाहून केले जातेय रुग्णांना मार्गदर्शन

# संकटसमयी फिरता दवाखाना ठरतोय वरदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर असलेल्या लॉकडाऊन काळात रोजगाराअभावी उदरनिर्वाहाचा बिकट प्रश्न असताना उपचारही कसे घ्यावे या चिंतेत असलेल्या व अनेक दवाखाने बंद असल्याने उपचाराची गैरसोय होत असताना इंडियन रेडक्रॉस सोसायटीचा फिरता दवाखाना रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. १० दिवसात या फिरत्या दवाखान्यामार्फत १६०० रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.

**२ एप्रिलपासून या फिरत्या दवाखान्याला सुरुवात करण्यात आली. १० दिवसात १६०० जणांची तपासणी करण्यात आली आहे.**

**लक्षणे पाहून मार्गदर्शन**

रुग्णाच्या तपासणी दरम्यान त्यांच्यामध्ये जे लक्षणे आढळतात



त्यानुसार त्यांना मार्गदर्शन करण्यात येत असून कोरोना सारखे काही लक्षणे असल्याचे दिसताच कोरोना रुग्णालयात (जिल्हा रुग्णालयात) जाण्याचा सल्ला देण्यात येत आहे. तसेच बाहेर गावाहून आलेल्या व्यक्तींना क्वॉरंटाईनविषयी माहिती देऊन मार्गदर्शन केले जात आहे. सध्या शहरात सर्दी, खोकला, तापाचे रुग्ण असल्याचे आढळून येत आहे.

रेडक्रॉस सोसायटीचे अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष गनी मेमन, सचिव विनोद बियाणी, इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या रक्तपेढीचे चेअरमन डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी आदींनी यासाठी पुढाकार घेतला. तसेच फिरत्या दवाखान्यासोबत डॉ. शंकर सोनवणे, डॉ. ए.एम. चौधरी, डॉ. राजेश सुरडकर, उज्ज्वला वर्मा तसेच स्वयंसेवक सेवा देत आहे.

**विविध भागात तपासणी**

- **या फिरत्या दवाखान्यामार्फत आतापर्यंत कांचननगर, मोहननगर, दिनकर नगर, गोपालपुरा, श्रीकृष्ण नगर, निमखेडी, हरिविठ्ठल नगर, समता नगर, शिवाजी नगर, जोशी कॉलनी, असोदा या ठिकाणी सेवा दिली आहे. या सेवेदरम्यान सुरक्षित अंतराचे पालन करण्यासह सॅनिटायझर, मास्क, रुमालचा वापर करीत इतरांना त्याचे पालन करण्याचे आवाहन केले जात आहे.**

Hello Jalgaon
Page No. 1 Apr 14, 2020
Powered by: erelego.com

लोकमत



जळगावात रेडक्रॉस कम्युनिटी किचनला धान्याची मदत करताना कृती फाउंडेशनचे कार्यकर्ते.

# रेडक्रॉस कम्युनिटी किचनला धान्याची मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : रेडक्रॉसच्यावतीने काही दिवसांपासून सुरू केलेल्या कम्युनिटी किचनला कृती फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी नुकतीच भेट देऊन सात क्विंटल धान्याची मदत करण्यात आली आहे.

यावेळी सात क्विंटर धान्यामध्ये तीनशे किलो गहू, दोनशे किलो तांदुळ, तुरडाळ व तेल यांचा समावेश होता. हे धान्य फाउंडेशनचे जी.टी.महाजन, प्रशांत महाजन, अमित माळी, डॉ.श्रध्दा माळी, सुजित माळी, निखिल ठक्कर यांनी कम्युनिटी किचनचे व्यवस्थापन करणारे व आपत्ती व्यवस्थापन विभागाचे प्रमुख सुभाष सांखला, विनोद बियाणी, सोपान गणेशकर, उज्वला वर्मा यांना सुपूर्द केले.

या उपक्रमाला अनिल मोहिले, वासंती पाटील, उषा रामदास माधुरी भावसार यांचे आर्थिक योगदान लाभले.

Hello Jalgaon
Page No. 2 May 04, 2020
Powered by: erelego.com

**लोकमत**

# सकारात्मकता व सामाजिक बांधिलकीने कोरोनावर करु मात

## आज जागतिक रेडक्रॉस दिन : 'कीप क्लॅपिंग ऑन व्हॉलिंटिअर्स' घोषवाक्याची अनुभूती

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** दीडशे वर्षांपेक्षा जास्त काळापासून जगभरात सेवाकार्य करणाऱ्या रेडक्रॉस सोसायटीचा कार्य गौरव म्हणून साजरा होणाऱ्या जागतिक रेडक्रॉस दिनाचे या वर्षी 'कीप क्लॅपिंग ऑन व्हॉलिंटिअर्स' हे घोषवाक्य आहे.

ज्यासाठी हे घोषवाक्य वापरले जाणार आहे त्या कार्याची अनुभुती खरोखर जळगावातील इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या स्वयंसेवकांमार्फत कोरोनाच्या संकटातही होणाऱ्या सेवाभावातून येत आहे. आपत्ती हे संकट न मानता समाजकार्य करण्यासाठी मिळालेली ती एक संधी आहे या सकारात्मक भावनेने गेल्या दोन महिन्यांपासून हे स्वयंसेवक एकदिलाने व एकजुटीने काम करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या कामातील सांघिक भावना, सकारात्मकता, सेवाव्रत, समाजाप्रती असलेली बांधिलकी यानिमित्ताने समोर येत आहे. यातूनच आपण कोरोनावर हमखास मात करू, असा संदेशही या निमित्ताने दिला जात आहे.

रेडक्रॉसचे आद्य संस्थापक जीन हेन्री ड्युनेंट यांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी ८ मे जगभरात 'वर्ल्ड रेडक्रॉस डे' म्हणून साजरा केला जातो. यावर्षीच्या जागतिक रेडक्रॉस दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे हे शतक महोत्सवी वर्ष आहे.

या वर्षी जागतिक रेडक्रॉस दिनाचे 'कीप क्लॅपिंग ऑन व्हॉलिंटिअर्स' हे घोषवाक्य आहे. कोरोनाच्या संकटाने जगभर थैमान घातले आहे. या आपत्तीचा सामना करण्यासाठी रेडक्रॉस स्वयंसेवक आपल्या जीवाची पर्वा न करता प्राणपणाने अहोरात्र झटताहेत. त्यांच्या या समर्पित कार्याला सलाम करण्यासाठी हा दिवस संपूर्ण जगात साजरा करण्यात येत आहे.

**तहान-भूक हरवून कोरोना लढवय्यांना मदत**

आपत्कालीन परीस्थितीत गरजू रुग्णांना तसेच दिव्यांग, व्यक्ती यांना त्यांच्या मागणीप्रमाणे रक्तपिशवी किंवा औषधी पोहचविणे, फिरत्या दवाखान्यात रुग्णांना उपचारादरम्यान मदत करणे, त्यांना औषधी देणे, विस्थापित, निराधार व गरजू नागरिकांना जेवणाची पाकिटे वाटप करणे, कम्युनिटी किचनमध्ये स्वयंपाक बनविण्यासाठी मदत करणे, भाजी व फळविक्रेत्यांच्या आरोग्य तपासणी कामी वैद्यकीय पथकातील डॉक्टरांना मदत केली जात आहे.

### वर्षभराच्या संकल्पनेचा कोरोना संकटात लाभ

सर्वप्रकारच्या आपत्तींच्यावेळी मुकाबला करण्यासाठी पूर्वप्रशिक्षित स्वयंसेवकांचा एक गट तत्पर असावा यासाठी 'रेडक्रॉस स्वयंसेवकांची' कल्पना गेल्यावर्षी समोर आली. जिल्हा शाखेचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली असे प्रशिक्षित स्वयंसेवक तयार करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष गनी मेमन, मानद सचिव विनोद बियाणी, रक्तपेढीचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, सहसचिव राजेश यावलकर, धनंजय जकातदार व सुभाष सांखला यांनी प्रोत्साहित केले. प्रशिक्षक डॉ. विजय चौधरी, घनश्याम महाजन, डॉ. श्रध्दा माळी, जगदीश पाटील, आर.सी.पाटील, डॉ. श्रेयस महाजन, उज्ज्वला वर्मा, अश्वजीत घरडे, महाराष्ट्र राज्य शाखेचे डॉ. विकास कुरणे यांनी या स्वयंसेवकांना शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारली. आज रेडक्रॉसकडे ७० ते ७५ प्रशिक्षित स्वयंसेवकांचा गट कोणत्याही प्रकारच्या आपत्तीचा सामना करण्यासाठी तत्पर आहे. वर्षभरापूर्वीची ही संकल्पना आता कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

### जनजागृतीसह निराधारांना आधार

कोरोना मुळे भयभीत झालेल्या सामान्य जनतेला धीर देऊन कोरोनाचा सामना करण्यासाठी काय करावे, काय करू नये याबाबत माहिती देऊन ते जनजागृती करीत आहेत. त्यामध्ये सॅनिटायझरच्या वापराचे महत्त्व, हात धुण्याची शास्त्रोक्त पद्धत, मास्कचा वापर व त्याचे व्यवस्थापन, घरात, समाजात किंवा बाहेर वावरताना सुरक्षित अंतर ठेवण्याबाबतची काळजी, कम्युनिटी किचनच्या माध्यमातून निराधार, निराश्रित व गरजू लोकांना जेवणाची पाकिटे पोहचवणे इत्यादी कामे स्वयंस्फूर्तीने करीत आहेत.

### कोरोनाच्या संकटातही ७० टक्के रक्त पुरवठा 'रेडक्रॉस'तर्फे

कोरोनासारख्या या महासंकटातसुद्धा रुग्णांना रक्त घटक सहजरित्या उपलब्ध करून दिले. या जिल्हा शाखेमार्फत गरजू रुग्णांना सुरक्षित व नॅट टेस्टेड रक्ताचा पुरवठा केला जातो. जिल्ह्यातील जवळपास ७० टक्के रक्त पुरवठा हा रेडक्रॉस करीत आहे. जिल्ह्यातील एकही गरजू रुग्ण रक्त मिळण्यापासून वंचित राहणार नाही याची पुरेपूर काळजी व दक्षता घेतली जात आहे.

Hello Jalgaon
Page No. 3 May 08, 2020
Powered by: erelego.com

# रेडक्रॉस सोसायटीतर्फे पोलिस अधीक्षक कार्यालयात पोलिसांची आरोग्य तपासणी





इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे रविवारी जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरात पोलिस कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या वेळी डॉक्टरांनी प्रत्येक कर्मचाऱ्याच्या शरीराचे तापमान, ऑक्सिजनचे प्लस तपासण्यात आले. तसेच आरोग्याचा सल्ला देण्यात आला. या वेळी पोलिस अधीक्षक डॉ. पंजाबराव उगले, गनी मेमन आदी उपस्थित होते.

# आसोदा येथे फिरत्या दवाखान्याद्वारे रुग्ण तपासणी



**जळगाव** | आसोदा येथे रविवारी इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे फिरत्या दवाखान्याद्वारे गावातील ११० गरीब ग रुग्णांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून औषधी वितरीत करण्यात आले. यात प्रामुख्याने सर्दी, खोकला, त यासारख्या आजारांची तपासणी सोसायटीचे डॉ. एस. बी. सोनवणे व पथकाने केली. स्वयंसेवक विनोद लाव भगवान चौधरी, बंटी बारी, प्रेषित पुराणिक यांनी नियोजन केले.

**सेवा :** कुणी करी अन्नदान, कुणी मास्क, सॅनिटायझरचे वितरण, महिला बचतगटाचीही सामाजिक बांधिलकी

# शेकडो हात मदतीसाठी एकत्र येतात, तेव्हा..

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** संकटात तर प्रत्येकजणच सापडला आहे. मात्र जो कुणी थोडातरी सुरक्षित आहे, तो सामाजिक बांधिलकीने कामाला लागला आहे. देश वाचवण्यासाठी अन् कोरोनाला पळवून लावण्यासाठी आपापल्या परिने प्रत्येकजण आपापला वाटा उचलत आहे. यामध्ये महिला बचतगटही मागे नाहीत. ज्यांच्याकडे जे देण्यासारखे आहे, ते तो समाजाला देत आहे. भारतीय संस्कृतीबाबत अनेकवेळा 'निगेटिव्ह' सूर लागतो. पण या संस्कृतीची पाळेमुळे किती घट्ट रुजली आहेत, याचा प्रत्यय 'कोरोना'च्या महासंकटावेळी येत आहे.



वाटप करण्यासाठीच्या किराणा साहित्यासोबत अग्रवाल मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते. त्यावेळी बाळासाहेब नत्रवरे,

## ममुराबादला बचतगटातर्फे मास्क, सॅनिटायझरचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**ममुराबाद, ता. जळगाव :** बचतगटाच्या महिलांकडून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गावात प्रभावी जनजागृती केली जात असतानाच, ग्रामस्थांना नि:शुल्क मास्क तसेच सॅनिटायझरचे वाटप करण्यात आले. नारीशक्ती ग्रामसंघातर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.

नारीशक्ती ग्रामसंघाच्या अध्यक्षा रंजना सोनवणे, सचिव वैशाली चौधरी, लिपिक संगीता पाटील व सीटीसी उज्ज्वला ठाणकर यांच्या संकल्पनेतून कापडी मास्क तयार करण्याचे काम काही दिवसांपासून हाती घेण्यात आले होते. त्यात गुरुपीठ बचतगटाच्या प्रतिभा पाटील, आशा पाटील, अंजना पाटील, मनीषा पाटील तसेच गुरुमाऊली बचतगटाच्या प्रियंका शिंदे, अर्चना मिश्रा, सत्यनिष्ठा बचतगटाच्या कोकीळा पाटील आणि राष्ट्रीय एकात्मता बचतगटाच्या मालती पाटील यांनी योगदान दिले. याशिवाय निंबाची पाने, तुळशीची पाने, कोरपड गर, ग्लिसरीन, डेटॉल, स्पिरीट आणि सुगंधासाठी गुलाबजल यांचा वापर करून महिलांनी अतिशय कमी किमतीत सॅनिटायझरची निर्मिती केली होती.

सरपंच भाग्यश्री मोरे, पोलीस पाटील आशा पाटील, तलाठी विरेंद्र पालवे यांच्या उपस्थितीत भाजीपाला विक्रेत्यांसह ग्रामस्थांना मास्क तसेच सॅनिटायझरचे विनामूल्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी सॅनिटायझर तसेच मास्कच्या वापरासंबंधी प्रात्यक्षिकदेखील दाखविण्यात आले. ग्रामस्थांनी महिलांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. त्याचप्रमाणे घरी सॅनिटायझरच्या सहाय्याने नियमितपणे हात धुणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



ममुराबाद येथील ग्रामस्थांना नारीशक्ती ग्रामसंघातर्फे सॅनिटायझर तसेच मास्कचे वाटप सरपंच भाग्यश्री मोरे, पोलीस पाटील आशा पाटील आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.



**सामाजिक जाणीव** • कम्युनिटी किचन या संकल्पनेला साद देऊन मदतीचा दिला धनादेश

# लॉकडाऊनमध्ये इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या अन्नदान, वैद्यकीय सेवेचा जिल्हाभरातील गरजूंना मिळाला आधार

**प्रतिनिधी** | जळगाव

संपूर्ण जगभरात कोरोनाने थैमान घातले आहे. कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता भारत लॉकडाऊन करण्यात आला आहे. या काळात नागरिकांचे प्रचंड हाल होत आहे. त्यांना मदतीचा हात मिळावा यासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे वैद्यकीय सेवा, अन्नदान, आरोग्य तपासणी आदी उपक्रम राबवत आहे.

कोरोना विरुद्धच्या लढाईत रेडक्रॉस प्रशासन नेटाने उभे आहे. रेडक्रॉसचे पदाधिकारी, स्वयंसेवक, कर्मचारी, डॉक्टर प्रत्येक उपक्रमात आपली सेवाभावी व मानवतावादी भूमिका पार पाडत आहे. दैनंदिन व्यवहारातील सेवाकार्याबरोबरच सामाजिक बांधिलकीच्या व उत्तरदायित्वाच्या भावनेतून रेडक्रॉसचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अनिल चौधरी यांनी रेडक्रॉसच्या 'कम्युनिटी किचन'या संकल्पनेला साद देऊन आर्थिक मदतीचा धनादेश रक्तपेढीचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांच्याकडे सुपुर्द केला आहे. तसेच डॉ. प्रकाश जैन यांनी मुख्यमंत्री साहाय्यता निधीला मदतीचा धनादेश रेडक्रॉसकडे सुपुर्द केला आहे. या प्रसंगी रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, मानद सचिव विनोद बियाणी, रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, आपत्ती समितीचे चेअरमन सुभाष सांखला, उज्ज्वला वर्मा उपस्थित होते.

## फिरता दवाखाना बनला आधार; गावागावात देताहेत सेवा

रेडक्रॉसचे डॉक्टर्स रक्तपेढी, फिरता दवाखाना, फळ व भाजीपाला विक्रेते यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार आदी सेवाकार्याबरोबरच आर्थिक मदत करण्यातही आघाडीवर आहे. लॉकडाऊनच्या काळात रेडक्रॉसचे सदस्य दररोज १२०० गरजू लोकांना फूड पॅकेटचे वाटप करत आहे. यासोबतच रेडक्रॉसतर्फे शहरात फिरता दवाखाना हा उपक्रमदेखील राबवण्यात येत आहे. याद्वारे नागरिकांची तत्काळ आरोग्य तपासणी केली जात आहे.

**४५० हॉकर्सची मोफत तपासणी :** शहरात हॉकर्सला आरोग्याच्या समस्या उद्‌भवू नये यासाठी रेडक्रॉसतर्फे हॉकर्सची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. आतापर्यंत ४५० हॉकर्सची तपासणी झाली असून, दररोज तपासणीचे काम सुरू आहे. याशिवाय सोसायटीद्वारे तत्काळ रक्त देखील उपलब्ध करून दिले जात आहे. संस्थेचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांनी या कामाचे समाधान व्यक्त केले आहे.

लोकमत

# 'कम्युनिटी किचन'च्या माध्यमातून दररोज २५०० जणांचे उदरभरण

## मदतीचा हात : क्षुधाशांतीसह गरजूंना आरोग्यविषयक सुविधा

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : कोरोना संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा युध्दपातळीवर काम करीत असताना यामध्ये अनेक सेवाभावी अशासकीय संस्थादेखील सरसावल्या असून यामध्ये इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्यावतीने कम्युनिटी किचनच्या माध्यमातून २५०० अन्न पाकिटांचे वितरण केले जाते आहे.

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर विविध उपाययोजना केल्या जात आहेत. यामध्ये लॉकडाऊनमुळे अनेकांच्या हाताला काम नसल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच अनेकांना उपचार घेणेदेखील कठीण होत आहे. यासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्यावतीने नागरिकांची आरोग्यविषयक काळजी घेण्यासह त्यांच्या उदरनिर्वाहासाठीदेखील पुढाकार घेण्यात आला आहे.

इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्या डॉ.अविनाश ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासकीय अधिकारी, यंत्रणा तसेच रेडक्रॉस सोसायटीचे पदाधिकारीदेखील युध्दपातळीवर कामाला लागले आहेत. यामध्ये वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यासह स्वयंसेवक ठिकठिकाणी जाऊन अन्न पाकीट वाटप करीत आहेत. आता प्रशासनाच्या निर्देशानुसार व मार्गदर्शनाखाली रेडक्रॉसने कम्युनिटी किचनचा उपक्रम ओसवाल सेवा संघाच्या सहकार्याने सुरु केला आहे. या कम्युनिटी किचनच्या माध्यमातून दररोज दोन्ही वेळेस २५०० अन्न पाकिटांचे वितरण केले जात आहे.

यासाठी प्रांताधिकारी दीपमाला चौरे व तहसीलदार वैशाली हिंगे यांच्या नेतृत्वाखाली रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, सचिव विनोद बियाणी, आपत्ती व्यवस्थापन समितीचे सुभाष सांखला, सहसचीव राजेश यावलकर, रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, कार्यकारिणी सदस्य अनिल कांकरिया, घनश्याम महाजन, धनंजय जकातदार, डॉ. अपर्णा मकासरे, जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा तसेच प्रथमोपचार व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षित स्वयंसेवक ही सेवा अखंडितपणे राबवित आहेत. यासाठी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन विभागाचे कार्यकारिणी सदस्य व नोडल अधिकारी जी.टी.महाजन यांचेही मार्गदर्शन लाभत आहे.

### वाड्या-वस्त्यांवर आरोग्यसेवा



सेवाभावी संस्थांनी तयार केलेल्या अन्न पाकिटांचे निराधार, गरजूंपर्यंत पोहचविण्यासाठी रेडक्रॉसने वाहने उपलब्ध करुन दिली असून स्वयंसेवकांच्या मदतीने ती वाटप केली जात आहे. आतापर्यंत अशाप्रकारच्या हजारो अन्नपाकिटांचे वाटप स्वयंसेवकांनी केले आहे. तसेच फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून विनामूल्य आरोग्य तपासणी करून त्यांना गरजेनुसार मोफत औषधोपचार केले जात आहेत. आता या सेवेची व्याप्ती वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. ढाकणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार शहरालगत असलेल्या वाड्या-वस्त्या, गावे याठिकाणी सुद्धा मागणीनुसार व आवश्यकतेनुसार फिरत्या दवाखान्याची सेवा उपलब्ध करुन दिली जात आहे.

Hello Jalgaon
Page No. 4 Apr 24, 2020
Powered by: erelego.com

# कम्युनिटी किचनसाठी रेडक्रॉसला एक मेट्रिक टन तांदूळ उपलब्ध

## एफसीआयकडून सवलतीच्या योजनेत संस्थांना धान्य उपलब्ध

**प्रतिनिधी** | जळगाव

कोरोना व लॉकडाऊन काळात मदत आणि सहाय्यतेसाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव शाखेला जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांच्या निर्देशाने भारतीय खाद्य निगम यांच्याकडून खुला बाजार विक्री योजनेंतर्गत नुकताच एक मेट्रिक टन तांदूळ सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तातडीच्या उपाययोजनेनुसार कम्युनिटी किचनसाठी भारतीय खाद्य निगमकडून गहू आणि तांदूळ उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी कम्युनिटी किचन अंतर्गत कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, धर्मदाय संस्था यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे विहित प्रस्ताव सादर करावा लागतो. त्यानुसार रेडक्रॉस सोसायटीने सादर केलेल्या प्रस्तावास जिल्हाधिकारी ढाकणे यांनी शिफारस केली. रेडक्रॉस सोसायटीला जळगाव येथील गोदामातून एक मेट्रिक टन तांदूळ उपलब्ध करून देण्यात येत आहे. सद्यःस्थितीत संस्थांसाठी गहू २१ हजार रुपये प्रतिमेट्रिक टन व तांदूळ २२ हजार रुपये प्रतिमेट्रिक टन, असे सवलतीचे दर निश्चित केले आहे.

### जिल्ह्यातील संस्थांनी धान्यासाठी प्रस्ताव सादर करावे

कोराना स्थितीत कम्युनिटी किचन चालवणाऱ्या ज्या संस्थांना भारतीय खाद्य निगमच्या अंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्य हवे असल्यास त्या संस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावा. जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था, धर्मदाय संस्था यांनी शासनाच्या या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांनी केले आहे.

लोकमत

# कोरोनाशी लढणाऱ्यांचा गौरव

## जागतिक रेडक्रॉस दिन साजरा : जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : जागतिक रेडक्रॉस दिनाचे घोषवाक्य असलेल्या 'स्वयंसेवकांसाठी टाळ्या वाजवत रहा' हे प्रत्यक्षात साकारात जळगाव रेडक्रॉस शाखेच्यावतीने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अखंड सेवा देणाऱ्या स्वयंसेवकांना प्रोत्साहन देत त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

रेडक्रॉसचे आद्य संस्थापक सर हेनरी ड्युनेंट यांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी ८ मे जगभरात 'वर्ल्ड रेडक्रॉसडे' म्हणून साजरा केला जातो. यावर्षीच्या जागतिक रेडक्रॉस दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे हे शतक महोत्सवी वर्ष आहे.

**जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांच्याहस्ते रेडक्रॉस ध्वजवंदन करण्यात आले. तसेच सर हेनरी ड्युनेंट यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण आणि दीप प्रज्वालन करण्यात आले.**

या वेळी उपाध्यक्ष गनी मेमन, सचिव विनोद बियाणी, रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, सहसचिव राजेश यावलकर, सुभाष साखला, सह कोषाध्यक्ष अनिल कांकरिया, अनिल शिरसाठ उपस्थित होते.

या वेळी रेडक्रॉसच्या स्वयंसेवकांकडून होत असलेल्या कार्याचे जिल्हाधिकारी डॉ. ढाकणे यांनी कौतुक केले आणि गौरव केला. कोरोनामुळे सर्वांनी सतर्कता पाळणे आवश्यक आहे, काळजी कशी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.



ध्वजारोहण करताना डॉ. अविनाश ढाकणे. सोबत अनिल कांकरिया, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, विनोद बियाणी, गनी मेमन, उज्ज्वला वर्मा.

Hello Jalgaon
Page No. 2 May 09, 2020
Powered by: erelego.com

# जिल्हाभरात ९ लाख ३२ हजार आर्सेनिक अल्बम गोळया तयार

## जिल्हा प्रशासन, रेडक्रॉसतर्फे १२ लाख कुटुंबीयांना मिळणार मोफत औषधी

**प्रतिनिधी** | जळगाव

जळगाव जिल्हा प्रशासन व इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयुष मंत्रालय, केंद्र सरकार यांनी प्रमाणित केलेले होमिओपॅथी आर्सेनिक अल्बम-३० ही औषधी तयार करण्याचे काम सुरु आहे. आतापर्यंत ९ लाख ३२ हजार गोळ्या तयार करण्यात आल्या असल्याची माहिती अपर जिल्हाधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.

रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी हे औषध काम करते. जिल्हा प्रशासन आणि इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्यातर्फे यासाठी जिल्ह्यातील १२ लाख कुटुंबीयांना या



गोळ्यांचे वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. मु. जे. महाविद्यालयातील स्वामी विवेकानंद भवन येथे या गोळ्या तयार करण्याचे काम सुरु आहे. या कामासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थी, कृषी विभाग, प्राथमिक व माध्यमिक शाळेचे शिक्षक, शिक्षण विभाग, सिंचन विभाग अशा वेगवेगळ्या विभागाचे कर्मचारी व नागरिक हे स्वयंसेवक म्हणून काम करत आहे. या गोळ्या बनवण्यासाठी फक्त २ रुपये इतका खर्च येत असून यासाठी निधी जमा करण्यात आला आहे. दररोज किमान ३०० स्वयंसेवक हे १ लाखाहून अधिक बाटल्या पॅकिंग करत आहेत. यातील ७ लाखाहून अधिक गोळ्यांचे वाटप करण्यात आले आहे तर उर्वरित गोळ्या तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. या गोळ्या नागरिकांपर्यंत नि:शुल्क पोहोचवल्या जात आहे. पत्रकार परिषदेस रेडक्रॉस सोसायटीचे उपाध्यक्ष गनी मेमन, डॉ. अपर्णा मकासरे, रक्तपेढीचे चेअरमन नितीन रेदासनी, सचिव विनोद बियाणी, मु. जे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सं. ना. भारंबे, आपत्ती व्यवस्थापनचे चेअरमन सुभाष सांखला उपस्थित होते.

# होमिओपॅथी औषधे वाटप उपक्रम प्रशंसनीय -जिल्हाधिकारी डॉ. ढाकणे यांनी केले रेडक्रॉसचे कौतुक

**जळगाव** प्रतिनिधी

इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या पुढाकाराने लाखो नागरिकांना होमिओपॅथी औषध देण्याचा उपक्रम अभिनंदनीय आणि प्रशंसनीय असल्याचे गौरोवोद्गार जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांनी काल सोमवारी काढले. जिल्हा प्रशासन आणि रेडक्रॉस च्या वतीने राबवला जात असलेल्या या उपक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांनी अल्पबचत भवन सभागृहात भेट देऊन सर्व स्वयंसेवकांचे मनोधैर्य वाढवले, त्यांचे कौतुक केले. आर्सेनिक अल्बम ३० हे प्रत्येक व्यक्तीची प्रतिकारशक्ती वाढवणारे औषध असल्याने ह्या गोळ्यांचा योग्य उपयोग जरूर करावा. असेही डॉ. ढाकणे यांनी सांगितले. पुढील आठवड्यात जळगावातील प्रत्येक



व्यक्तीपर्यंतहीऔषधेपोहचवलीजाणारआहे. यावेळी रेडक्रॉस उपाध्यक्ष गनी मेमन, सचिव विनोद बियाणी, रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, प्रकल्प प्रमुख डॉ. अपर्णा मकासरे, संचालक सुभाष साखला, पी आर ओ स्वप्नील वाघ, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोरक्ष गाडीलकर उपस्थित होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणिरेडक्रॉसचे स्वयंसेवकांनी होमिओपॅथी औषधी तयार करण्यासाठी मदत केली. या कार्यासाठी प्रा दीपक सोनवणे,प्रा योगेश महाले प्रा डॉ मोहिनी उपासने,डॉ योगेश बोरसे , आकाश धनगर, गौरव पाटील, रितेश चौधरी, जयेश साळुंके, संजवनी साळवे, दुर्गदास माळी, रोहन अवचारे, नेहरू युवा केंद्र जळगावचे जिल्हा समन्वयक नरेंद्र डागर, युवक प्रतिनिधी चेतन वाणी, भूषण लाडवंजारी, डॉ.विक्रांत जाधव, उज्ज्वल साळुंखे, शिरीष तायडे, आकाश धनगर, हेमंत मांडोळे, देवेंद्र लाडवंजारी, निवेदिता ताठे, आकाश लाडवंजारी, समाधान बोरसे, संजय बडगुजर, धीरज सोनी, चंद्रकांत इंगळे, दीपक वरणे, वाल्मिक सपकाळे, भूषण कुलकर्णी, नयन तिवारी परिश्रम घेत आहेत.

लोकमत

**राज्यभरातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन :** रुग्णांचे समुपदेशन करणार

# प्लाझ्मा थेरेपीसाठी 'रेडक्रॉस'चा ॲक्शन प्लॅन

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर उपचारासाठी प्लाझ्मा थेरेपी मोठी उपयोगी ठरणार असून यासाठी जळगावातून ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आला आहे. यासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटीने पुढाकार घेतला असून शासनाची मान्यता मिळाली आहे. प्रशासन आणि सामान्य रुग्णालयाकडून कोरोनामुक्त रुग्णांची माहितीही मागविण्यात येत आहे.


**दरम्यान, गरजेच्यावेळी इतर अन्य निकषांची पूर्तता होत असेल तर, अशा रुग्णांना समुपदेशन करुन त्यांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे रेडक्रॉस रक्तपेढीचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी सांगितले.**

राज्यातील तज्ज्ञांच्या संपर्कात राहत रक्तपेढीतील कर्मचाऱ्यांना याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. याअनुषंगाने रेडक्रॉसचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली तसेच आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शननुसार या थेरेपीचा वापर करण्यात येईल. त्यादृष्टीने रेडक्रॉसनचे उपाध्यक्ष गनी मेमन, सचिव विनोद बियाणी, सहसचिव राजेश यावलकर, अनिल कांकरीया, कार्यकारीणी सदस्य जी. टी. महाजन व अन्य पदाधिकारी या थेरेपीच्या वापरासाठी नियोजन करीत आहेत. इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे राष्ट्रीय चेअरमन व केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री हर्षवर्धन यांनीही आढावा घेऊन आवाहन केले आहे.

यात प्रत्येक स्वेच्छा रक्तदात्याची हिस्ट्री तपासून रॅपीड टेस्ट करून रक्तदानाची मान्यता दिली जाईल. रॅपीड टेस्ट पॉझिटिव्ह असेल तर, रक्तदात्याला व आरोग्य विभागाला कळविले जाईल. जर ॲंटिजन चाचणी अहवाल निगेटिव्ह असेल तर तो पुढील उपचारासाठी जॅकपॉट असेल, असा रक्तदाता संजीवनी ठरेल, असे डॉ. रेदासनी यांनी सांगितले.

## काय आहे प्लाझ्मा थेरेपी

**इबोला नावाच्या रोगावर उपचार करण्यात आलेली थेरपी कोरोनावरही कामी येईल का? याचा शोध शास्त्रज्ञ घेताहेत. या थेरपीचे नाव 'प्लाझ्मा थेरपी'. या थेरपीनेतुमच्या शरीरात असणारे अँटीबॉडीज वाढवल्या जातात. यामुळे शरीरातील व्हायरसचा प्रभाव कमी होण्यास मदत होते. या अँटीबॉडीज आपल्या रक्तात हा व्हायरस निघून गेल्यानंतरही राहतात.त्यामुळे व्हायरस रुग्णाच्या शरीरात पुन्हा प्रवेश करु शकत नाही. म्हणजेच रुग्णाची रोगप्रतिकारक क्षमता कायम राहते. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या शरीरात व्हायरसचा शिरकाव होतो तेव्हा त्यांच्या शरीरात अँटोबॉडीज तयार होतात. ज्या या व्हायरसचा सामना करतात. प्लाझ्मा थेरेपीमुळे या**



**अँटीबॉडीजमध्ये वाढ होते आणि रुग्णाची रोग प्रतिकारक क्षमता वाढू शकते. कोरोना हा व्हायरस एकमेकांच्या संपर्कात आल्यामुळे शरीरात पसरतो आणि प्लाझ्मा थेरेपीने निर्माण झालेल्या अँटीबॉडीज रुग्णाला या रोगापासून दूर ठेवण्यासाठी मदत करु शकतात.**

Hello Jalgaon
Page No. 4 Apr 27, 2020
Powered by: erelego.com

# रेडक्रॉस रक्तपेढी येथे प्लाझ्मा फेरेसिसचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा

**जळगाव, २९ जून**

इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या रक्तपेढीमध्ये प्लाझ्मा फेरेसिसला सोमवारी प्रारंभ करण्यात आला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबई येथील के.ई.एम. हॉस्पिटल रक्तपेढिमध्ये ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे उद्घाटन केले.

रेडक्रॉस भवन येथील सभागृहात उद्‌घाटन सोहळ्यास पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, रेडक्रॉसचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जप्रकाश रामानंद, प्रा. डॉ. विजय गायकवाड, प्रा.डॉ. भारत तसेच शासकीय रुग्णालय रक्तपेढीचे डॉ. उमेश कोल्हे तसेच रेडक्रॉसचे पदाधिकारी, उपाध्यक्ष गनी मेमन, मानद सचिव विनोद बियाणी, रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, राजेश यावलकर, सहसचिव अनिल कांकरीया, रक्तपेढी सचिव सुभाष सांखला, चेअरमन आपत्ती व्यवस्थापन समिती, डॉ. अपर्णा



मकासरे, प्रकल्प प्रमुख (आर्सेनिक अल्बम ३०), पुष्पा भंडारी, डॉ. विजय चौधरी कार्यकारिणी सदस्य, प्लाझ्माफेरेसीसचे दाते, जिल्हाधिकारी कार्यालयाचे मिलिंद बुवा, रेडक्रॉसचे रक्तसंक्रमण अधिकारी, प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण तिवारी व जनसंपर्क अधिकारी स्वप्निल वाघ उपस्थित होते.

रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी तसेच रक्त संक्रमण अधिकारी, डॉ. अनिल चौधरी, डॉ. अरविंद चौधरी, डॉ. एस.बी. सोनवणे, पर्यविक्षकीय तंत्रज्ञ टी.आर. जोशी, अनिल भोळे व शासकीय रुग्णालय रक्तपेठीचे वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ रोहिणी देवकर, प्लाझ्मा फेरेसिस प्रसंगी उपस्थित होते.

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, संचालित रक्तपेढीत टेरुमो पेनपॉल कंपनीची ट्रिमा मशीन कार्यरत असून सी.डी.एस.सी.ओ. मुंबई व अन्न व औषध प्रशासन नाशिक यांनी प्लाझ्मा फेरेसिस एक अतिरिक्त उत्पादन निर्मितीसाठी मान्यता दिली आहे. या कामी अन्न व औषध प्रशासन, आयुक्त भामरे, जळगावचे सहायक आयुक्त जाधव, वरिष्ठ निरीक्षक मनोज अय्या व कौतीकवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, जळगाव आणि रेडक्रॉस रक्तपेढीसमवेत सामंजस्य करारावर सह्या झालेल्या आहेत.

या सामंजस्य करारानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, जळगाव व रेडक्रॉस रक्तपेढी जळगाव यांच्या सयुंक्त विद्यमानाने संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांचे मार्गदर्शनानुसार संस्थेचे पदाधिकाऱ्यांची गेल्या १५ दिवसांपासून या विषयावर अभ्यास व चर्चा सुरु होती. प्रस्ताविक डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी केले.

**रुग्ण बरे होण्यास होणार मदत**

कोरोनाच्या पार्श्वभूमिवर प्रभावी उपचार करण्याच्या दृष्टिकोनातून प्लाझ्माफेरेसीस थेरपी हे रामबाण सिद्ध होईल. तसेच रुग्ण बरे होण्याच्या प्रमाणात उल्लेखनीय वाढ होईल, अशी आशा पालकमंत्री ना.पाटील यांनी व्यक्त केली.

**लाझ्मा दानसाठी जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन**

कोरोना होऊन बरे झालेल्या व्यक्तींनी स्वतः हुन पुढे येऊन प्लाझ्मा दान करावे, असे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी आवाहन केले.

# दिव्यांग क्षेत्रातील सेवाकार्यासाठी रेडक्रॉसला नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त

**प्रतिनिधी** | जळगाव

दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे विभागाकडून इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव या संस्थेस दिव्यांग क्षेत्रात सेवाकार्य करीत असल्याबद्दल नोंदणी प्रमाणपत्र नुकतेच प्रदान करण्यात आले. त्याची मूळ प्रत सोमवारी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र कार्यालयास प्राप्त झाली.

सन २०१८ पासून रेडक्रॉस या केंद्राचे कार्यान्वयन करीत आहे. त्या आधी या केंद्राचे कामकाज शासनाच्या सामाजिक व न्याय विभागांतर्गत दिव्यांग विकास महामंडळामार्फत चालवण्यात येत होते. पुरेशा आर्थिक पाठबळाअभावी ते बंद होण्याच्या मार्गावर होते. जिल्हाधिकारी हे या पुनर्वसन केंद्राचे तसेच इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे पदसिद्ध अध्यक्ष असल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर यांनी हे केंद्र रेडक्रॉसने चालवावे, अशी संकल्पना मांडली. रेडक्रॉसच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची सूचना मान्य केली. आता हे केंद्र पूर्णपणे रेडक्रॉस कार्यान्वित करीत आहे. दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेकविध योजना राबवण्यात येत आहेत. त्यात स्पिच थेरपी, ऑडिओ मॅट्री, फिजिओथेरपी, समुपदेशन यासारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिवाय सहाय्यभूत उपकरणे यांचे मोफत वाटप, त्यासाठी त्यांचे प्रमाणिकरण करण्यासाठी केंद्र शासनाच्या अॅलिम्कोमार्फत शिबिराचे आयोजन, दिव्यांग व त्यांच्या पालकांना समुपदेशन करणे, दिव्यांग बालकांच्या पुनर्वसनासाठी शीघ्र निदान उपचार केंद्र असे उपक्रम राबवत आहेत. सध्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन कर्णबधिर व्यक्तींकरिता इयर मोल्ड तयार करण्याचे युनिट सुरू करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील आमदार यांच्या स्थानिक विकास निधीतून दिव्यांग व्यक्तींना आवश्यक कृत्रिम अवयव व सहाय्यक उपकरणे मोफत उपलब्ध करण्यात येणार आहेत.

### दीड वर्षांपासून प्रमाणपत्र प्राप्तीसाठी पाठपुरावा

सहा वर्षांआतील दिव्यांग सदृश विकासात्मक बाधा व व्याधी असलेल्या बालकांच्या पुढील विकासाच्या दृष्टीने त्यांच्याकरिता प्री-स्कूल व केयर सेंटर, दृष्टिदोष असणाऱ्या बालकांसाठी लो-व्हिजन सेंटर सुरू करणे, अशा अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रमांचा समावेश आहे. प्रमाणपत्र प्राप्तीसाठी दीड वर्षांपासून पाठपुरावा करण्यात येत होता. केंद्राचे व रेडक्रॉसचे विद्यमान अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांचे योगदान लाभल्याचे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन अधिकारी जी. टी.महाजन यांनी कळवले आहे.

# पोलिस दलाच्या शिबिरामध्ये १२५ पिशव्या रक्तसंकलन



पोलिस दलातर्फे आयोजित शिबिरात रक्तदान करताना पोलिस अधिकारी व कर्मचारी.

**प्रतिनिधी** | जळगाव

कोरोनामुळे शेकडो रुग्णांवर उपचार सुरू आहेत. अशा काळात लोकांना जीवदान देण्यासाठी जिल्हा पोलिस दल व रेडक्रॉस रक्तपेढी यांच्या माध्यमाने मंगळवारी पोलिस मल्टिपर्पज हॉल येथे रक्तदान शिबीर झाले. त्यात १२५ पिशव्या रक्तसंकलन करण्यात आले.

शिबिरात १०७ पोलिस अधिकारी व कर्मचारी तसेच १८ महिला पोलिस अधिकारी व कर्मचारी अशा १२५ जणांनी स्वेच्छेने रक्तदान केले. पालकमंत्री गुलाबराव पाटील, पोलिस अधीक्षक डॉ. पंजाबराव उगले, अप्पर पोलिस अधीक्षक भाग्यश्री नवटके, उपअधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक बापू रोहोम, रेडक्रॉस रक्तपेढीचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, मुकुंद गोसावी, उज्ज्वला वर्मा आदी उपस्थित होते.

**कोरोनाशी लढा** • दोन दात्यांच्या प्लाझ्मा संकलनाने युनिटचे केले उद्‌घाटन

# रेडक्रॉसला २५ बॅग प्लाझ्मा तयार करण्याची परवानगी, सेपरेशनसाठी लागतात ५० मिनिटे

**प्रतिनिधी** | जळगाव

कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या प्लाझ्मा थेरपीसाठीच्या प्लाझ्माफेरेसिस थेरीपी युनिट सोमवारी जळगावात कार्यान्वित झाले. कोरोनामुक्त झालेल्या दोन दात्यांचे प्लाझ्मा संकलित करून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडून व्हीसीद्वारे ऑनलाइनच रेडक्रॉस सोसायटीच्या रक्तपेढीतील या युनिटचा शुभारंभ करण्यात आला. दरम्यान, जळगाव रेडक्रॉसला २५ प्लाझ्मा बॅग संकलित करण्यास परवानगी मिळाली आहे.

मुख्यमंत्री **उर्वरित. पान ४**




## ४००पैकी २८ दाते तयार

प्लामा थेरपीसाठी कोरोनाशी लढा देऊन बरा झालेला सुदृढ दाता अपेक्षित असतो. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातर्फे रेडक्रॉस सोसायटीला ४०० कोरोनामुक्त व्यक्तींची यादी देण्यात आली आहे. त्यांच्याशी संपर्क साधून त्यातील २८ जणांनी प्लाझ्मा दान करण्यास तयारी दर्शवली डक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन यांनी सांगितले.

## प्रक्रियेसाठी लागते १२ हजार रुपयांचे किट

कोरोनामुक्त झालेल्या रुग्णांच्या शरीरातून रक्तदानाप्रमाणे रक्त काढून त्यातून पांढऱ्या पेशी वेगळ्या करून पुन्हा रेड सेल परत दात्याच्या शरीरात सोडले जातात. या कालावधीसाठी सुमारे ५० मिनिटांचा अवधी लागतो. त्यानंतर या पांढऱ्या पेशीवर प्रक्रिया करून ते कोरोनाग्रस्त रुग्णांना रक्ताप्रमाणे देण्यात येतात. याला प्लाझ्मा थेरपी म्हणतात. यासाठी वापरण्यात येणारे किट हे १२ हजार रुपयांचे असते, असे सांगण्यात आले.

## मुख्यमंत्र्यांकडून जळगाव रेडक्रॉसचे कौतुक

मुख्यमंत्र्यांनी राज्यातील २० प्लाझ्मा थेरीपी युनिटचे सोमवारी ऑनलाइन उद्‌घाटन केले. या वेळी मुख्यमंत्री ठाकरे यांनी आपल्या भाषणात जळगाव रेडक्रॉस सोसायटीने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तांत्रिक बाबींची तत्परतेने पूर्तता करून युनिट सुरू केल्याच्या उल्लेख करत कौतुक केले.

लोकमत

## घरकाम करणाऱ्या महिलांना मदत

**जळगाव :** इंडियन रेडक्रॉस सोसायटी तसेच चाईल्ड अँड वूमन्स केयर प्लस यांच्यावतीने घरकाम करणाऱ्या महिलांना हायजेनिक किट्सचे वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी, कार्यकारिणी सदस्या डॉ. अपर्णा मकासरे, चाईल्ड अँड वूमन्स केयर प्लसच्या अध्यक्षा शांता वाणी, जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा उपस्थित होते. सूत्रसंचालन शालिनी पाटील यांनी केले. हेमलता कुलकर्णी, निवेदिता ताठे, समता भावसार, छाया पाटील, उज्वला मावळे, गौरी तरडे, शामल शिंदे, शीला पाटील, रुपाली पवार, राधिका निकम उपस्थित होते.

Hello Jalgaon
Page No. 3 Mar 20, 2022
Powered by: erelego.com

लोकमत


शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित विनोद बियाणी, डॉ. प्रीती खाचणे, डॉ. आदित्य खाचणे, डॉ. जयप्रकाश रामानंद, नितीन चौधरी, वसंत गायकवाड, रवी जोशी, विलास वाणी. दुसऱ्या छायाचित्रात रुग्णाची तपासणी करताना डॉक्टर.

# स्व.जवाहरलालजी दर्डा स्मृतिप्रीत्यर्थ फिजिओथेरपी शिबिराला प्रतिसाद

## लोकमत, खाचणे फिजिओथेरपी सेंटर व रेडक्रॉस सोसायटीचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, 'लोकमत' समूहाचे संस्थापक संपादक स्व. जवाहरलालजी दर्डा उपाख्य बाबुजी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित फिजिओथेरपी शिबिराला प्रतिसाद मिळाला. 'लोकमत' व खाचणे फिजिओथेरपी व रिहॅब सेंटरतर्फे इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या सहकार्याने बुधवार, २ नोव्हेंबर रोजी मोफत फिजिओथेरपी शिबिर घेण्यात आले.


स्व.जवाहरलालजी दर्डा

सिव्हिल हॉस्पिटलजवळील रेडक्रॉस सोसायटीच्या हॉलमध्ये शिबिराचे उद्घाटन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन विनोद बियाणी, खाचणे फिजिओथेरपी व रिहॅब सेंटरचे डॉ. आदित्य खाचणे, डॉ. प्रीती खाचणे, 'लोकमत'चे सहायक महाव्यवस्थापक गौरव रस्तोगी, हॅलो हेड विलास बारी यांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष विलास वाणी, उपाध्यक्ष नितीन चौधरी, सल्लागार रवी जोशी, वसंत गायकवाड यांची उपस्थिती होती.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, 'लोकमत' समूहाचे संस्थापक संपादक स्व. जवाहरलालजी दर्डा उपाख्य बाबुजी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यानिमित्त दर महिन्यात वेगवेगळे समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने नोव्हेंबर महिन्यात फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात खाचणे फिजिओथेरपी व रिहॅब सेंटरचे डॉ. आदित्य खाचणे, डॉ. प्रीती खाचणे यांनी ज्यांना पाठदुखी, मानदुखी, कंबरदुखी, लकवा, फ्रोजन शोल्डर यासारख्या शारीरिक व्याधी आहे, अशा जवळपास ४० लोकांची तपासणी करून त्यांना योग्य मार्गदर्शन केले. या शिबिराबद्दल अनेकांनी समाधान व्यक्त केले.

सूत्रसंचालन सरिता खाचणे यांनी केले तर राहुल अहिरे यांनी आभार मानले.

Hello Jalgaon
Page No. 3 Nov 03, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# जागेची चिंता नाही, फिरत्या व्हॅनमध्ये करा रक्तदान

## लोकार्पण : अत्याधुनिक सुविधायुक्त व्हॅन जळगावात दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** जागेअभावी रक्तदानासाठी येणाऱ्या अडचणीवर आता मात करणे शक्य झाले असून यासाठीची अत्याधुनिक सुविधायुक्त ब्लड डोनर व्हॅन जळगावात दाखल झाली आहे. इंडियन रेडक्रॉस सोसायटीला मिळालेल्या आरामदायी तीन ब्लड डोनर कोचची सुविधा असलेल्या या व्हॅनचे सोमवार, १० ऑक्टोबर रोजी लोकार्पण करण्यात आले.

इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या राष्ट्रीय शाखेच्यावतीने महाराष्ट्रात दोनच शाखांना ही व्हॅन मिळाली असून त्यात मुंबई व जळगावचा समावेश



आहे. सोमवारी तिचे लोकार्पण करण्यात आले.

**वातानुकुलित व्हॅनमध्ये रक्तदानाची सुविधा**

या व्हॅनविषयी माहिती देताना गनी मेमन यांनी सांगितले की, ही व्हॅन संपूर्णपणे वातानुकुलित असून यात आरामदायी तीन ब्लड डोनर कोच, डॉक्टर कॅबिन, टी.व्ही. प्रोजेक्टर, ब्लड कलेक्शन बॉक्स, फ्रीज, कॉफी मशिन, ब्लड डोनेशन कॅम्पच्या वेळी व्हॅनच्या दोन्ही बाजूला शेड लावण्याची व्यवस्था, रक्तदात्यांना बसण्यासाठी टेबल, खुर्ची व जनरेटर संच सहित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केलेली व रक्त संकलनासाठी आवश्यक सर्व सुविधा या व्हॅनमध्ये आहे.

चेअरमन विनोद बियाणी, कार्यकारिणी सदस्य सुभाष सांखला, प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण तिवारी, जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा यांनी रेडक्रॉसच्या कार्याची माहिती दिली.

Jalgaon Main
Page No. 4 Oct 11, 2022
Powered by: erelego.com

लोकशाही

जागतिक महिला दिनानिमित्त

# रेडक्रॉसतर्फे एचआयव्हीग्रस्त महिलांना हायजेनिक किट्सचे वाटप

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव आणि जाणीव बहूउद्देशिय संस्था यांच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून एचआयव्ही बाधित महिला भगिनींना हायजेनिक किट्सचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ.वैशाली कुर्हाडे,



रेडक्रॉसचे चेअरमन श्री.विनोद बियाणी, रक्तपेढी चेअरमन डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी, कार्यकारिणी सदस्या डॉ. अपर्णा मकासरे,कार्यकारिणी सदस्य श्री. अनिल शिरसाळे, जाणीव बहूद्देशीय संस्थेच्या सौ. मनीषाताई बागूल, श्री. प्रवीण पाटील, प्रशासकीय अधिकारी. श्री. लक्ष्मण तिवारी, श्रीमती.शालिनीताई पगारे, सौ. शारदा पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक करताना सौ. मनीषाताई बागूल म्हणाल्या की एचआयव्ही बाधित रुग्णांना बर्याच अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रेडक्रॉससारख्या सामाजिक संस्थांच्या मदतीने सर्व भगिनी आणि बालकांना योग्य ती मदत करणे शक्य होते. डॉ.प्रसन्नकुमार **(पान २ वर)**

Main Edition
17 Mar, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

**देशोन्नती**

### जिल्हाधिकारी यांनी स्वतः रक्तदान करून दिली युवकांना प्रेरणा

# रेडक्रॉसच्या अद्ययावत ब्लड डोनर कोचचे उद्‌घाटन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**जळगाव** ■ रेडक्रॉस राष्ट्रीय शाखा, नवी दिल्ली आणि इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रेडक्रीसेंट यांच्या योगदानाने रेडक्रॉस रक्त केंद्राला देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या अद्ययावत सहा ब्लड डोनर कोच युनिटचा उद्‌घाटन सोहळा आज जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस प्रसिध्द अध्यक्ष अमन मित्तल आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. किरण पाटील यांच्या उत्स्फूर्त रक्तदानाने झाला.

या प्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ.योगिता बाविस्कर, रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, चेअरमन विनोद बियाणी, रक्तकेंद्र चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार



रेदासनी, कार्यकारिणी सदस्य सुभाष सांखला, विजय पाटील, पुष्पा भंडारी, डॉ. अपर्णा मकासरे, शांताताई वाणी हे उपस्थित होते. प्रास्ताविकात रक्तकेंद्र चेअरमन डॉ. रेदासनी यांनी रेडक्रॉस रक्तकेंद्राच्या अद्ययावत तंत्रज्ञानाबद्दल सविस्तर माहिती देत जिल्हाधिकाऱ्यांच्या रक्तदानामुळे रक्तसंकलनाचा आलेख उंचावेल अशी अपेक्षा व्यक्त केली. रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन यांनी रेडक्रॉस जिल्हा शाखेचे कार्य सहकाऱ्यांच्या परिश्रमातून हि सेवा देणे शक्य होत आहे.

जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस पदि्सध्द अध्यक्ष अमन मित्तल यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, जळगाव रेडक्रॉसचे कार्य अतिशय कौतुकास्पद असून अतिशय उत्कृष्ठ सेवाकार्य सुरु आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या अनेक शासकीय योजनांमध्ये रेडक्रॉसचा सहभाग झाल्यास रेडक्रॉस अजून जोमाने कार्य करेल अशी अपेक्षा व्यक्त करीत सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते ब्लड डोनर कोच युनिटचे उद्‌घाटन करण्यात आले. यानंतर जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस प्रसिध्द अध्यक्ष अमन मित्तल आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. किरण पाटील यांनी रक्तदान केले. सोबत रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी, ॲड. सागर चित्रे, प्रा. शमा सराफ, श्यामकांत जगताप, राहुल पाटील यांनी रक्तदान केले. जिल्हाधिकारी मित्तल यांचा स्मृतिचिन्ह देऊन आणि सर्व रक्तदात्यांचा सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा यांनी केले. आभार चेअरमन विनोद बियाणी यांनी व्यक्त केले.

Deshonnati Edition
Dec 31, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

चा

रंभ
वेशनाला
-२०२१
रिषदेच्या
स्वातंत्र्य
दर्शनीचे
या हस्ते
करण्यात
त श्री.
२१ च्या
लोकन
जोशी,
पाटील
ब्रुवारी
२६ वे
गरांत
विविध
आणि



जळगाव : मधुकर नेवे यांच्या तेराव्यानिमित्त झालेल्या रक्तदान शिबिरात अभिजित राऊत, विजय नेवे, प्रकाश नेवे, विनय नेवे, हरीश नेवे, डॉ. धर्मेंद्र पाटील, डॉ. नरेंद्र ठाकूर, आरती शिंपी, सुश्मिता भालेराव आदी.

# जळगावात तेराव्याऐवजी रक्तदान शिबिर

## नेवे परिवाराने निर्माण केला समाजापुढे आदर्श

**सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. ११ : शहरातील टेलिफोननगर येथील रहिवासी आणि ज्येष्ठ साहित्यिक मधुकर नेवे यांचे नुकतेच निधन झाले होते, त्यांचे शुक्रवारी तेरावे होते.

मधुकर नेवे यांनी नेहमीच समाजसेवेला प्राधान्य दिले होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांनीही त्यांचा हा वारसा जपत मृत्यूनंतर करण्यात येणारे विधी संस्कार हे अतिशय साधेपणाने घरच्या घरी केले तसेच तेराव्याचा कार्यक्रम टाळून त्या ऐवजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

जळगाव शहरातील रेडक्रॉस या ठिकाणी आयोजित कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्या हस्ते झाला. नेवे परिवारात एकाच महिन्यात मधुकर नेवे, नलिनी नेवे यांचा मृत्यू झाल्याने परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला असताना रक्तदान करून रुग्णांचे प्राण वाचवून आपल्या वाड-वडिलांच्या आत्म्याला शांती मिळावी या उद्देशाने त्यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांचा सत्कार चंद्रशेखर नेवे यांनी केला.

यावेळी विजय नेवे, प्रकाश नेवे, विनय नेवे, हरीश नेवे, आर्या फाऊंडेशनचे डॉ. धर्मेंद्र पाटील, डॉ. नरेंद्र ठाकूर, कला सिद्दी फाऊंडेशनच्या आरती शिंपी, जिंदगी फाऊंडेशनचे सुश्मिता भालेराव, अजय पाटील, दिपाली कासार, सुमोल चौधरी, आनंद मलारा, निखिल, सूमोल चौधरी, भावेश पाटील, सतीश पाटील, सोहम मोरे, संघपाल तायडे, अमोल सोनार, शुभम चव्हाण आदींसह अनेकांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उजवला वर्मा, डॉ. अपर्णा मकासरे, विनोद बियाणी, आरोही नेवे यांनी सहकार्य केले.

# नोबेल विज्ञ

**सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. ११ : राष्ट्रीय विज्ञा
दिनानिमित्त (२८ फेब्रुवारी) नोबे
फाउंडेशन आणि श्रम साधना ट्रस्ट
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग
टेक्नॉलॉजी बांभोरीतर्फे 'राज्यस्त
नोबेल विज्ञान पुरस्कार' दिले जा
आहेत, यासाठी प्रस्ताव पाठविण
आवाहन करण्यात आले आहे.

या अंतर्गत तीन गटांमध्ये पुरस
दिले जाणार आहे. संस्था या गटा
जी शाळा अथवा विज्ञान स
विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी नि
व्हावी यासाठी विशेष कार्य करत अ
तसेच विद्यार्थ्यांना विशेष सुविधा
असेल अशा संस्थेला 'विज्ञान प्रे
पुरस्कार' दिला जाईल. तर शिक्षक
गटात प्राथमिक व माध्यमिक शि
विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी नि
व्हावी यासाठी विशेष कार्य

# न्यायमूर्ती श्रीनाथ फड यांचे स्वेच्छा रक्तदान



रेडक्रॉस रक्तपेढीत रक्तदान करताना न्यायमूर्ती श्रीनाथ फड.

**प्रतिनिधी** | जळगाव

मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती श्रीनाथ फड यांनी जळगावच्या रेडक्रॉस रक्तपेढीत येऊन स्वेच्छा रक्तदान केले.

रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, चेअरमन विनोद बियाणी, रक्तकेंद्र चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, कॅन्सरतज्ज्ञ डॉ.गोविंद मंत्री, रेडक्रॉस सभासद हर्षद जोशी, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. अनिल चौधरी, डॉ. अरविंद चौधरी, जनसंपर्क अधिकारी रोहिणी काळे, पर्यवेक्षकीय तंत्रज्ञ अनिल भोळे, दीक्षा कांबळे, उमाकांत शिंपी उपस्थित होते.

# 'सागरमित्र अभियाना'मध्ये ७५ शाळांचा सहभाग

## रेडक्रॉस, संकल्प फाउंडेशनचा उपक्रम; चार टन प्लास्टिकचा कचरा संकलन करून विल्हेवाट



रेडक्रॉस व संकल्प फाउंडेशनच्या सागरमित्र अभियानात सहभागी विविध शाळांचे प्रतिनिधी व पदाधिकारी.

**प्रतिनिधी** | जळगाव

इंडियन रेडक्रॉस सोसायटी व संकल्प फाउंडेशनतर्फे पर्यावरण दिनानिमित्त सागरमित्र अभियान राबवण्यात आले. यात सहभागी विविध विद्यालयाचा सन्मान करण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ.विद्या गायकवाड उपस्थित होत्या. यासह ७० शाळांचे मुख्याध्यापक समन्वयक सहभागी झाले. प्रास्ताविकात समन्वयक विशाल सोनकुळ यांनी सांगितले की, विद्यालयांमधून प्लास्टिक संकलनाचे काम सुरू असून जिल्ह्यातील ७५ शाळांच्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी चांगले कार्य केले आहे. ४ टन प्लास्टिक कचरा गोळा करून रिसायकलिंग आणि योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पाठवण्यात आला आहे. रेडक्रॉसचे विनोद बियाणी यांनी अभियानाचे महत्त्व सांगितले. चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी नॅट तंत्रज्ञानाबाबत सविस्तर माहिती देऊन नॅट टेस्टेड रक्ताची मागणी करण्याबाबत आवाहन केले. नोडल ऑफिसर घनश्याम महाजन यांनी दिव्यांग पुनर्वसन केंद्राबाबत माहिती दिली. उपाध्यक्ष गनी मेमन यांनी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. विद्या गायकवाड यांनी रेडक्रॉस व फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. संकल्प फाउंडेशनचे विशाल सोनकुळ जिल्हा प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प केला. डॉ. आशिष अजमेरा, सुनीता महाजन यांनी सागरमित्र अभियानाबाबत शाळेचे अनुभव व्यक्त केले. सर्व विद्यालयांच्या प्रतिनिधींना सन्मानचिन्ह देऊन गौरवले. सुभाष सांखला, अनिल शिरसाळे, डॉ. पराग जहागीरदार, सौरभ जैन उपस्थित होते. उज्ज्वला वर्मा यांनी सूत्रसंचालन व घनश्याम महाजन यांनी आभार मानले.

**आरोग्य टिप्स •** रेडक्रॉस, सायकॉलॉजिकल कौन्सिलर्सच्या व्याख्यानात डॉ. आनंद दशपुत्रेंनी दिला सल्ला

# उन्हाळ्यात दुपारी एक तास झोपणे किंवा सात ते आठ मिनिटे डोळे बंद करून पडणे फायद्याचे

प्रतिनिधी । जळगाव

मानसिक तणाव, चिंता, भीती त्यामुळे झोपेत बाधा येते. २४ तासांपैकी आपण जेव्हा कार्यरत असतो त्यावेळी ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिय थकतात तो थकवा कमी होण्यासाठी झोप आवश्यक असते. झोपण्यापूर्वी टीव्ही, मोबाइल पाहू नये. शांत वातावरण, प्रकाश अत्यल्प व मन प्रसन्न करणारे वातावरण असावे. डाव्या कुशीत झोपलेले अतिशय चांगले असते. त्यामुळे रक्ताभिसरण क्रिया व पचनशक्ती चांगली होते. उन्हाळ्यामध्ये दुपारी एक तास तरी झोपावे. वेळ नसेल तर सात ते आठ मिनिटा डोळे बंद करून स्वस्थ पडावे, असा मोलाचा सल्ला डॉ. आनंद दशपुत्रे यांनी दिला.

रेडक्रॉस व सायकॉलॉजिकल कौन्सिलर्स असोसिएशनतर्फे भावस्पर्श सपोर्ट ग्रुप स्थापन करण्यात आला असून, या अंतर्गत व्याख्यानमालेचे उद्‌घाटन रेडक्रॉस भवन येथे झाले. यात 'झोप व त्यातील अडथळे' या विषयावर डॉ. आनंद दशपुत्रे यांनी व्याख्यान दिले. कार्यक्रमास रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, चेअरमन विनोद बियाणी, रक्त केंद्र चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, रक्त केंद्र सचिव डॉ. अपर्णा मकासरे, धनंजय जकातदार, पुष्पा भंडारी, शांता वाणी, वैद्य डॉ. आनंद दशपुत्रे, सायकॉलॉजीकल कौन्सिलर्स असोसिएशनच्या डॉ. प्रतिभा हरणखेडकर, प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण तिवारी आदी उपस्थित होते. धनंजय जकातदार यांनी सांगितले मानसिक आरोग्याचा समतोल राखण्यासाठीचा हा उपक्रम असून या भावस्पर्श सपोर्ट ग्रु पच्या माध्यमातून प्रत्येक महिन्याला एका विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात येईल असे सांगितले. गनी मेमन यांनी रेडक्रॉसच्या माध्यमातून सुरू असलेल्या सर्व सेवा उपक्रमांची माहिती दिली. डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी रेडक्रॉस रक्त केंद्र अति उच्च रक्त चाचणी प्रणालीचा वापर करून त्याची शुद्धता तपासली जाते.



रेडक्रॉस व सायकॉलॉजिकल कौन्सिलर्स असोसिएशनच्या व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. अपर्णा मकासरे.

## निद्रानाशामुळे हृदयविकार, अर्धांगवायू होण्याची शक्यता

- डॉ. आनंद दशपुत्रे यांनी सांगितले की, झोप पूर्ण झाली की माणसाचे ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिय पुन्हा कार्यरत होतात व आपण उत्साहाने काम करतो. जन्मत: बाळ २४ तास झोपतो, जसजसे वय वाढते झोपेची वेळ कमी कमी होत जाते. वयोवृद्ध माणसे साधारणपणे ६ ते सात तास झोपतात. त्यामुळे चांगल्या आरोग्यासाठी झोप ही गरजेची असून या गोष्टीचा प्रत्येकाने अंमल करावा.
- डॉ. अपर्णा मकासरे यांनी सांगितली की, झोप हा सर्व प्राणि मात्रांना परमेश्वराने दिलेले एक वरदान आहे. झोपेमुळे शरीर व मन दोन्हीही स्वस्थ असतात. व्यसनी माणसाला झोप लागत नाही. ज्यांना निद्रानाश आहे ते हळू हळू नैराश्यात जातात व त्यामुळे हृदयविकार, अर्धांग वायू सारखे आजार होण्याची शक्यता बळावते. अशावेळी डॉक्टरकडे जाऊन समस्येचे निराकरण करावे.

नॅट टेस्टेड रक्त चाचणीमुळे विषाणू संक्रमणाची शक्यता ९९.९९ टक्के दुरावते, असे सांगितले. व्याख्यानासाठी जळगाव शहरातील नागरिक व हॉस्पिटल्समधील पॅरामेडिकल स्टाफ उपस्थित होते. धनंजय जकातदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा हरणखेडकर यांनी आभार मानले.

---

**पुण्य नगरी**

# राज्यपाल कोश्यारी यांच्याकडून रेडक्रॉस जळगावचे कौतुक

जळगाव : रेडक्रॉस जळगाव करीत असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती मला मिळत असून अतिशय उत्कृष्ठ कार्य सुरु आहे तरी, महाराष्ट्रातील इतर रेडक्रॉस शाखांनी रेडक्रॉस जळगावचा आदर्श घ्यावा, अशा शब्दांत रेडक्रॉस राज्य शाखेचे अध्यक्ष राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी रेडक्रॉस जळगावच्या कार्याचे कौतुक केले.



महाराष्ट्रातील रेडक्रॉसच्या सर्व शाखांची वार्षिक सर्व साधारण सभा रेडक्रॉस राज्य शाखेचे अध्यक्ष राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली राज भवन येथे उत्साहात पार पडली. याप्रसंगी राज्याचे आरोग्य सचिव डॉ. प्रदीप व्यास, राज भवनातील प्रमुख सेक्रेटरी संतोष कुमार, रेडक्रॉस राज्य शाखेचे चेअरमन खुसरो खान, रेडक्रॉसचे जनरल सेक्रेटरी टी.बी.सकलोथ, रेडक्रॉस जळगावच्या वतीने रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी, आपत्ती व्यवस्थापन चेअरमन सुभाष सांखला व सर्व रेडक्रॉस शाखांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव रेडक्रॉस विविध उपक्रम राबवित असून यशस्वी वाटचाल करीत असल्यामुळे राज्यपाल यांनी हे कौतुक केले आहे.

Jalgaon Edition
Sep 24, 2022 Page No. 09
Powered by : eReleGo.com

सायंदैनिक साईमत ™
R.N.I. No. MAHMAR / * इंटरनेट आवृत्ती http://dainiksaimat.in

# रेडक्रॉसच्या सर्व दवाखान्यांमध्ये फिजियोथेरपी विभाग सुरु करणार

## चेअरमन विनोद बियाणी यांची घोषणा

**जळगाव : प्रतिनिधी**



जागतिक दिव्यांग दिनानिमित्त रेडक्रॉस जिल्हा पुनर्वसन केंद्राच्या वतीने दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा आणि दिव्यांगासाठी फिजियोथेरपी सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा सन्मान सोहळा कार्यक्रम सामाजिक न्याय भवनच्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आला. याप्रसंगी जि.प. चे जिल्हा समाजकल्याण अधिकारी विजय रायसिंग, जि.प. चे दिव्यांग विभाग प्रमुख भरत चौधरी, स्वयंदीप प्रकल्प चाळीसगावच्या संचालिका मिनाक्षी निकम, रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी, आपत्ती व्यवस्थापन चेअरमन सुभाष सांखला, नोडल ऑफिसर घनश्याम महाजन, रक्तकेंद्र सचिव डॉ. अपर्णा मकासरे, कार्यकारिणी सदस्य धनंजय जकातदार, रेडक्रॉस जिल्हा पुनर्वसन केंद्रप्रमुख सोपान गणेशकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक नोडल ऑफिसर घनश्याम महाजन यांनी रेडक्रॉस जिल्हा पुनर्वसन केंद्राच्या पाच वर्षाच्या कामकाजाचा आढावा सांगत साहित्य वाटपामध्ये महाराष्ट्रात जळगाव जिल्हा प्रथम क्रमांकावर असल्याचे अभिमानाने नमूद केले. जि.प चे दिव्यांग विभाग प्रमुख भरत चौधरी यांनी शासनाच्या विविध योजना दिव्यांग बांधवांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहू असे आश्वासन दिले. स्वयंदीप प्रकल्प चाळीसगावच्या संचालिका मिनाक्षी निकम यांनी मनोगत व्यक्त करताना दिव्यांगांची सर्वात मोठी गरज म्हणजे रोजगार आहे. अशा सोहळ्यांनी प्रेरणा मिळते पण रेडक्रॉसमार्फत दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगार मिळण्यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी यांनी शुभेच्छा देताना सांगितले की,जळगाव शहरातील रेडक्रॉसच्या पाचही दवाखान्यांमध्ये फिजियोथेरपी विभाग सुरु करणार असून दिव्यांगांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देणार आहोत तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी कार्य करणाऱ्या सर्व संस्थांची चर्चा बैठक घेऊन त्यांच्या अडचणींविषयी रेडक्रॉसमार्फत राज्य शासनाला निवेदन देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करत असताना जि.प. चे जिल्हा समाजकल्याण अधिकारी विजय रायसिंग यांनी सांगितले की,मी रेडक्रॉस जिल्हा पुनर्वसन केंद्र आणि स्वयंदीप प्रकल्प चाळीसगाव यांचे काम अनेक दिवसांपासून बघत असून अतिशय सेवावृत्तीने या संस्था दिव्यांगांसाठी कार्य करीत आहेत. समाजाचे देणे लागतो या भावनेने झोकून काम करण्याची प्रवृत्ती असल्याने दिव्यांग व्यक्तींना खूप सहकार्य मिळत आहे. आम्ही आमच्या परीने शासकीय स्तरावरील काम लवकरात लवकर करत दिव्यांगांना सहकार्य करीत आहोत आणि भविष्यातही करीत राहू,अशी ग्वाही दिली.

सर्व मान्यवरांच्या हस्ते दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या मिनाक्षीताई निकम, बिरजु चौधरी, योगेश चौधरी, प्रथमेश पाठक, उषा पवार, गणेश पाटील,दत्तात्रय महाजन, नरेंद्र दोशी, मुकुंद गोसावी,वर्धमान धाडीवाल, कु.रईसा पिंजारी, डॉ.अमित वाघदे, डॉ. अविनाश भोसले, हर्षाली चौधरी,मनिषा पाटील यांचा सन्मान करण्यात आला तसेच रेडक्रॉस जिल्हा पुनर्वसन केंद्रामध्ये दिव्यागांना सेवा देणाऱ्या फिजियोथेरपी डॉक्टरांचा सन्मानही करण्यात आला. आभार कार्यकारिणी सदस्य धनंजय जकातदार यांनी मानले.सूत्रसंचालन रेडक्रॉसच्या जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संजय साळुंके,शोएब शेख,सुवर्णा चव्हाण, योगेश सपकाळे, दीपक सुरळकर यांनी परिश्रम घेतले.

दैनिक साईमत

# रेडक्रॉसमार्फत विद्यार्थ्यांना हायजेनिक किट्स, शालेय साहित्य व खाऊचे वाटप

**जळगाव : प्रतिनिधी**



सरदार वल्लभभाई पटेल पुण्यतिथीचे औचित्य साधून इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव आणि अण्णासाहेब सागरमल सांखला को-ऑप.क्रेडिट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सरदार वल्लभभाई पटेल शिक्षण मंडळ संचलित शारदा माध्यमिक विद्यालय सुप्रीम कॉलनी येथे शालेय मुलामुलींना हायजेनिक किट,शालेय साहित्य, पाणी बॉटल व पौष्टिक खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शारदा माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष प्रमोद पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी, आपत्ती व्यवस्थापन चेअरमन सुभाष सांखला, रेडक्रॉस जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा, शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र पाटील यांची विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमाची माहिती देताना जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा यांनी विद्यार्थ्यांना शालेय परिसर, घराच्या परिसराची स्वच्छता आणि स्वतःची नियमित स्वच्छता राखत आरोग्याची काळजी घेण्याबाबत सविस्तर माहिती दिली.

रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करत व्यायाम करण्याबाबत मार्गदर्शन केले. शिवाजी पाटील सर यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्याविषयी माहिती देत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशवीतेसाठी संगीता पाचपांडे,संजय सपकाळे, मनीषा चौधरी, ममता पाटील,यशवंत गुजर, हेमचंद्र इंगळे, लक्ष्मण झोपे, निलेश बोरोले, योगेश सपकाळे, अन्वर खान यांनी परिश्रम घेतले.

दिव्य मराठी जळगाव. सोमवार, २ जानेवारी २०२३

सामाजिक उपक्रम • रक्तगट, आरोग्य तपासणी शिबिरे घेतली, ४१ बॅग रक्त संकलन

# रक्तदानाने नववर्षाचे स्वागत

जळगाव | नववर्षाचे स्वागत सामाजिक उपक्रमाने करण्याचा पायंडा शहरात सेवाभावी संस्था, मंडळांनी पाडला. यंदा दोन ठिकाणी रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यात ४५ बॅग रक्त संकलन झाले. एका ठिकाणी रक्त तपासणी शिबिर झाले. त्यात ११ जणांनी रक्तगट तपासणी करण्यात आली. शिबिरात युवकांचा सहभाग लक्षणीय होता.

## सिंधी कॉलनी : १११ जणांची आरोग्य तपासणी



सिंधी कॉलनीतील संत भोजाराम साहेब दरबारात रक्त तपासणी करताना पथक.

सिंधी कॉलनीतील संत भोजाराम साहेब दरबारात झुलेलाल साईजा प्यारा तर्फे रक्तगट व आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. त्याचा १११ जणांनी लाभ घेतला. विलास लोहारे यांनी 'निरोगी जीवनासाठी आयुर्वेदाचे महत्त्व व त्याचा वापर' याविषयी माहिती दिली. डायग्नोस्टिकचे तनवीर पटेल, सिद्धार्थ सुरवाडे, तौसीफ पटेल, शुभम पाटील यांनी तपासणी केली. महेश चावला, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. अविनाश सोनगीरकर, सचिव गिरधर डाभी, डॉ. नितीन धांडे उपस्थित होते. आयोजन समितीने यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

## कंजरवाडा : १६ मित्रांचे स्वयंप्रेरणेने रक्तदान



कंजरवाड्यात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांना प्रमाणपत्र वितरीत करताना रेडक्रास सोसायटीचे पदाधिकारी व मान्यवर.

कंजरवाड्यात नवीन वर्षाची नवीन सुरुवात करण्यासह दिवंगत मित्राला स्मृतीदिनानिमित्त आठवण म्हणून १६ मित्रांनी रक्तदान करून नववर्षाची सुरुवात केली. स्वर्गीय रितेश दिलीप मांजरेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले. कोणताही अवास्तव खर्च न करता मित्र परिवाराने रक्तदान शिबिराची संकल्पना राबवून दिवंगत मित्राला श्रद्धांजली अर्पण केली. या वेळी दोन तासात १६ जणांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. रेडक्रॉस वैद्यकीय पथक, जनसंपर्क अधिकारी उज्जवला वर्मा यांनी नियोजन केले.

## शिक्षकवाडी : १५ रक्तदाते सरसावले

'दि आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार'तर्फे शिक्षकवाडीतील कार्यालयात नववर्षाची सुरुवात व श्रीश्री रविशंकरजी यांच्या दौऱ्यानिमित्त 'भक्ती की लहर' अंतर्गत रक्तदान शिबिर घेण्यात आले. सकाळी ८ वाजेपासून शिबिरास सुरुवात झाली. जगण्याची कला याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी पहिल्या सत्रात १४ तर दुसऱ्या सत्रात १५ जणांनी रक्तदान केले. डॉ. अनिल खडके, शामकांत चिंचोले, सुधाकर टोके, सुप्रिया गव्हारे, माधवराव गोळवलकर रक्तपेढीचे सहकारी व भूषण चौधरी, नितीन मोराणकर यांनी नियोजन केले.

# रेडक्रॉससारख्या संस्थांच्या पुढाकाराने टी.बी. मुक्त भारत अभियान शक्य : डॉ. गिरीश ठाकूर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी




प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियानाच्या निक्षय मित्र योजने अंतर्गत इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या माध्यमातून आणि आर.सी. बाफना फाउंडेशन ट्रस्टच्या सहकार्याने या महिन्याच्या १४० ग्रस्त टी.बी रुग्णांना पोषक आहार आणि थ्रेपटीन प्रोटीन बिस्कीटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकुर, आर.सी. बाफना फाउंडेशन ट्रस्टचे नथमलजी, रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, चेअरमन विनोद बियाणी, आपत्ती व्यवस्थापन चेअरमन सुभाषजी सांखला, प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण तिवारी, वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेश सुरळकर, कमलेश अमोदेकर व मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन यांनी रेडक्रॉस करीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत विविध संस्थांच्या सहकार्याने रेडक्रॉसमार्फत संपूर्ण वर्षभर हा (पान २ वर)

# कॅन्सरला घाबरून नाही तर लढून हरवा

## जागतिक कॅन्सर दिनानिमित्त रेडक्रॉसतर्फे आयोजित कार्यक्रमात डॉ. गीतांजली ठाकूर यांचे आवाहन.

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी




इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने जागतिक कॅन्सर दिनानिमित्त एस.एन. डी. टी महिला महाविद्यालय येथे ''ब्रेस्ट कॅन्सर कसा ओळखावा आणि त्याबाबतची काळजी'' या विषयावर सुप्रसिध्द रेडिओलॉजिस्ट व सोनोलॉजिस्ट डॉ. गीतांजली ठाकूर यांचे माहितीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. जयश्री नेमाडे, उपप्राचार्य डॉ. सतीश जाधव, रेडक्रॉसचे रक्तकेंद्र चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, जनसंपर्क अधिकारी सौ. उज्वला वर्मा, एन. एस.एस.विभागाचे प्रमुख श्री. माधव पाटील, प्राध्यापक व विद्यार्थिनी वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सौ. उज्वला वर्मा यांनी रेडक्रॉसच्या विविध उपक्रमांची माहिती देत सर्वांनी अभ्यास करत असताना सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवण्याबाबत आवाहन केले. डॉ. गीतांजली ठाकूर यांनी माहिती देताना सांगितले कि, भारतात जवळजवळ प्रत्येक वर्षी ८० हजार महिलांना ब्रेस्ट कॅन्सर होतो आणि त्यातील ३० हजार महिला यात मरण पावतात. ब्रेस्ट कॅन्सर जर पहिल्या आणि दुसऱ्या स्टेजवर लक्षात आला तर आपण सहज त्यातून बाहेर पडू शकतो. त्यासाठी प्रत्येक महिलेने आपल्या शरीरातील होणाऱ्या बदलांकडे लक्ष दिले पाहिजे. कॅन्सर झाल्यावर काळजी आणि उपचार करण्यापेक्षा कॅन्सर होऊच नये यासाठी जीवनशैलीत बदल करावेतअसे आवाहन त्यांनी केले. रेडक्रॉस रक्तकेंद्राचे चेअरमन यांनी महिलांमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढविण्याबाबत आणि रक्तदान शिबीर आयोजित करण्याबाबत आवाहन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. जयश्री नेमाडे यांनी अतिशय माहिती पूर्ण व्याख्यान आयोजित केल्याबद्दल रेडक्रॉसचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. माधव पाटील यांनी केले.

# इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मार्थ रुग्णालयास पल्स ऑक्सीमीटर भेट

देशोन्नती वृत्तसंकलन...



**जळगाव** ■ जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त शनिवार ६ मे रोजी इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मार्थ रुग्णालयास एकूण १९२ पल्स ऑक्सीमीटर भेट देण्यात आले.

याप्रसंगी रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन विनोद बियाणी, उपाध्यक्ष गनी मेमन, डॉ.राजेश सुरळकर, पीआरओ उज्ज्वला वर्मा यांच्यासह डॉ.उल्हास पाटील रुग्णालयाचे मेडिकल सुपरिटेंडेंट डॉ.प्रेमचंद पंडित, मेडिसीन विभागप्रमुख डॉ.चंद्रेय्या कांते, डीएम कार्डिओलॉजिस्ट डॉ.वैभव पाटील, रजिस्ट्रार प्रमोद भिरुड हे उपस्थीत होते. मान्यवरांचे स्वागत डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे रजिस्ट्रार प्रमोद भिरुड यांनी केले. मान्यवरांच्याहस्ते रेडक्रॉसतर्फे रुग्णालयातील डॉक्टरांना पल्स ऑक्सीमीटर भेट दिले. ज्याद्वारे रुग्णांचे पल्स घेणे सोयीचे होईल. एकूण १९२ पल्स ऑक्सीमीटर देण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष विनोद बियाणी यांनी इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे कार्य व त्याचे महत्व विशद केले. यात रेडक्रॉस दवाखाना, रेडक्रॉस मेडिसीन बँक, रेडक्रॉस ऑक्सीजन बँक अशा विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मार्थ रुग्णालय व परिसर हा जळगाव जिल्ह्यासाठी गौरवास्पद बाब असे सांगून गौरवोद्गार काढले. कोविड रुग्ण व जनरल वैद्यकीय सेवा अशा दोन्ही रुग्णांना स्वतंत्ररित्या येथे उपचार करण्यात आले. शाळा ते महाविद्यालय, जीवनदान ते देहदान अशा सर्वच वैद्यकीय सेवा येथे दिल्या जात असल्याचेही त्यांनी म्हटले.

यानंतर उपाध्यक्ष गनी मेमन यांनी उपस्थीत डॉक्टरांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, जीवनात पैसाच सर्वस्व नाही, माणूसकी असेल तरच तुम्ही खऱ्या अर्थाने एक चांगल जीवन जगत आहात. तुम्ही घातलेले पांढरे ॲप्रन आणि स्टेटसस्कोप हे तुमच्यासमोर प्रत्येकालाच नतमस्तक व्हायला लावते कारण ईश्वरासमानच डॉक्टर्स असतात. जीवनदान देणारे तुम्ही आहात आणि धन्य तुमचे आई-वडिल आहेत. याशिवाय तुम्ही वावरत असलेल्या परिसरातील स्वच्छता कर्मचारी असो वा क्लरिकल स्टाफसह डॉक्टर्स असो सर्वांचाच तुमच्या मोठे होण्यात वाटा आहे. त्यामुळे त्यांना नेहमीच प्रार्थनेत आठवण ठेवा आणि सर्वांशीच माणूसकीने वागा कारण तुम्ही एक डॉक्टर आहात आणि ही बाब खुप मोठी असल्याचेही मेमन म्हणाले. यानंतर पल्स ऑक्सीमीटरचे वाटप करण्यात आले.

# शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे युथ रेडक्रॉस शाखा स्थापन



एरंडोल : शास्त्री फार्मसी ाविद्यालय, पळासदड येथे राष्ट्रीय युवा ास व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे चित्य साधून भारतीय रेडक्रॉस संघटनेची ा रेडक्रॉस शाखा स्थापन करण्यात ली. सदर कार्यक्रमात भारतीय रेडक्रॉस ाटनेचे जळगाव विभागाचे पदाधिकारी ा मेमन, विनोद बियाणी, नितीन विसपुते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस ामाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद व्या प्रतिमेचे पूजन करून गनी मेमन ी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर मार्गदर्शन ले, विनोद बियाणी यांनी भारतीय क्रॉस संघटनेचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ावरील कार्याबद्दल विद्यार्थ्यांना विस्तृत माहिती दिली तसेच युथ रेडक्रॉस संघटना आरोग्य, सेवा, मैत्री या त्रिसूत्री तत्वावर सामाजिक बांधिलकी ठेवून कार्य करते असे सांगितले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विजय शास्त्री यांनी अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रमास संस्थेच्या सचिव रूपा शास्त्री उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा. डॉ. पराग कुलकर्णी, प्रा. जावेद शेख, प्रा. सुनील पाटील, प्रा. राहुल बोरसे, प्रा. हितेश कापडणे व समस्त प्राध्यापक वृंद तसेच संस्थेचे जनसंपर्क अधिकारी शेखर बुंदेले यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजिंक्य जोशी यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. जावेद शेख यांनी केले.

लोकमत



मेडिकल व्हॅनच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित अमन मित्तल, एम. राजकुमार व अन्य.

# चालता-फिरता दवाखाना जिल्हावासीयांच्या सेवेत

## अद्ययावत व्हॅनचे रेडक्रॉसमध्ये उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** जिल्हावासीयांच्या आरोग्यासाठी वेळीच तपासणी व्हावी या हेतुने जनरल रुग्ण तपासणी, दंतरोग, नेत्ररोग, स्त्री रोग, बालरोग तपासणी अशा सर्व सुविधायुक्त अर्थात चालता-फिरता दवाखाना असलेली अद्यायावत मेडिकल व्हॅन रेडक्रॉस सोसायटीमध्ये उपलब्ध झाली. तिचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमन मित्तल यांच्या हस्ते झाले.

कोरोना काळातील उल्लेखनीय कार्य लक्षात घेता कॅनडियन रेडक्रॉसच्या माध्यमातून आणि राष्ट्रीय शाखा नवी दिल्ली व राज्य शाखा मुंबई यांच्या सहकार्याने जळगावच्या इंडियन रेडक्रॉस सोसायटीला अद्ययावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण अशी मेडिकल व्हॅन देण्यात आली. तिचे उद्घाटन नुकतेच झाले. या प्रसंगी पोलिस अधीक्षक एम. राजकुमार, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पंकज आशिया, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर, रेडक्रॉसचे कोषाध्यक्ष शेखर सोनाळकर, रेडक्रॉस रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, आपत्ती व्यवस्थापन चेअरमन सुभाष सांखला, कार्यकारीणी सदस्य भालचंद्र पाटील, पुष्पा भंडारी, शांता वाणी, विश्वनाथ जोशी, रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी, उपाध्यक्ष गनी मेमन, आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा यांनी केले

- मेडिकल व्हॅनसह तीन हजार पल्स ऑक्सिमिटर, प्रथमोपचार प्रशिक्षणासाठी लागणारी मॅनिकिन, २० ऑटोमेटेड ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, प्रोटीन बिस्कीट इत्यादी साहित्यदेखील मिळाले आहे. ते डॉक्टर व संबंधितांना वितरीत केले जाणार आहे.
- विनोद बियाणी यांनी प्रास्ताविक केले. गनी मेमन यांनी उपक्रमाबाबत माहिती दिली. डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी आभार मानले.

Hello Jalgaon
Page No. 3 Mar 07, 2023
Powered by: erelego.com

# रोटरॅक्ट क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे सुमारे ३५ पिशव्या रक्त केले संकलन



रक्तदात्याचा सत्कार करताना रोटरॅक्ट क्लबचे पदाधिकारी.

**जळगाव** | रोटरॅक्ट क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे महादान या प्रांतस्तरीय उपक्रमात शहरात ३५ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. हे रक्तसंकलन अभियान व. वा. मार्केट (गोलाणी) व काव्यरत्नावली चौक या दोन ठिकाणी राबवण्यात आले होते. रेडक्रॉस सोसायटीच्या सहकार्याने या दोन्ही शिबिरांतून ३५ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. रक्त संकलन शिबिरासाठी अध्यक्षा निधी कोठारी, जागृती भागवानी, गौरव देशमुख, प्रतिक वाणी, पार्थ चंद्रात्रे, अल्फाज पटेल आदींनी सहकार्य केले.




**जळगाव :** 'रेडक्रॉस'ला प्लॅस्टिक कचरा संकलन कार्याला मिळालेल्या पुरस्कारासमवेत अध्यक्ष, जिल्हाधिकारी अमन मित्तल, विनोद बियाणी, आयुक्त विद्या गायकवाड.

# 'रेडक्रॉस'च्या प्लॅस्टिक कचरा संकलन कार्याला पुरस्कार

## प्लॅस्टिक रिसायकलिंग कॉन्फरन्स एशिया अॅवॉर्ड

जळगाव, ता. १९ : प्लॅस्टिक कचरा संकलन, जनजागृती व रिसायकलिंग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल रेडक्रॉसच्या जळगाव शाखेला मुंबई येथे 'प्लॅस्टिक रिसायकलिंग कॉन्फरन्स एशिया अॅवॉर्ड २०२३' प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

प्लॅस्टिक कचरा संकलन करणे, जनजागृती करणे व रिसायकलिंग करण्यासाठी पाठविणे हे अभियान रेडक्रॉस, जळगाव शहर महापालिका, संकल्प फाउंडेशन आणि सागरमित्र अभियान यांच्या सहकार्याने मागील ७ वर्षांपासून सतत सुरू आहे. सागरमित्रचे विभागीय समन्वयक विशाल सोनकुळ शालेयस्तरावर विद्यार्थ्यांना प्लॅस्टिकची योग्य विल्हेवाट न लावल्यामुळे पर्यावरणाचे होणारे नुकसानीबाबत माहिती देऊन जनजागृती करतात व विद्यार्थ्यांना घरचा वेस्ट प्लॅस्टिक कचरा शाळेत आणून गोळा करण्याबाबत आवाहन करतात. शिक्षकांच्या मार्गदर्शनाने जमा झालेला सर्व प्लॅस्टिक कचरा रेडक्रॉसमार्फत संकलित करून योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पाठविला जातो. आजपावेतो आठ टनपेक्षा जास्त प्लॅस्टिक वेस्ट शालेय विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या सहकार्याने गोळा करण्यात आला आहे.

जळगाव जिल्ह्यातील २३२ शाळा या अभियानाला जोडल्या असून, रेडक्रॉसचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अमन मित्तल, आयुक्त डॉ. विद्या गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाला रेडक्रॉसचे सर्व पदाधिकारी, जळगाव शहर महापालिका, मेरिको इंडस्ट्रीज, नेहरू युवा केंद्र, महाविद्यालये, अनेक युवक मंडळे, सामाजिक संस्थांनी सहकार्य केले.

प्लॅस्टिक संकलन आणि रिसायकलिंग क्षेत्रातील या उल्लेखनीय कार्याबद्दल रेडक्रॉसला दिल्ली येथील पर्यावरण शिक्षण विभागाचे प्रमुख प्रभज्योत सोढी यांच्या हस्ते जळगाव रेडक्रॉस शाखेचे चेअरमन विनोद बियाणी यांना पुरस्कार देण्यात आला.

# जुनी वस्तू पुर्नवापरासाठी मनपातर्फे 'आरआरआर' केंद्र

## इंडियन रेडक्रॉस सोसायटीजवळील जागेत आज प्रारंभ

**जळगाव, ता. १९ :** 'मेरी लाईफ, मेरा स्वच्छ शहर' या अभियानांतर्गत आर.आर.आर (रिड्यूस, रियूज आणि रिसायकल) केंद्र स्थापन करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. त्यानुसार महापालिकेतर्फे रेडक्रॉसच्या सहकार्याने शहरात शनिवारी (ता. २०) सायंकाळी पाचला इंडियन रेडक्रॉस सोसायटीजवळील जागेत या केंद्राचा प्रारंभ होणार आहे.

महापौर जयश्री महाजन, आयुक्त डॉ. विद्या गायकवाड यांच्या हस्ते प्रारंभ होईल. महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत नागरिकांनी आपल्याकडील जुनी पुस्तके, कपडे, पादत्राणे व इतर निरूपयोगी वस्तू या केंद्रावर जमा कराव्यात. संकलित झालेल्या वस्तू नूतनीकरण, पुर्नवापर किंवा नवीन उत्पादने तयार करण्यासाठी विविध भागधारकांना सुपूर्द करण्यात येतील. शनिवारपासून ५ जूनपर्यंत सकाळी सात ते दुपारी एकपर्यंत हे संकलन करण्यात येणार आहे. गोळा केलेल्या वस्तुंची नोंद केली जाईल. वस्तू गोळा करण्यासाठी नागरिकांच्या घरोघरी जाऊन त्यांच्याशी संपर्क करण्यात येईल. यात नूतनीकरण व पुर्नवापर योजनेच्या सीईओंना सक्रिय करून घेण्यात येईल. शहरातील सामाजिक संस्थांना केंद्रांना भेटी देण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात येईल, तसेच शहरातील मान्यवरांना या केंद्रांना देणगी देण्याची विनंती करण्यात येणार आहे. या केंद्रावर जमा झालेल्या वस्तुंची माहिती आरआरआर केंद्रावर, तसेच स्वच्छता पोर्टलवर भरण्यात येणार आहे. या केंद्राची माहिती, तसेच जनजागृती करून भिंतीवर पोस्टर्स लावून संदेश देण्यात येणार आहेत.

# इंडियन रेडक्रॉसतर्फे पूरग्रस्तांना मोफत साहित्य वाटप, फैजपूर येथील उपक्रम



पूरग्रस्तांना घरगुती साहित्याचे वाटप करताना तलाठी तेजस पाटील, हेमा सांगोळे, अजय महाजन, शेख कुर्बान.

**प्रतिनिधी** | फैजपूर

गेल्या आठवड्यात शहरातील धाडी नदीला आलेल्या पुरामुळे इस्लामपुरा भागात अनेक रहिवाशांचे नुकसान झाले. या पूरग्रस्त नागरिकांना इंडियन रेड क्रॉस सोसायटीने घरगुती साहित्याचे वाटप केले. १०० कुटुंबांना प्लास्टिकची बकेट व अन्य साहित्य देण्यात आले.

यावेळी तलाठी तेजस पाटील, तलाठी हेमा सांगोळे, तलाठी अजय महाजन, माजी नगरसेवक शेख कुर्बान उपस्थित होते. तत्कालीन जिल्हाधिकारी अमन मित्तल शहरातील आढावा बैठकीमध्ये इंडियन रेड क्रॉस सोसायटीतर्फे पूरग्रस्त कुटुंबांना साहित्य वाटप करण्यात येईल अशी माहिती दिली होती. त्यानुसार तत्काळ पूरग्रस्तांना साहित्याचे वाटप करण्यात आले. तलाठी कार्यालयात गुरुवारी सायंकाळी हा कार्यक्रम झाला. इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या उज्ज्वला वर्मा व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

**लोकमत**




एसव्हीकेएम कॅम्पसमध्ये झालेल्या रक्तदान शिबिराप्रसंगी उपस्थितीत आमदार काशिराम पावरा, राजगोपाल भंडारी, प्रभाकर चव्हाण, राहुल दंदे, श्याम इशी, विनोद बियानी, सुभाष साखला, उज्ज्वला वर्मा, डॉ. अरविंद चौधरी, डॉ. अनिल चौधरी आदी.

# ३०४ दात्यांनी केले उत्स्फूर्त रक्तदान!

## सावळदे येथील एसव्हीकेएम कॅम्पसमध्ये झाला कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सावळदे (ता. शिरपूर) येथील एसव्हीकेएम कॅम्पस मुकेश पटेल टेक्नॉलॉजी पार्क मध्ये ३०४ दात्यांनी रक्तदान केले. तसेच दोन दिवसात शिरपूर व धुळे येथील विविध महाविद्यालयांमध्ये १ हजार ३०९ दात्यांनी रक्तदान केले. आमदार अमरिशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त हा कार्यक्रम घेण्यात आला होता.

सावळदे येथील एसव्हीकेएम कॅम्पस, मुकेश पटेल टेक्नॉलॉजी पार्कमध्ये झालेल्या कार्यक्रमात आमदार काशिराम पावरा, एसव्हीकेएम संस्थेचे ट्रस्टी राजगोपाल भंडारी, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रभाकर चव्हाण, सावळदे कॅम्पसचे चीफ अकौंटंट अँड ॲडमिनिस्ट्रेटर राहुल दंदे, शाम इशी, इंडियन रेडक्रॉस सोसायटी चेअरमन विनोद बियानी, आपत्ती व्यवस्थापन चेअरमन सुभाष साखला, जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा, डॉ. अरविंद चौधरी, डॉ. अनिल चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

सावळदे येथील कॅम्पसमध्ये ३०४ दात्यांनी, आर. सी. पटेल फार्मसी कॉलेजमध्ये १५०, आर. सी. पटेल सीनियर कॉलेज १०२, आर. सी. पटेल आय. एम. आर. डी. कॉलेजमध्ये १०८ याप्रमाणे रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरात सहभाग नोंदविला. दिवसभर विविध कार्यक्रम पार पडले.

Hello Dhule
Page No. 4 Sep 15, 2023
Powered by: erelego.com

# रेडक्रॉस मार्फत जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रक्षाबंधन सण साजरा



जळगाव- इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगावच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष श्री. आयुष प्रसाद यांच्या मार्गदर्शनानुसार रक्षाबंधन हा सण जिल्हा मध्यवर्ती कारागृहातील कैदी बांधवांसोबत आणि पोलीस बांधवांसोबत साजरा करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा कारागृह अधीक्षक श्री. वांडेकर, सहकारी श्री. गजानन पाटील व सहकार्यांच्या उपस्थितीत शांततापूर्ण व भावनिक वातावरणात सण साजरा झाला. याप्रसंगी रेडक्रॉसच्या जनसंपर्क अधिकारी सौ. उज्वला वर्मा, तंत्रज्ञ सौ. सुनीता मेथे, सौ. सीमा शिंदे, सौ. दीक्षा पाटील, रूपाली बडगुजर यांनी सर्व कैदी बांधवांना राखी बांधली.

याप्रसंगी सर्व कैदी बांधवांना चांगले राहून बाहेर आपले परिवारातील सदस्य आपल्या प्रतीक्षेत असून त्यांच्या प्रेमासाठी आपण लवकर बाहेर पडावे असे सकारात्मक भावनिक आवाहन यावेळी करण्यात आले. परिवाराच्या आठवणीत बऱ्याच कैदी बांधवांचे डोळे पाणावले. परन्तु रेडक्रॉस मार्फत घेण्यात आलेल्या या भाऊबहिणीच्या अत्यंत महत्वपूर्ण सणाच्या उपक्रमामुळे मनाला मोठा आधार मिळाल्याच्या भावना सर्व कैदी बांधवांनी व्यक्त केल्या.

# जेष्ठ नागरिकांची गणेशोत्सवात आरोग्य तपासणी




दैनिक **स्वतंत्र भारत**

**भडगाव| प्रतिनिधी**

समाजातील वयोवृद्ध नागरिकांच्या आरोग्याच्या अनेक समस्या असतात. वाढत्या वयामुळे दूर बाहेर तपासणीस जाण्याच्या देखील अडचणी असतात. या सर्व बाबींचा विचार करून येथील जागृती मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सव अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन जागृती चौकात करण्यात आले होते. जळगांव येथील रेडक्रॉस सोसायटी यांच्या मोबाईल अम्ब्युलन्स द्वारे परिसरातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली व त्यांना औषधें देखील वितरित करण्यात आली. या अंतर्गत ई. सि. जी., शुगर, बी. पी., हिमोग्लोबिन टेस्ट करून वैद्यकीय सल्ला देण्यात आला. शिबिरात ८१ जेष्ठ नागरिकांची तपासणी करण्यात आली. या साठी रेडक्रॉस सोसायटी चे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश सुरळकर, जनसंपर्क अधिकारी सौं. उज्वला वर्मा, सहाय्यक रवींद्र जाधव, मंगेश ओतारी, अन्वर खान यांचे अनमोल सहकार्य लाभले.शिबीर यशस्वीतेसाठी मंडळाचे कार्यकर्ते सुरेश कासार, सुनील कासार, अन्वर पठाण, उमेश जयस्वाल, मंदार कासार, गोलु मासरे, गोकुळ चौधरी , युवराज चौधरी , गजेंद्र तांबटकर मंडळाचे अध्यक्ष अतुलसिंग परदेशी, औषध विक्रेता संघांचे सुरेश भंडारी, डॉ. ईश्वरसिंग परदेशी, इत्यादिनी विशेष परिश्रम घेतले. जेष्ठ नागरिकांनी ह्या उपक्रमाचे कौतुक केले व समाधान व्यक्त केले.

# रेडक्रॉस राज्य शाखेची बैठक राजभवनात संपन्न

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

महाराष्ट्राचे राज्यपाल तथा रेडक्रॉस राज्य शाखेचे अध्यक्ष मा. श्री. रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली राजभवन, मुंबई येथे रेडक्रॉस राज्य शाखेची बैठक महाराष्ट्रातील जिल्हा शाखांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीत मुंबई, जळगाव, सांगली, कोल्हापूर, वर्धा, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पंचगणी, पुणे, वाई इत्यादी जिल्ह्यांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. तळागाळात सेवा देण्याचे उद्दिष्ट लक्षात घेता रेडक्रॉसचे सेवाकार्य महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये रेडक्रॉस शाखा सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यावर भर देण्यात आला. याशिवाय रेडक्रॉस रक्तकेंद्रांमध्ये NAT टेस्टेड तंत्रज्ञानाचा वापर, Thalesiimiya बालकांना सुरळीत रक्तपुरवठा, रेडक्रॉसच्या सामाजिक उपक्रमांना निधी मिळवून देणे, काही जिल्हयातील रेडक्रॉस शाखांना जागा उपलब्ध करून देणे, आरोग्य संबंधी उपक्रम राबविण्यावर भर देणे, अशा महत्त्वपूर्ण




विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. मा. राज्यपाल महोदयांनी उपस्थित प्रत्येक प्रतिनिधींशी चर्चा करत अडचणी जाणून घेतल्या. भविष्यात रेडक्रॉसच्या सर्व शाखांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. जळगाव रेडक्रॉस शाखेच्या वतीने चेअरमन विनोद बियाणी यांनी या बैठकीत सहभाग घेतला व रेडक्रॉस जळगाव शाखेच्या कामकाजाचा अहवाल सादर केला. उपस्थित सर्वांनीच जळगाव रेडक्रॉसच्या सेवाकार्याचे कौतुक केले. रेडक्रॉसच्या वतीने महाराष्ट्रात Thalesiimiya बालकांचे वाढते प्रमाण लक्षात घेता Thalesiimiya स्क्रीनिग अभियान राबविणेबाबत माननीय राज्यपाल महोदयांना निवेदन देण्यात आले.

---

# महामार्ग पोलिस मदत केंद्रात अपघात प्रथमोपचार प्रशिक्षण

## मृत्युंजयदूतांना ओळखपत्राचे करण्यात आले वाटप



मार्गदर्शन करताना इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या उज्ज्वला शर्मा.

**प्रतिनिधी** | पाळधी

येथील महामार्ग पोलिस मदत केंद्रात रस्ते अपघात झाल्यानंतर त्या ठिकाणी उपस्थित मृत्युंजयदूत नागरिकांनी करावयाची मदत याबाबतीत प्रथमोपचार प्रशिक्षण देण्यात आले.

इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या उज्ज्वला शर्मा यांनी जखमी व्यक्तींचा जीव वाचवण्यासाठी कसे प्रयत्न करावे याबाबत प्रात्यक्षिकासह विस्तृत माहिती दिली. या वेळी नाशिक विभाग डीवायएसपी प्रदीप मैराळे, धुळे विभाग पोलिस निरीक्षक हेमंतकुमार भामरे, एपीआय राजेंद्र सोनवणे यांनी अपघात घडल्यानंतर पोलिस रुग्णवाहिका व दवाखान्यात दाखल करण्याबाबत घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन करून अपघात स्थळी मदत कार्य करण्यास तत्पर असणाऱ्या मृत्युंजयदूतांना ओळखपत्र वाटप करण्यात आले.

दैनिक
# जळगाव वृत्त
email-jalgaonvrutt1980@gmail.com
facebook.com/jalgaonvrutt.dainaik
http://www.jalgaonvrutt.com/
वर्ष- ३२ >> अंक -५५ जळगाव >> रविवार, १२ नोव्हेंबर २०२३ पाने- ४ >> किंमत-१ रुपय

## रेडक्रॉस तर्फे गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीनचे वाटप

जळगाव - इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव मार्फत गोर गरीब होतकरू गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

रेडक्रॉस राष्ट्रीय शाखा दिल्ली यांच्या मार्फत प्राप्त झालेल्या या १० शिलाई मशीन रेडक्रॉसच्या जेष्ठ कार्यकारिणी सदस्य सौ. शांताताई वाणी यांच्या गोर गरीब होतकरू गरजू महिलांना स्वयंरोजगाराच्या साठी शिलाई मशीनचे वाटप करण्यात आली. त्या अनुषंगाने अर्ज प्राप्त करून त्यातून निवडलेल्या दहा महिलांना शिलाई मशीन देण्यात आले.

यावेळी रेडक्रॉसचे उपाध्यक्ष श्री. गनी मेमन यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले कि, समाजातील जे गोरगरीब निराधार



महिला आहेत त्यांच्यामध्ये स्वयंरोजगाराची भावना निर्माण झालेली आहे व त्यासाठी ज्या महिलांना शिलाई करण्याची कला अवगत आहे, त्यांना शिलाई मशीन देण्यात येत आहे ते आत्मनिर्भर व्हावे तसेच या माध्यमातून त्यांना शिलाईचे काम करता येणे शक्य व्हावे व प्राप्त उत्पन्नातून त्याना कुटुंबियांचे उदर निर्वाह करणे शक्य व्हावे. या उदात्त हेतूने हि सेवाभावी कार्य रेडक्रॉसने हाती घेतलेले आहे व त्याची हि सुरुवात आहे.

समाजसेविका प्रतिभा शिंदे यांनी रेडक्रॉस करीत असलेल्या सेवाकार्याचा गौरव केला व ज्यांना शिलाई मशीन मिळाले आहे. त्यांनी शिलाईचे काम करून मेहनत करावी व आत्मनिर्भर व्हावे असे सांगितले.

रेडक्रॉसचे गनी मेमन, सौ. शांताताई वाणी, डॉ. अपर्णा मकासरे व प्रतिभा शिंदे यांचे शुभहस्ते शिलाई मशीनचे वाटप श्रीमती विजया श्रीराम वाणी, श्रीमती गायत्री किशोर महाजन, श्रीमती मुक्ताबाई सचिन कोळी, श्रीमती प्रीतम विशाल चितोडकर, श्रीमती लक्ष्मीबाई विश्वनाथ बारी, श्रीमती सोनाबाई आनंदा वाघ व सौ. कविता संदीप नाईक यांना मशीनचे वाटप करण्यात येऊन सदरचे शिलाई मशीन रेडक्रॉसने त्यांच्या निवास्थानी जावून दिले. सौ. शांताताई वाणी यांनी आभार प्रदर्शन व सूत्र संचालन सौ. उज्वला वर्मा यांनी केले.

लोकमत




पाणपोयीच्या लोकार्पण प्रसंगी मान्यवर.

## रुग्णसेवेसाठी सिमेंट बेंचेस आणि वॉटर कुलरचे लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या पुढाकाराने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रुग्णसेवेसाठी सिमेंट बेंचेस आणि वॉटर कुलरचे लोकार्पण करण्यात आले.

या प्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय गायकवाड, लिपिक डी. डी. राठोड, नगरसेवक प्रशांत नाईक, विशाखा बापट, श्रीकृष्ण वाणी, प्रशांत शर्मा, प्रशांत पगार, रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, चेअरमन विनोद बियाणी उपस्थित होते.

शासकीय रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागातील रुग्णांसाठी सात बेंचेस, एआरटी सेंटरमध्ये येणाऱ्या रुग्णांसाठी पाच बेंचेस, शवविच्छेदनगृहाजवळील भागात पाच बेंचेस बसविण्यात आले.

## जळगावात रमेशजींच्या स्मरणार्थ प्रेरणा दिनाला १२० दात्यांनी केले रक्तदान

**शहरात तीन ठिकाणी झाले शिबिर; लिग्रांड कंपनीमध्ये सर्वाधिक रक्तदान**



[illegible]

प्रतिनिधी | जळगाव

[illegible]

**यांनी केले रक्तदान :** [illegible]

[illegible]

## रेडक्रॉस सोसायटीने पाच हजार जणांना दिले प्रथमोपचाराचे धडे

प्रतिनिधी | जळगाव

इंडियन रेडक्रॉस सोसायटीची निर्मिती रुग्णांची सुश्रुशा करण्याच्या कामापासूनच झाली आहे. त्याकडे जळगाव रेडक्रॉस सोसायटी पुन्हा वळली आहे. या वर्षात ५५० जणांना प्रथमोपचाराचे प्रशिक्षण देण्यात आले. आतापर्यंत पाच हजार पेक्षा अधिक जणांना प्रथमोपचाराबाबत प्रशिक्षित करण्यात आल्याचे रेडक्रॉस सोसायटीचे उपाध्यक्ष गनी मेमन यांनी सांगितले.

रेडक्रॉस सोसायटीतर्फे गरजूंना रक्तपुरवठा दिला जातो; परंतु त्यासोबत इतरही वैद्यकीय सुविधा हे सोसायटीचे प्रमुख कार्य आहे. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सूत्रे

### कोरोनानंतर प्रशिक्षणात वाढ

गेल्या वर्षी कोरोनाचा इफेक्ट कायम असल्याने प्रशिक्षणाला कमी प्रतिसाद मिळाला होता. वर्षभरात २९८ जणांना हे मोफत प्रशिक्षण देण्यात आले होते. यंदा त्यात वाढ झाली असून १५ डिसेंबर अखेर ४२५ जणांना हे प्रशिक्षण देण्यात आल्याचे उपाध्यक्ष मेमन यांनी सांगितले.

स्वीकारल्यानंतर सोसायटीचे कार्य विस्तारीत करण्याच्या सूचना दिल्या त्यानुसार गेल्या काही महिन्यात प्रथोमपचार प्रशिक्षण उपक्रमाला गती देण्यात आली आहे, असे देखील मेमन यांनी सांगितले.

## रेडक्रॉसमार्फत रस्ता सुरक्षा नियमाबाबत केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

जळगाव – वाहतूक शाखेच्या रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत केंद्रीय विद्यालय,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा व काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

रेडक्रॉसचे सभासद व प्रशिक्षक श्री. दत्तात्रय महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यात गाडी चालविताना घ्यावयाची काळजी, वाहतुकीचे नियम, सिग्नलबाबत माहिती, हेल्मेट वापरण्याचे महत्व याबाबत चित्रफित दाखवून मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नाची समाधानकारक उत्तरे दिली. पक्षीमित्र स्वयंसेवक श्री. मदन लाठी यांनी त्यांच्या व त्यांच्या मुलाचे आयुष्य हेल्मेट वापरल्यामुळे कसे सुरक्षित झाले याचा प्रसंग सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपले आयुष्य हे आपल्यासाठी व आपल्या परिवारासाठी खूप महत्वाचे असून वाहतूक नियमांचे पालन करून आपले जीवन सुरक्षित ठेवावे असे आवाहन सौ. उज्वला वर्मा यांनी केले. या प्रसंगी केंद्रीय विद्यालयाचे प्रिन्सिपल श्री. सोना कुमार, समन्वयक शिक्षिका सौ.मीनाक्षी पाटील, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने रेडक्रॉसचे आभार व्यक्त करण्यात आले.



**स्नेह मेळावा •** रेडक्रॉसच्या कार्यक्रमात ५०० ज्येष्ठ नागरिकांचा होता सहभाग

# एकमेकांचा आधार बनण्यासह आनंदी राहण्याचा ज्येष्ठ नागरिकांचा निर्धार

प्रतिनिधी | जळगाव

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखेतर्फे रविवारी कांताई हॉल येथे ज्येष्ठ नागरिक, श्रेष्ठ नागरिक स्नेहमेळावा झाला. यात ज्येष्ठांनी आरोग्याची काळजी घेत मतदानाचा हक्क बजवावा, मोबाइलमुळे होणारे गुन्हे फसवणूक कशी रोखता येईल त्यासाठी आपण काय काळजी घ्यावी यासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली. तसेच सगळ्यांनी आनंदी जीवन जगण्याचा निर्धार केला. मेळाव्याला तब्बल ५०० ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. विशेष म्हणजे प्रत्येकांनी विषय बारकाईने समजून घेतले. या माहितीचा त्यांना येत्या काळात मोठा फायदा होणार आहे.

मेळाव्यात जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी ज्येष्ठांनी शारीरिक अडचणींसोबतच आपले मनस्वास्थ्यही चांगले राखले पाहिजे. यासाठी प्रत्येकाने खुल्या मनाने जगायला हवे. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क नक्की बजवावा हवा, असे आवाहन केले. रेडक्रॉस रक्त केंद्राचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी रक्तदान, एनएटी तंत्रज्ञानाबाबत माहिती दिली. मध्यंतरानंतर सर्व ज्येष्ठ नागरिकांची खुली चर्चा करत मुक्त संवाद साधला. यात ज्येष्ठांनी आपल्या कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक प्रकारच्या भावना मांडत आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.

## मंथन : खुल्या चर्चेत अनेकांनी भावनांना करून दिली वाट मोकळी



ज्येष्ठ नागरिक, श्रेष्ठ नागरिक स्नेहमेळाव्याला उपस्थित ज्येष्ठ नागरिक.

**आरोग्य कीट भेट :** मेळाव्यात उपस्थित सर्व ज्येष्ठ नागरिक संघांचा व पदाधिकाऱ्यांचा रेडक्रॉसतर्फे सन्मान करण्यात आला. समारोपानंतर सर्व ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य कीट भेट देण्यात आली. प्रथमच झालेला असा मेळावा नियमित भरवण्यात यावा, अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली.

### मेळाव्यात या देण्यात आल्या टिप्स

दिवसभराच्या संपूर्ण सत्रांमध्ये समुपदेशक वीणा महाजन यांनी मानसिक आरोग्य कसे चांगले असावे यावर विविध उदाहरणांतून मार्गदर्शन केले. प्रांताधिकारी अर्पित चव्हाण यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी असणारे कायदे व त्याचा वापर कसा करावा यावर माहिती दिली. डॉ. जयंत जहागीरदार यांनी ज्येष्ठ नागरिकांचा आहार व आरोग्यावर मार्गदर्शन केले. दिगंबर महाजन यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधांबाबत मार्गदर्शन केले. डॉ. कविता कुलकर्णी दातार यांनी मोबाइलमुळे होणारे गुन्हे तसेच होणारी फसवणूक कशी रोखता येईल व त्यासाठी आपण काय काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले.

**ज्येष्ठांची ज्येष्ठांना साथ :** मेळाव्यानिमित्ताने प्रथमच एवढ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक एकत्र आले होते. एकमेकांना काय समस्या येतात हे चांगल्याप्रमाणे सर्वांना माहीत असल्याने सर्वच जण हॉलच्या पायऱ्या चढण्यास मदत करत होते. अनेक जणांना जास्त वेळ एका ठिकाणी बसता येत नसल्याने ते उठून बाहेर जात होते. त्यांना जाण्या-येण्यासाठी रस्ता करून देत

# रेडक्रॉस से पीड़ित परिवार को मदद

## यावल के डोंगरकठोरा के आपदा पीड़ितों ने जताया आभार

जलगांव (सुरेश कोहली) डिजिटल भास्कर पत्रिका न्यूज़। जिले की यावल तहसील के गांव डोंगरकठोरा के किसान अनिल धनराज सरोदे व दगडू गेंदू पाटिल के घर का सारा घरेलू सामान, कृषि सामग्री व अन्य दस्तावेज आदि पूरी तरह से जल गए थे। उक्त जानकारी कलेक्टर एवं रेडक्रॉस अध्यक्ष आयुष प्रसाद को इसकी सूचना दी गई। जिससे कलेक्टर ने पीड़ित परिवारों की मदद करने का निर्देश दिया। रेडक्रॉस उपाध्यक्ष गनी मेमन, अध्यक्ष विनोद बियानी आपदा प्रबंधन अध्यक्ष सुभाष सांखला के मार्गदर्शन में जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा व टीम प्रतिनिधियों ने मौके का मुआयना कर दोनों परिवारों को बर्तनों का सेट, चटाई, बाल्टी, कपड़े, स्वेटर, तिरपाल आदि देकर मदद की। इस अवसर पर यावल तहसीलदार मोहनमाला नज़ीरकर ने तुरंत सरकार के माध्यम से नया राशन कार्ड भी जारी कर भविष्य में भी मदद करने का आश्वासन दिया। रेडक्रॉस द्वारा किए गए पीड़ित परिवार की त्वरित मदद का ग्रामीणों ने भी रेडक्रॉस का आभार व्यक्त किया है।



# रेडक्रॉस जळगाव शाखेला महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ठ रेडक्रॉस शाखा पुरस्कार प्रदान

जळगाव - रेडक्रॉस राज्य शाखा मुंबईच्या वतीने रेडक्रॉस जळगाव शाखेला सन २०२१- २२ च्या कार्यकाळात वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध सेवाभावी उपक्रमांसाठी देण्यात येणारा राजा महाराजा सिंह सर्वोत्कृष्ठ रेडक्रॉस शाखा पुरस्कार तसेच सन २०२२- २३ च्या कार्यकाळात रेडक्रॉसच्या सेवाकार्यात सर्वात जास्त नवीन सभासदांना सहभागी करण्यासाठीचा रेडक्रॉस राज्य शाखेचा मेरिट पुरस्कार देऊन जळगाव रेडक्रॉस शाखेला गौरविण्यात आले. रेडक्रॉस राज्य शाखा मुंबई यांच्या यांच्या वार्षिक सर्व



सेक्रेटरी टी.बी. सकलोथ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सभेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व रेडक्रॉस जिल्हा शाखा व तालुका शाखांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

रेडक्रॉस जळगाव शाखेच्या वतीने रेडक्रॉसचे प्रमुख मार्गदर्शक यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा रेडक्रॉस राज्य शाखेचे अध्यक्ष महामहीम श्री. रमेश बैस यांनी सर्वांचे अभिनंदन केले. समाजसेवेचे ब्रीद अंगीकारून रेडक्रॉस जळगाव शाखा गेल्या ७० वर्षांपासून विविध प्रसाद यांचे मार्गदर्शन आणि रेडक्रॉसचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, सर्व सभासद, कर्मचारी, स्वयंसेवक व जळगावकर नागरिकांचे बहुमोल सहकार्य मिळत असते.

महाराष्ट्रातील रेडक्रॉस सोसायटीच्या असलेल्या ३३ शाखांमध्ये जळगाव जिल्हा रेडक्रॉस शाखेला हा सन्मान मिळाला आहे. माननीय जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष श्री. आयुष प्रसाद यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी, सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# विश्व स्वास्थ्य दिवस पर जिला रेडक्रॉस की पहल एरंडोल में ब्लड बैंक का उद्घाटन

जलगाँव ( सुरेश कोहली ) डिजिटल भास्कर पत्रिका न्यूज़।



विश्व स्वास्थ्य दिवस के अवसर पर भारतीय रेड क्रॉस सोसाइटी ब्लड सेंटर जलगांव के तहत जिले के एरंडोल में ब्लड बैंक का उद्घाटन किया गया। इस दौरान डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ता, रक्तदान शिविर आयोजक व एरंडोल, धरनगांव, कसौदा, पारोला व भडगांव तहसील क्षेत्र के गणमान्य व्यक्ति उपस्थित थे।एरंडोल तहसील डॉक्टर्स एसोसिएशन के अध्यक्ष डॉ.सुधीर काबरा, पारोला अध्यक्ष महेश पवार, धरनगांव से डॉ. मिलिंद दहाले, डॉ.अरुण कुलकर्णी, एरंडोल पुलिस निरीक्षक सतीश गोराडे, रेडक्रॉस के उपाध्यक्ष गनी मेमन, अध्यक्ष विनोद बियानी, ब्लड सेंटर अध्यक्ष डॉ. प्रसन्न कुमार रेडासानी, आपदा प्रबंधन अध्यक्ष सुभाष सांखला, सह प्रशासनिक अधिकारी डॉ.राजेश सुरलकर, सुखकर्ता फाउंडेशन से नरेन्द्र ठाकुर एवं गणमान्य नागरिक उपस्थित थे। रेडक्रॉस ब्लड सेंटर के चेयरमैन डॉ. प्रसन्नकुमार रेडासानी ने कार्यक्रम की शुरुआत करते हुए ब्लड सेंटर की नवीनतम तकनीक के बारे में विस्तार से जानकारी दी। डॉक्टर्स एसोसिएशन के अध्यक्ष डॉ.सुधीर काबरा ने इस रोगी सेवा की सराहना की और उनके अच्छे स्वास्थ्य की कामना की। धरनगांव डॉक्टर एसोसिएशन के अध्यक्ष डॉ. मिलिंद दहाले ने संकट के समय रक्त की कमी से होने वाली कठिनाइयों और इस भंडारण केंद्र के लाभ पर अपनी शुभकामनाएं व्यक्त कीं। सखाराम जोशी फाउंडेशन संग्राम जोशी एवं संदीप जोशी ने रक्तदान जागरूकता पर गीत प्रस्तुत किया। ब्रह्माकुमारी केंद्रीय विश्वविद्यालय की पुष्पादीदी ने इस रोगी देखभाल की कामना की और आशीर्वाद दिया रेडक्रॉस उपाध्यक्ष गनी मेमन ने रेडक्रॉस के माध्यम से चल रही सभी गतिविधियों की जानकारी दी तथा भविष्य में रेडक्रॉस के माध्यम से किये जाने वाले सभी सेवा कार्यों की भी जानकारी दी। मदर हॉस्पिटल के निदेशक डॉ. किरण पाटिल ने इस रोगी सेवा का अवसर देने के लिए रेड क्रॉस के प्रति आभार व्यक्त किया और आश्वासन दिया कि यशोदय ब्लड स्टोरेज के माध्यम से रोगी सेवा 24 घंटे जारी रहेगी और उपस्थित लोगों को धन्यवाद दिया। उपस्थित सभी महानुभावों द्वारा यशोदय ब्लड स्टोरेज सेंटर का उद्घाटन किया गया। इस कार्यक्रम में उपस्थित एरंडोल, पारोला धरणगांव, कसोदा, भडगांव के सभी सेवारत डॉक्टरों और रक्तदान शिविर आयोजकों को पल्स ऑक्सीमीटर देकर सम्मानित किया गया। साथ ही, एरंडोल तालुका के सभी अस्पतालों के पैरामेडिकल स्टाफ को हाइजेनिक किट उपहार में दिए गए। कार्यक्रम का संचालन जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा ने किया।

# मनपा, सागर मित्र अभियान घडवताहेत परिवर्तनाचे दूत




घरातील स्वच्छ कोरडे व रिकामे प्लास्टिक संकलन वाहनात जमा करताना विद्यार्थी.

**प्रतिनिधी** | जळगाव

खुबचंद सागरमल माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी सागर मित्र अभियानाचे समन्वयक विशाल सोनकुळ यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत घरातील स्वच्छ कोरडे व रिकामे प्लास्टिक जमा करून दर महिन्याला विद्यार्थी शाळेत जमा करत आहे. या स्वच्छता संस्कारातून प्लास्टिक कचरा जमा करण्याच्या प्रक्रियेतून विद्यार्थी परिवर्तनाचे दूत बनतील हा उद्देश आहे.

प्लास्टिकमुळे नद्या, नाले, समुद्र प्रदूषित होत असून जमिनीचा पोत खराब होत आहे. तसेच पक्षी, प्राणी, मासे, इतर जलचर अशा मुक्या जनावरांना पण त्यापासून इजा व मृत्यू होत आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून खुबचंद सागरमल विद्यालयात विद्यार्थी प्लास्टिक कचरा संकलित करून अभियानाच्या संकलन वाहनात हा प्लास्टिक कचरा नियमित देत आहे. या अभियानात सर्व प्लास्टिक कचरा रिसायकलिंगसाठी बियाणी पालीमर्स व संकलनासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे सहकार्य आहे. मुख्याध्यापिका योगिनी बेंडाळे व हरित सेना प्रमुख प्रवीण पाटील यांच्या सहकार्याने हे अभियान राबवीत आहे.

# रक्ताचा तुटवडा: रक्तदान महाअभियान सुरू

## रोटरी वेस्ट, रेडक्रॉस सोसायटीचा अभिनव उपक्रम; शहरात घेण्यात आले तीन शिबिर

**प्रतिनिधी** | जळगाव

रक्ताचा तुटवडा दूर करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्ट आणि इंडियन रेडक्रॉस सोसायटीने रक्तदान महाअभियान हाती घेतले आहे. या अभियानाची महाराष्ट्र दिनापासून सुरुवात करण्यात आली. तीन ठिकाणी आयोजित रक्तदान शिबिरात ५० पेक्षा जास्त व्यक्तींनी रक्तदान केले.

महाअभियानातील पहिले शिबिर १ रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे झाले. जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस सोसायटीचे अध्यक्ष आयुष प्रसाद यांनी या शिबिराला भेट दिली. या वेळी रोटरीचे डीजीएनडी डॉ. राजेश पाटील, अध्यक्ष सरिता खाचणे, मानद सचिव मुनिरा तरवारी, प्रकल्प प्रमुख हितेश मंडोरा, रेडक्रॉसच्या उज्ज्वला वर्मा हे उपस्थित होते. सायंकाळी शाहूनगर येथे प्रॅक्टिसिंग व्हॅल्युअर्स असोसिएशनच्या सहकार्याने दुसरे शिबिर झाले. गुरुवारी नवीपेठेतील सराफी व्यावसायिक व रोटरी वेस्टचे घमेंडीराम सोनी यांच्या सहकार्याने तिसरे शिबिर झाले.



रक्तदान महाअभियानाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आदी.

**नागरिकांना आवाहन :** उन्हाळ्यातील रक्ताचा तुटवडा दूर करण्यासाठी आयोजित या अभियानात ज्या धार्मिक, सामाजिक संस्था, बँका, अपार्टमेंट - कॉलनी, मित्र मंडळ यांना शिबिर आयोजित करावयाचे असेल, त्यांनी रोटरी वेस्टचे हितेश मंडोरा व रेडक्रॉसच्या कार्यालयात उज्ज्वला वर्मा यांच्याशी संपर्क साधावा.

# रेडक्रॉस : २५०० बॅचेसचे मतदारांना केले वितरण



इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगावतर्फे शहरात ठिकठिकाणी सेल्फी पॉइंट्ससह २५०० बॅच वितरणाचा उपक्रम राबवण्यात आला. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी मतदान करणाऱ्या रेडकॉस पदाधिकारी, सभासद, कर्मचाऱ्यांसोबत फोटो काढला. या वेळी रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, चेअरमन विनोद बियाणी, रक्त केंद्र चेअरमन डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी, आपत्ती व्यवस्थापन चेअरमन सुभाष सांखला आदींसह सभासद, कर्मचारी, स्वयंसेवक, उत्साही मतदार परिवारासह उपस्थित होते.

लोकमत



दीपप्रज्वलनाप्रसंगी डॉ.रुपेश खंदाडे, मुनीरा तरवारी,सरीता खाचणे, सुनील सुखवाणी, गनी मेमन आदी.

# 'सोरायसिस' बद्दल व्याख्यानातून मार्गदर्शन

## रेडक्रॉस सोसायटी व रोटरी वेस्टतर्फे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** इंडियन रेडक्रॉस सोसायटी आणि रोटरी क्लब वेस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सोरायसिस आजाराविषयी अडचणी व माहिती याविषयी व्याख्यान झाले. यवतमाळचे दारव्हा येथील डॉ. रूपेश खंदाडे यांनी या आजाराबाबत माहिती दिली.

प्रास्ताविक रेडक्रॉस रक्तकेंद्राचे चेअरमन डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी यांनी केले. रोटरी क्लब जळगाव वेस्टच्या अध्यक्षा सरिता खाचणे यांनी डॉ.रुपेश खंदाडे यांचा परिचय करून दिला. उपाध्यक्ष गनी मेमन यांनी रेडक्रॉस आणि रोटरीच्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

डॉ.रुपेश खंदाडे यांनी सोरायसिसबाबत माहिती देताना सांगितले की, सोरायसिस हा आजार योग्य उपचाराने पूर्ण बरा होऊ शकतो. काही रुग्णांच्या बाबतीत हा आजार पूर्ण बरा होत नसला तरी मधुमेह, रक्तदाब, थायरॉइड यासारख्या आजारांप्रमाणे हा आजारही नियंत्रित राहू शकतो. परंतु कोणत्याही संभ्रमांना बळी न पडता या आजारावर योग्य पद्धतीने औषधोपचार करावा.

या कार्यक्रमासाठी रोटरी वेस्टच्या सचिव मुनीरा तरवारी, सुनील सुखवानी, अनिल कांकरिया, रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी, प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण तिवारी, डॉ.राजेश सुरळकर, महेश सोनगिरे, संजय साळुंके उपस्थित होते.

सूत्रसंचालन रेडक्रॉसच्या जनसंपर्क अधिकारी उज्ज्वला वर्मा यांनी केले तर रोटरीचे विनीत जोशी यांनी आभार मानले.

# रेडक्रॉस ब्लड सेंटर और रोटरी क्लब जलगांव पश्चिम द्वारा मनाया गया विश्व रक्तदाता दिवस

## कलेक्टर आयुष प्रसाद ने स्वयं रक्तदान कर दिया रक्तदान का संदेश

क्राइम बुलेट न्यूज

जलगांव/संवाददाता। 14 जून 2024 को दुनिया भर में विश्व रक्तदाता दिवस के रूप में मनाया जाता है। इस दिन को मनाने का यह 20वां वर्ष है और ।धन्यवाद रक्तदाता..!। की अवधारणा के अनुसार इस वर्ष यह दिन सभी रक्तदाताओं को धन्यवाद देकर मनाया गया। विश्व रक्तदाता दिवस के अवसर पर रेडकोस ब्लड सेंटर और रोटरी क्लब जलगांव वेस्ट ने जिले में चार स्थानों पर रक्तदान शिविर का आयोजन किया। इस रक्तदान शिविर का शुभारंभ कलेक्टर कार्यालय में जिला कलेक्टर एवं



रेड क्रॉस के पदेन अध्यक्ष मा. श्री आयुष प्रसाद (आईएएस) ने स्वयं रक्तदान कर पूरे समाज को रक्तदान का संदेश दिया। आधार पर, कलेक्टर ने सभी रक्तदान शिविर आयोजकों और रक्तदाताओं को धन्यवाद दिया। इस अवसर पर रेडक्रॉस के उपाध्यक्ष श्री. गनी मेमन ने यह इच्छा भी व्यक्त की कि वर्ष के दौरान अधिक से अधिक रक्तदाता स्वयं रक्तदान कर रक्तदान करें। इस अवसर पर जिला परिषद के मुख्य कार्यकारी अधिकारी श्री।अंकित, रेडक्रॉस अध्यक्ष श्री.विनोद बियानी ब्लड सेंटर के चेयरमैन डॉ. प्रसन्न कुमार रेडासानी, कार्यकारिणी सदस्य श्री. अनिल शिरसाले, रोटरी क्लब जलगांव पश्चिम अध्यक्ष श्रीमती सरिता खाचाने, सचिव श्रीमती मुनीरा तरवारी, परियोजना प्रमुख श्री हितेश मंडोरा, श्री. डॉ. राहुल मोदियानी, संयुक्त प्रशासनिक अधिकारी। राजेश सुरालकर आदि गणमान्य नागरिक उपस्थित थे।

लोकमत

पावसाळ्यात घसरताना दिसत आहे. असल्याचे दिसून आले आहे.

# जळगाव सी.ए शाखेतर्फे सी.ए दिनानिमित्त रक्तदान शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** सी.ए. शाखेच्या वतीने सी.ए. दिवस आयसीएआय भवन गजानन कॉलनी येथे साजरा करण्यात आला. यावेळी जळगाव सी.ए. शाखेचे अध्यक्ष सी.ए. अभिषेक कोठारी यांच्या हस्ते सी.ए. असोसिएशनचा झेंडा फडकविण्यात आला. यावेळी सी.ए. विद्यार्थी शाखा अध्यक्ष हितेश आगीवाल, सचिव रोशन रुणवाल, खजिनदार सोहन नेहेते, माजी अध्यक्ष ममता केजरीवाल, विकी बिर्ला उपस्थित होते.

डॉ. नितीन धांडे व डॉ. श्रद्धा पाटील यांचे हेल्थ गाईड या विषयावर मार्गदर्शनपर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी सी.ए. सदस्यांकरिता मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

यानंतर रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा अधिकाधिक सदस्यांसह सी.ए. विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. सी.ए. सदस्यांसाठी व विद्यार्थ्यांसाठी अहिराणी कलाकार प्रवीण माळी यांनी एकपात्री नाटकाचे सादरीकरण केले.

# रोटरी वेस्टतर्फे ६० दिवसांत ४५ रक्तदान शिबिरे; १६५१ रक्त पिशव्यांचे संकलन

प्रतिनिधी | जळगाव



जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांचा सन्मान करताना डॉ. राजेश पाटील आदी.

रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टने इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव यांच्या सहकार्याने ६० दिवसांत ४५ शिबिरांचे आयोजन करून १६५१ रक्त पिशव्यांचे संकलन केले. रोटरी वेस्टतर्फे दरवर्षी मे महिन्यात रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी दोन महिने रक्तदान महा अभियान राबवते. तसेच दर तीन महिन्यांनी एक असे वर्षात चार शिबिरांचे आयोजन करते.

यंदा १ मे ते ३० जून या कालावधीत १६५१ रक्त पिशव्या संकलित केल्या. या अभियानाचा शुभारंभ जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी रक्तदान करून केला. रोटरी वेस्टच्या सदस्यांनी आपापल्या इंडस्ट्रीज, ऑफिसेस, हॉस्पिटल, क्लासेस, बँका, शॉपिंग कॉम्प्लेक्स, अपार्टमेंट, कॉलनी आणि विविध संस्था व शासकीय कार्यालयात ही शिबिरे आयोजित केली होती. हे अभियान रोटरीचे डीजीएनडी डॉ. राजेश पाटील, वेस्टच्या अध्यक्षा सरिता खाचणे, मानद सचिव मुनिरा तरवारी, रेडक्रॉसचे गनी मेमन, विनोद बियाणींच्या मार्गदर्शनात प्रकल्प प्रमुख हितेश मंडोरा यांनी हे महाअभियान यशस्वी केले.

# रेडक्रॉस शाखा ने नेत्र परीक्षण वैन के उद्घाटन के साथ मनाई 71वीं वर्षगांठ

- 85 विद्यार्थियों की हुई आंखों की जांच
- पढ़ाई पर पूरा फोकस ही दिला सकता है सफलता : कलेक्टर



संवाददाता/जलगांव। भारतीय रेडक्रॉस सोसायटी जिला शाखा आज अपनी सेवा के 71 वर्ष पूरे कर रही है। आज तक संस्था के सभी प्रशासनिक अधिकारियों, पदाधिकारियों, निदेशक मंडल, सदस्यों, कर्मचारियों, स्वयंसेवकों, रक्तदाताओं की सेवा भावना एवं अथक प्रयासों से संस्था के सेवा कार्यों का विशाल वट वृक्ष सेवा के लिए तैयार है। रक्तदान शिविर आयोजक मांगीलाल बाफना द्वारा रेड क्रॉस वर्षगांठ वैन का उद्घाटन, रेडक्रॉस फिरते नेत्रालय वैन, छात्रों की आंखों की जांच, जरूरतमंद छात्रों और सीनियर को स्वच्छता किट का वितरण। अन्नासाहेब सागरमल सांखला शहरी सहकारी समिति के सहयोग से विद्यालय सामग्री वितरण कार्यक्रम का आयोजन किया गया। जलगांव जिला परिवीक्षाधीन कलेक्टर वेवो मैडम, रतनलाल सी.बाफना फाउंडेशन ट्रस्ट के निदेशक सिद्धार्थ बाफना,रेडक्रॉस के उपाध्यक्ष गनी मेमन, अध्यक्ष विनोद बियानी, आपदा प्रबंधन समिति के अध्यक्ष सुभाष सांखला, कार्यकारी सदस्य डॉ. अपर्णा मकासरे पुष्पताई भंडारी, शारदा मा. विद्यालय का शिक्षण स्टाफ एवं विद्यार्थी उपस्थित थे। कार्यक्रम की शुरूआत करते हुए अध्यक्ष विनोद बियानी ने सभी सेवा गतिविधियों की जानकारी दी और सभी को वर्षगांठ की शुभकामनाएं दीं। गनी मेमन ने अपनी संवेदनाएं व्यक्त करते हुए इन शब्दों में अपनी भावनाएं व्यक्त कीं कि उन्हें जीवन में किसी की वजह से कष्ट पहुंचाए बिना उसे खुश करने का प्रयास करते रहना चाहिए। कलेक्टर वीवो मैडम ने विद्यार्थियों को बधाई देते हुए कहा कि यदि आप पढ़ाई पर ध्यान देंगे तो अपने लक्ष्य को आसानी से प्राप्त कर सकेंगे। उन्होंने रेडक्रॉस संस्था के सेवा कार्यों के लिए शुभकामनाएं देते हुए सभी को बधाई दी। इस अवसर पर सभी विद्यार्थियों को पाठ्य सामग्री, हाइजेनिक किट उपहार में दी गई। सीनियर मांगीलाल बाफना रेडक्रॉस फि रते नेत्रालय वैन का उद्घाटन गणमान्य अतिथियों द्वारा किया गया इस अवसर पर शारदा माध्यमिक विद्यालय के 85 विद्यार्थियों ने अपनी आँखों की जाँच कराई। कार्यकारिणी सदस्य डॉ. अपर्णा मकासरे ने रेडक्रॉस का समर्थन करने वाले सभी लोगों का उल्लेख किया और उन्हें धन्यवाद दिया। कार्यक्रम का संचालन पीआरओ उज्वला वर्मा ने किया। प्रशासनिक अधिकारी लक्ष्मण तिवारी, डॉ.राजेश सुरालकर,नेत्र रोग विशेषज्ञ डॉ.उल्हास खेड़कर,महेश सोनगिरे, संजय सालुंके ने कड़ी मेहनत की।

# देश में हर साल किडनी रोग के दो लाख मरीज : डॉ. सुधीर कुलकर्णी

## मेरी किडनी, मेरी देखभाल पर व्याख्यान आयोजित

क्राइम बुलेट न्यूज



जलगांव/सुरेश कोहली । वैसे तो दस हजार लोगों में से एक व्यक्ति किडनी रोग से पीड़ित होता है, लेकिन देश में हर साल किडनी रोग के दो लाख नए मरीज पाए जाते हैं। प्रसिद्ध किडनी रोग विशेषज्ञ डॉ.सुधीर कुलकर्णी (संबाजीनगर) द्वारा प्रस्तावित। गुरुपूर्णिमा के अवसर पर मायादेवी नगर स्थित रोटरी भवन में भारतीय रेडक्रॉस सोसायटी जलगांव, कै.वैद्य भालचंद्र शंकर जागीरदार फाउंडेशन और रोटरी क्लब ऑफ जलगांव वेस्ट द्वारा आयोजित ‡मेरी किडनी, मेरी देखभाल‡ विषय पर सार्वजनिक व्याख्यान का मार्गदर्शन करते हुए। कुलकर्णी बोल रहे थे।

पूर्व कलेक्टर ज्ञानेश्वर राजुरकर, डॉ. शशिकांत गाजरे, रेड क्रॉस जलगांव के उपाध्यक्ष गनी मेमन, अध्यक्ष विनोद बियानी, जागीरदार फाउंडेशन के अध्यक्ष डॉ.जयंत जाहगीरदार, रोटरी जलगांव पश्चिम के अध्यक्ष विनीत जोशी प्रमुख रूप से उपस्थित थे। डॉ.सुधीर कुलकर्णी ने जानकारी देते हुए बताया कि हमारा शरीर एक ईश्वरीय उपहार है और हमें हर बीमारी की पहले से सूचना दे देता है. किडनी की बीमारी को लेकर नागरिकों के मन में काफी डर रहता है और किडनी शरीर में पानी को रिसाइकल करने, खून बनाने और ब्लड प्रेशर को नियंत्रित करने के लिए जिम्मेदार होती है। कई बार व्यायाम की कमी, तनाव, पानी पीने से किडनी पर बुरा असर पड़ता है।

तीस से चालीस प्रतिशत मधुमेह रोगियों और उच्च रक्तचाप वाले रोगियों में किडनी फेल होने का खतरा अधिक होता है। लक्षण दिखते ही सही जांच कराकर अपनी किडनी को स्वस्थ रखा जा सकता है इसके अलावा किडनी दान के लिए कोई उम्र सीमा नहीं है क्योंकि एक किडनी के साथ भी व्यक्ति अच्छा जीवन जी सकता है। 100 में से केवल एक मरीज को किडनी डोनर मिलता है। अतः उन्होंने अंगदान के महत्व को समझकर अंगदान आंदोलन को मजबूत करना आवश्यक बताया और उपस्थित नागरिकों की शंकाओं का समाधान किया। प्रारंभ में दीप प्रज्ज्वलन एवं धन्वन्तरि भजन प्रस्तुत किये गये। परिचय डॉ.जयन्त जागीरदार एवं गनी मेमन ने रेडक्रॉस के कार्यों की जानकारी दी। मुख्य वक्ता डॉ.कुलकर्णी का अभिनंदन ज्ञानेश्वर राजुरकर ने किया। मॉडरेटर डॉ.आनंद दशपुत्रे ने विनीत जोशी को धन्यवाद दिया। इस कार्यक्रम के लिए रेडक्रॉस कार्यकारी सदस्य शांताताई वाणी सहित रोटरी वेस्ट एवं रेडक्रॉस के अधिकारी एवं कर्मचारी बड़ी संख्या में उपस्थित थे।

लोकमत

# पोलिस अधीक्षकांसह १०४ कर्मचाऱ्यांचे रक्तदान



रक्तदान करताना डॉ. महेश्वर रेड्डी. सोबत गनी मेमन, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** कारगिल विजय दिनानिमित्त जिल्हा पोलिस दल व इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने पोलिस अधिकारी, अंमलदारसाठी पोलिस मुख्यालयात आयोजित शिबिरात १०४ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार शिंदे, राखीव पोलिस निरीक्षक प्रशांत सुगरवार यांच्यासह पोलिस स्टेशन प्रभारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. अपर पोलिस अधीक्षक अशोक नखाते, पोलिस उपअधीक्षक (गृह) प्रमोद पवार, उपविभागीय पोलिस अधिकारी संदीप गावीत, पोलिस निरीक्षक दीपक बुधवंत, राखीव पोलिस निरीक्षक प्रशांत सुगरवार तसेच इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे उपाध्यक्ष गनी मेमन, हितेश मंडोरा, उज्ज्वला वर्मा यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

**महिला कर्मचाऱ्यांचा सहभाग**

जयश्री मराठे, अलका मोरे, उर्मिला निकुंभ, अश्विनी निकम, जागृती काळे, मीरा देशमुख, दीप्ती खडके, आरती कुमावत, सोनाली मेटकर, संगीता झोपे, मोनाली भोई आदी महिला पोलिस कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

शिबिरासाठी पोलिस उपनिरीक्षक रेश्मा अवतारे, पोलिस उपनिरीक्षक मंगल पवार, पोलिस उपनिरीक्षक रामेश्वर सोळंके, पोलिस उपनिरीक्षक देविदास वाघ, पोलिस उपनिरीक्षक रावसाहेब गायकवाड, पो.हे.कॉ. सतीश देसले यांनी परिश्रम घेतले.

# ॲनिमिया, हिमोग्लोबीनविषयी जनजागृती



कार्यकारिणीच्या सत्कारप्रसंगी डॉ. सुमन लोढा, यामिनी भाटिया, डॉ. धनश्री चौधरी, वैभव चत्रभुज, सौरभ माळी.

प्रतिनिधी | जळगाव

केसीई संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनिजमेंट अँड रिसर्चमध्ये यूथ रेडक्रॉसतर्फे ॲनिमिया आणि हिमोग्लोबीन विषयी जागृतीपर कार्यशाळा व रक्तदान शिबिर झाले.

डॉ. सुमन लोढा यांनी सर्व विद्यार्थ्यांशी बोलताना ॲनिमिया कसा कमी करायचा आणि हिमोग्लोबीनचे प्रमाण कसे समतोल राखायचे, याविषयी मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, फास्ट फूड कमी करा, त्यातून तुम्हाला आवश्यक असे काहीही मिळत नाही, तर पालक, बीट, गाजर, फळे यांचे प्रमाण वाढवा. आठवड्यातून दोन-तीनदा तरी सफरचंद खा. धावपळीच्या नित्यक्रमात चिप्स, कुरकुरे न खाता सफरचंद खा. तितकाच वेळ लागेल. नियमित व्यायाम करा. खेळाडू असाल तरीही मासिक पाळीच्या वेळी आहार सांभाळून कार्यरत रहा. मासिक पाळी पुढे मागे करणाऱ्या गोळ्यांचा वापर टाळा असेही त्यांनी सांगीतले. सहसचिव सौरभ माळी याने सूत्रसंचालन केले.

### कार्यकारिणीचा सत्कार...

आयएमआर यूथ रेडक्रॉसच्या नवीन कार्यकारिणीतील अध्यक्ष यामिनी भाटिया, उपाध्यक्ष डॉ. धनश्री चौधरी, कोषाध्यक्ष डॉ. दीपाली पाटील, सचिव वैभव चत्रभुज, सहसचिव सौरभ माळी, इतर बोर्ड ऑफ डायरेक्टर प्रज्ञा पाटील, चेतना पाटील, हिमानी शर्मा यांचा सत्कार करण्यात आला.

दैनिक सामान्य जनतेच्या हक्काचं विचारपीठ पोस्टल परवाना क्रं.JAL/ 270/2022-2024

# पुण्य प्रताप

MAHMAR/2011/41238 जळगाव-मंगळवार दि.१० डिसेंबर २०२४ ■ (वर्ष-१३ वे अंक-२२८) ■ पृष्ठे ४ ■ किंमत १ रूपया

जळगाव, नवी मुंबई, रायगड, ठाणे,मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

Email-dailypunyapratap@gmail.com इंटरनेटआवृत्ती www.dainikpunyapratap.com

कार्यकारी संपादक (महाराष्ट्र) अविनाश वसंतराव पाटील मो.९८८१२७७४७७

## रेडक्रॉस संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने दिव्यांगांच्या रोजगारासाठी प्रथमच विशेष मोहीमेचे आयोजन

जळगाव-३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिनाच्या निमीत्ताने इंडियन रेडक्रॉस सोसायटी, संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र जळगाव, समाजकल्याण विभाग, जि. प. जळगाव यांच्या विद्यमाने विविध उपक्रमाचे आयोजन दिनांक ७ डिसेंबर २०२४ रोजी, रोटरी भवन जळगाव येथे करण्यात आले.

सदर कार्यक्रमात जिल्ह्यातील दिव्यांग उमेदवारांकरीता जिल्ह्यातील २० विविध कंपन्या व उद्योजक यांच्या सहभागाने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. तसेच ज्या संस्थानी दिव्यांगांना रोजगार उपलब्ध करुन दिला अशा १० कंपन्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच दिव्यांगांसाठी कार्य करणा-या जिल्ह्यातील ५० विविध सामाजिक संस्थाचा देखील सन्मान करण्यात आला. गरजु दिव्यांगांना सहाय्यक साहित्याचे वाटप या प्रसंगी करण्यात आले. दिव्यांगांसाठी 'शासकीय कल्याणकारी योजनांचे' माहितीपत्रक व भितींपत्रक यांचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच दिव्यांग बालकांना मोफत फिजीयोथेरेपी देणा-या तज्ञांचा सन्मान करण्यात आला. अशा विविध व नाविन्यपुर्ण उपक्रमाचे आयोजन दिन विशेष निमीत्ताने करण्यात आले.



कार्यक्रम प्रसंगी निवासी जिल्हाधिकारी श्री. भिमराज दराडे यांनी जिल्ह्यात प्रथमच दिव्यांगांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले त्याबद्दल त्यांनी सर्व कंपन्या व आस्थापना यांचे विशेष आभार मानले. भविष्यात दिव्यांगांसाठी विकासासाठी अशा पायाभूत सेवा सुविधांवर अधिक भर देण्याची गरज असल्याचे व दिव्यांगांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासन देखील कटीबद्ध राहील असे सांगितले. जिल्हा समाजकल्याण अधिकारी श्री. विजय रायसिंग यांनी देखील रोजगाराचा उपक्रम हा कायमस्वरुपी राबविण्यासाठी प्रयत्नशील राहू असे प्रतिपादन केले. तसेच जिल्ह्यातील दिव्यांगांसाठी काम करणा-या सामाजिक संस्थाचा देखील दिव्यांगांच्या विकासात मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. रेडक्रॉस चे उपाध्यक्ष श्री.गनी मेमन यांनी जिल्ह्यातील दिव्यांगांच्या कल्याणासाठी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून निरंतर विकासाचे कार्य करीत असल्याचे व त्यांच्या समस्या कार्यतत्परतेने सोडवण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहु असे सांगितले.

प्रास्ताविकात श्री. जी. टी. महाजन यांनी मागील १० वर्षात जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून विविध उपक्रम व सेवांच्या माध्यमातून दिलेल्या लाभाचे विवचन केले. जिल्ह्यातील दिव्यांगांच्या विकासात दिव्यांग पुनर्वसन केंद्राचा मोलाचा आणि महत्वाचा वाटा असून सदर केंद्र अधिक सक्षम करण्यासाठी ह्या केंद्राच्या समस्या देखील सोडविणे ही काळाजी गरज असल्याचे सांगितले.

व्यासपिठावर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे निवासी जिल्हाधिकारी श्री. भिमराज दराडे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी श्री. विजय रायसिंग, उप जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. आकाश चौधरी, डॉ. उल्हास पाटील फिजीयोथेरेपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर, रेडक्रॉस चे उपाध्यक्ष श्री. गनी मेमन, कार्यकारिणी सदस्य सौ. पुष्पाताई भंडारी, नोडल अधिकारी श्री. जी. टी. महाजन, समाज कल्याण दिव्यांग विभागाच्या प्रमुख श्रीमती. माधुरी भागवत, स्वयंदीप प्रकल्पाच्या संचालिका श्रीमती. मिनाक्षी निकम, मुक्ती फाऊंडेशनचे श्री. मुकुंद गोसावी, युथ फॉर जॉबचे श्री. महेंद्र पाटील उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील विविध सामाजिक दिव्यांग संस्था, संघटना यांचे प्रतिनीधी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे श्री. एस. पी. गणेशकर, सौ. सुवर्णा चव्हाण रेडक्रॉसचे श्री. लक्ष्मण तिवारी, सौ. उज्वला वर्मा, मनोज वाणी, योगेश सपकाळे, समाधान वाघ तसेच सामाजिक संस्थेचे अनेक पदाधिकारी यांनी विशेष परीश्रम घेतले.

# माऊली फाउंडेशनच्या वतीने भडगावात सलग आठव्या वर्षी रक्तदान शिबिर संपन्न, १११ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग



[illegible]

# रेडक्रॉसतर्फे ५०० नागरिकांची तपासणी

प्रतिनिधी | जळगाव

रेडक्रॉस व ओरिएंट सिमेंट लिमिटेडच्या सी.एस.आर.अंतर्गत जळगाव खुर्द येथे मोफत आरोग्य शिबिर झाले. यात ७७ ज्येष्ठ नागरिकांचे शुगर व ब्लड प्रेशर, १२९ विद्यार्थ्यांचे रक्तगट तर ६९ महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. या व्यतिरिक्त सर्व स्पेशालिस्ट डॉक्टरांनी विविध आजारांच्या २९१ तपासणी करून रुग्णांना औषधे दिली. यात १६ नागरिकांच्या मोफत मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहे.

शिबिरात सर्व शालेय विद्यार्थिनी व महिलांना मासिक पाळी दरम्यान आरोग्याची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करून त्यांना सॅनिटरी नॅपकीन वितरित करण्यात आले. या वेळी ओरिएंट लिमिटेड वर्क्सचे व्हाइस प्रेसिडेंट अतुल अग्रवाल, रेडक्रॉसचे चेअरमन विनोद बियाणी, सेक्रेटरी सुभाष सांखला, सह प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेश सुरळकर, दिनेश पाटील आदी उपस्थित होते. अग्रवाल यांनी भविष्यातही सामाजिक उपक्रम राबवले जातील असे सांगितले.



शिबिरात तपासणी करताना डॉक्टर.

## नागरिकांना आरोग्य टिप्स

शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. कृष्णा राठोड, ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. स्नेहल बम्बोडे, दंतरोग तज्ज्ञ डॉ. देवेंद्रप्रताप सिंग, कान-नाक- घसा तज्ज्ञ डॉ. अरविंद चौधरी, डोळे तपासणी तज्ज्ञ डॉ. गौरव वावळे, डॉ. रोहित काळे यांनी तपासणी केली. तसेच नागरिकांना आरोग्याविषयी टिप्स दिल्या.

दैनिक सामान्य जनतेच्या हक्कांचं व्यासपीठ पोस्टल परवाना क्र.JAL/ 270/2025-2027

पुण्य प्रताप

MAHMAR/2011/41238

जळगाव, नवी मुंबई, रायगड, ठाणे,मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

Email-dailypunyapratap@gmail.com www.dainikpunyapratap.com

# मानवता हीच खरी ईश्वर सेवा, याच भावनेतून अखंडितपणे रेडक्रॉस कार्य करत राहू – रेडक्रॉस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या भावना

जळगाव – इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखेमार्फत जागतिक रेडकॉस दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी उपाध्यक्ष गनी मेमन, चेअरमन विनोद बियाणी, सेक्रेटरी सुभाष सांखला, रक्तकेंद्र चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, नोडल ऑफिसर घनश्याम महाजन, कार्यकारीणी सदस्य धनंजय जकातदार, हर्षद भाई दोशी, सौ पुष्पा भंडारी, डॉ. उषा शर्मा इत्यादी मान्यवर, न्यूअल असोसिएट्स आणि कर्मचारी उपस्थित होते.

सर्व मान्यवरांच्या हस्ते रेडक्रॉसचे जनक सर हेनरी ड्यूनांट यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून रेडक्रॉस गीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रेडकॉसचे चेअरमन श्री. विनोद बियाणी यांनी सर्वांना रेडक्रॉस शुभेच्छा देत मागील ७२ वर्षात संस्थेमार्फत राबविण्यात आलेले उपक्रम व सुरू असलेल्या सुविधा याबाबत विस्तृत माहिती दिली. रेडक्रॉस रक्तकेंद्राचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी रेडक्रॉस रक्तकेंद्रातील अद्ययावत तंत्रज्ञानाबाबत माहिती देत माननीय जिल्हाधिकारी तथा



रेडक्रॉस अध्यक्ष यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या ऑपरेशन सिंदूर रक्तदान अभियानाबाबत माहिती दिली. आयएमएचे अध्यक्ष व रेडक्रॉसचे कार्यकारीणी सदस्य डॉ. शशिकांत गाजरे यांनी सर्वांना जागतिक रेडक्रॉस दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

रेडक्रॉसचे उपाध्यक्ष श्री. गनी मेमन यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आयुष्यात प्रत्येक माणसाने मानवतेच्या भूमिकेतून आपापल्या परीने इतरांना सहकार्य करत रहावे आणि शक्य तेवढी समाज सेवा करत सामाजिक बांधिलकी जपावी अशा शब्दात जागतिक रेडक्रॉस दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपूर्ण वर्षभर उत्कृष्ट सेवा देणाऱ्या सिनियर लेखापाल श्री. महेश सोनगिरे आणि टेक्निकल सुपरवायझर सौ. रोहिणी देवकर यांना श्रीमती सरला दाते पुरस्कार प्रदान करण्यात आला. वर्षभरात रेडक्रॉसच्या सेवा उपक्रमात आर्थिक व साहित्य रुपये योगदान देणाऱ्या दातृत्वदात्यांचा गौरव करण्यात आला. सर्व शासकीय आरोग्य उपक्रम प्रत्येक घरापर्यंत पोहोचविणाऱ्या आशा वर्कर्स यांचा ही सन्मान करण्यात आला.

आज जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त भवन येथे डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी यांच्या सहकार्याने विनामूल्य फिजियोथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा १६ नागरिकांनी लाभ घेतला.तसेच रेडक्रॉसमार्फत खुर्ची द्वारे मसाज शिबिराचे आयोजनही करण्यात आले. याचा ५७ नागरिकांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा यांनी केले, सर्वांचे आभार घनश्याम महाजन यांनी व्यक्त केले.

दैनिक पुण्य प्रताप
MAHMAR/2011/41238
JAL/ 270/2025-2027
जळगाव, नवी मुंबई, रायगड, ठाणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक
Email-dailypunyapratap@gmail.com www.dainikpunyapratap.com

# जागतिक रेडक्रॉस दिन सप्ताहानिमित्त रक्तकेंद्राचा अभिनव उपक्रम
## कपल ब्लड डोनेशन अभियान ; आयुष्याचे साथीदार – रक्तदानाचे जोडीदार

जळगाव – रेडक्रॉस जळगाव शाखेमार्फत जागतिक रेडक्रॉस दिन उत्साहात साजरा करण्यात येत आहे. यावर्षी आपण जागतिक रेडक्रॉस सप्ताह साजरा करण्याचा संकल्प केला आहे.

या अंतर्गत रेडक्रॉस अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मा. श्री. आयुष प्रसाद यांच्या संकल्पनेनुसार या सप्ताहानिमित्त दिनांक ८ मे २०२५ ते १५ मे २०२५ पर्यंत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यातील १० मे २०२५ हा दिवस आपण आयुष्याचे साथीदार – रक्तदानाचे जोडीदार ...! या संकल्पने अंतर्गत पती-पत्नीला जोडीने रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित करावयाचे आहे.




या उपक्रमात आपण योगदान देत आपले कुटुंब, मित्र परिवार किंवा आपल्या कार्यक्षेत्रातील सक्षम जोडप्यांना जोडीने रक्तदान करण्यासाठी प्रेरित करावयाचे आहे.

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर प्रत्येक पत्नी आपल्या पतीच्या सुखदुःखात साथ देत आपले कर्तव्य पार पाडत असते. परंतु अजून ही रक्तदानाच्या क्षेत्रात स्त्री सक्षमपणे पुढाकार घेत नाही. प्रत्येक पत्नीने आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावत रक्तदानाच्या सेवाकार्यात ही आपले कर्तव्य पार पाडावे या उद्देश्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

रक्तदानाच्या क्षेत्रात नवीन संकल्पनेचे स्वागत करूया, जास्तीत जास्त जोडप्यांनी दिनांक १० मे २०२५ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत रक्तदानासाठी स्वेच्छेने येऊन रेडक्रॉस रक्तकेंद्रात रक्तदान करावे, असे आवाहन इंडियन रेडक्रॉस सोसायटी रक्तकेंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

नवराष्ट्र

# 'ऑपरेशन सिंदूर' साठी रक्तदान
## कासोदा येथे राष्ट्रभक्तीने प्रेरित १०४ रक्तदात्यांमध्ये महिलांचाही सहभाग

**एरंडोल,** (वा.) एरंडोल तालुक्यातील कासोदा येथील स्वामी समर्थ केंद्रात १६ मे रोजी सकाळी ९ वाजेपासून 'ऑपरेशन सिन्दुर'च्या पार्श्वभूमीवर रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी सुमारे १०४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यात महिलांची संख्या लक्षणीय होती.

'ऑपरेशन सिंदूर ' या मोहिमेच्या निमित्ताने संपूर्ण भारतात जाज्वल्य राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडले.त्या अनुषंगाने आपला भारत देश व भारतीयांसाठी रक्तदान करून देशकार्यात आपले योगदान देण्यासाठी या रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.



विशेष म्हणजे एरंडोल तालुक्यातील बांभोरी खु.येथील शिक्षक तुषार वडगावकर यांच्या पत्नी अश्विनी वडगावकर व त्यांचा १८ वर्षाचा मुलगा कौस्तुभ वडगावकर यांनी सुरुवातीला सोबत रक्तदान केले. तसेच कासोदा परिसरातील अनेक देशभक्त युवक, युवती,महिला व नागरिकांनी शिबिरात उपस्थित राहून रक्तदान केले.

याप्रसंगी माजी सचिव मुंबई मंत्रालय म.राज्य व रेडक्रॉसच्या संचालिका ॲड. मंगला ठोंबरे, जळगाव रेडक्रॉसच्या पी.आर.ओ.उज्वला वर्मा, जि.प.निवृत्त जिल्हाआरोग्य अधिकारी व रेडक्रॉसचे वैद्यकीय अधिकारी डॉ.शंकरलाल सोनवणे, संचालक डॉ.नरेंद्र ठाकुर व राजेंद्र कोळी, सीमा शिंदे, मंगेश ओतारी, संजय साळुंखे व गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.

याप्रसंगी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद पाटील,माजी जि.प.सदस्या महानंदा पाटील,राहुल चौधरी,राहूल सोनवणे,महेश पाटील,सरीता मंत्री,उज्वला झंवर,उज्वला वर्मा,मंगला ठोंबरे,शैलेश पांडे,बापू सोनवणे,राहूल मराठे आदी उपस्थित होते.

# आंबेडकर उद्यानातील शिबिरात ३६ दात्यांचे रक्तदान



गणेश कॉलनी रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात गुरुवारी रक्तदान शिबिर झाले. यात ३६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रेडक्रॉसच्याऑपरेशन सिंदूर अंतर्गत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उद्यानातील आनंदी परिवार, पावर योगा व आयएमआर मैदान येथील हास्य परिवार सदस्यांसह व्यायामास येणाऱ्या नागरिकांनी रक्तदान केले. आमदार सुरेश भोळे, रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. प्रसन्न रेदासनी, डॉ. सुशील गुजर, पोलिस कॉन्स्टेबल विजयसिंग पाटील, राजकुमार वाणी यांनी मार्गदर्शन केले. सुरेश सोनवणे, अजय जाधव, बबनराव पोकळे, ऋषीकेष भदाणे, मनिषा पाटील व इतर पदाधिकारी आदींनी नियोजन केले.

**लोकमत**



रक्तदान प्रसंगी उपस्थित ज्ञानेश्वर ढेरे, सुरेश भोळे, निर्मला गायकवाड आदी.

# जळगावकरांच्या 'माणुसकीची' गर्दी

## महापालिका-रेडक्रॉसच्या रक्तदान शिबिरात शतक

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : महानगरपालिका आणि रेडक्रॉस सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने मनपा प्रशासकीय इमारतीत आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल १०३ दात्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन आमदार सुरेश भोळे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

**१०३**
दात्यांनी यावेळी रक्तदान करीत सहभाग नोंदविला.

## तात्काळ दाखले दिले

शिबिरात रक्तदात्यांनी मागणी केली, त्यांना अवघ्या काही मिनिटांत जन्म-मृत्यूचे दाखले देण्यात आले.

यावेळी मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, अतिरिक्त आयुक्त श्याम गोसावी, उपायुक्त पंकज गोसावी, उपायुक्त धनश्री शिंदे, उपायुक्त निर्मला गायकवाड, चंद्रकांत वानखेडे, डॉ. विजय घोलप, रेडक्रॉस सोसायटीतर्फे उपाध्यक्ष गनी मेमन, विनोद बियाणी, चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी उपस्थित होते.

## संत निरंकारी मंडळाच्या शिबिरात ६० जणांनी केले रक्तदान; उपस्थितांना केले मार्गदर्शन



संत निरंकारी मंडळाच्या शिबिरात रक्तदान करताना पदाधिकारी.

**जळगाव** | संत निरंकारी मंडळ शाखा जळगाव व इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे ऑपरेशन सिंदूर अंतर्गत संत निरंकारी मंडळातर्फे धुळे झोन ३६-बी अंतर्गत १८ मे रोजी संत निरंकारी सत्संग भवन शिरसोली रोड येथे दुपारी ४ ते ७ या वेळेत रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ६० जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन निरंकारी मंडळ जळगावचे संयोजक रमेशकुमार आहुजा यांनी केले. शिबिरासाठी ज्ञान प्रचारक राजकुमार वाणी, गंगाधर जोशी, सुधीर सोनार, रेडक्रॉस सोसायटीचे डॉ. चौधरी, डॉ. वर्मा यांचे सहकार्य लाभले.

**सिटी अँकर**

### 'ऑपरेशन सिंदूर'साठी शहरात ५० शिबिरे

## तीन आठवड्यांतच २१७१ बॅगा रक्तसाठा

**प्रतिनिधी** | जळगाव

ऑपरेशन सिंदूरसाठी जवानांना रक्ताची कमतरता भासू नये म्हणून शासनाने रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार यंदा प्रथमच मे महिन्यात जळगाव शहरात विक्रमी रक्तसाठा झाला. २२ दिवसांत ५० शिबिरे झाली. त्यात २१७१ बॅगा रक्तसंकलन झाले. गतवर्षापेक्षा ९३८ रक्तपिशव्या अधिक जमा झाल्या आहेत. गेल्यावर्षी शहरात तिन्ही प्रमुख रक्तपेढ्यांत १२३३ रक्तपिशव्यांचे संकलन झाले होते. तर यंदा २१७१ रक्तपिशव्या जमा झाल्या.



रेडक्रॉस येथे आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात स्वेच्छा रक्तदान करताना समृद्धी वैद्य व शेखर वैद्य.

**असा आहे आजचा रक्तसाठा**

| ब्लडग्रुप | रेडक्रॉस | गोळवलकर | जीएमसी |
|---|---|---|---|
| ए पॉझिटिव्ह | ११६ | ९ | ३६ |
| ए निगेटिव्ह | ९ | ५ | ५ |
| बी पॉझिटिव्ह | २१७ | २० | ६२ |
| बी निगेटिव्ह | १४ | २ | २ |
| ओ पॉझिटिव्ह | ३८६ | ३ | ३२ |
| ओ निगेटिव्ह | १३ | ३ | १ |
| एबी पॉझिटिव्ह | ७३ | १६ | १३ |
| एबी निगेटिव्ह | ७ | १ | ० |

**मे महिन्यातील रक्तसंकलन**

| रक्तपेढी | शिबिरे | बॅग |
|---|---|---|
| जीएमसी | १५ | २१४ |
| गोळवलकर | ०८ | ३१० |
| रेडक्रॉस | २७ | १६४७ |

**यंदा तुटवडा नाही :** गेल्यावर्षी मे महिन्यात रक्तदान शिबिरांची संख्या अतिशय कमी होती. रक्तपेढ्यात स्वेच्छेने जे दाते रक्तदान करायचे तेवढाच साठा व्हायचा. मात्र, यंदा शासकीय पातळीवर आवाहन करण्यात आल्याने तब्बल ५० शिबिरे गेल्या २२ दिवसांत झाली. त्यामुळे रक्तसाठा वाढला असल्याचे सांगण्यात येते आहे.

## धर्म • समाज • संस्था



## मलिक फाउंडेशनच्या शिबिरात ४०० रक्तदात्यांत ५० महिला

### शहरात ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ राबवला उपक्रम, सर्वधर्मीयांनी स्वेच्छेने केले रक्तदान, दात्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव

**प्रतिनिधी** | जळगाव

शहरात डॉ. अब्दुल गफ्फार मलिक फाउंडेशनतर्फे ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ महारक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यात सर्वधर्मीय ४०० दात्यांनी स्वेच्छा रक्तदान केले असून, यात ५० महिलांचा सहभाग होता, अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली. शनिपेठ येथे हे शिबिर घेण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून चोपड्याचे आमदार चंद्रकांत सोनवणे, ॲड. उज्ज्वल निकम, मलिक फाउंडेशनचे एजाज अब्दुल गफ्फार मलिक व नदीम मलिक, माजी महापौर नितीन लढ्ढा, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, निजाम मुलतानी यांची उपस्थिती लाभली. रक्तसंकलनासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जीएमसी, रेड प्लस ब्लड बँक यांना बोलावण्यात आले होते. त्यांचे प्रशिक्षित कर्मचारी या शिबिराला उपस्थित होते. शिबिरार्थी रक्तदात्यांसाठी मलिक फाउंडेशनने अल्पोपाहाराची व्यवस्था केली होती.



शनिपेठेत आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदाते व मान्यवर.

### यांचीही लाभली उपस्थिती

अब्दुल करीम सालार, अशोक लाडवंजारी, युसूफ मकरा यांचीही उपस्थिती होती. सूत्रसंचालन अयाज मोहसीन, साबीर मुस्तफाबादी यांनी केले. रक्तदान चळवळ प्रवाहित ठेवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. हाजी गफ्फार मलिक यांचे चौथे पुण्यस्मरण व ऑपरेशन सिंदूर निमित्त आयोजित हे शिबिर पथदर्शी असल्याचे मान्यवर म्हणाले.

**पुढाकार** • डोनेट ब्लड अँड गिफ्ट लाइफ मोहिमेंतर्गत रक्तदान शिबिर

# रक्तदाता दिनाला १९१ दात्यांचे रक्तदान; आज डोनरचा सन्मान

प्रतिनिधी | जळगाव

दरवर्षी १४ जून रोजी जगभरातील लोक जागतिक रक्तदाता दिनानिमित्त जागरूकता निर्माण करण्यासाठी एकत्र येतात. हा दिवस रक्तदात्यांचे जीवन वाचवण्यात व आरोग्य परिणाम सुधारण्यात किती महत्त्वाची भूमिका आहे याची आठवण करून देतो. २००४ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने स्थापन केलेल्या या दिवसाचा उद्देश स्वेच्छेने रक्तदानाचे महत्त्व वाढवणे आणि या जीवनरक्षक कार्यात योगदान देणाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आहे. यानिमित्त जळगावात विविध रक्तपेढ्यांतर्फे शनिवारी रक्तदान शिबिरे घेण्यात आली. यात १९१ जणांनी रक्तदान करून नियमित रक्तदान करण्याचा संकल्प केला.

## सर्जिकल सोसायटीतर्फे करण्यात आले वृक्षारोपण

सर्जिकल सोसायटीतर्फे डोनेट ब्लड अँड गिफ्ट लाइफ मोहिमेंतर्गत डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटल व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. यात डिपार्टमेंट ऑफ सर्जरी डॉक्टर्स, रेसिडेंट डॉक्टर्स, इंटर डॉक्टर्स, विद्यार्थी व स्टाफ असे १०९ दात्यांनी रक्तदान केले. २५ रोपट्यांचे वृक्षारोपण करण्यात आले व केक कापून सर्जरी डे साजरा करण्यात आला. या वेळी जळगाव सर्जिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. दीपक पाटील, उपाध्यक्ष डॉ. [illegible] चौधरी, सचिव डॉ. स्नेहल फेगडे व पदाधिकारी उपस्थित होते. रक्तदान शिबिरात सहभागी होणाऱ्यांना प्रमाणपत्र प्रदान



रेडक्रॉस सोसायटी येथे रक्तदान करताना रक्तदाता. सोबत मान्यवर.

### रेडक्रॉसतर्फे आज कार्यक्रम

इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे शहरात दोन ठिकाणी रक्तदान शिबिर घेण्यात आले. यात ५२ पिशव्या रक्त संकलन करण्यात आले. स्टेट बँक येथे झालेल्या शिबिरात ३७ तर पोस्ट ऑफिसमध्ये झालेल्या शिबिरात १५ जणांनी रक्तदान केले. पहूर येथील शिबिरात ७१ पिशव्या रक्त संकलन करण्यात आले. रेडक्रॉस सोसायटीतर्फे रविवारी सकाळी १० वाजता होणाऱ्या कार्यक्रमात सिंगल डोनर प्लेटलेट दान करणाऱ्यांना जीवनदाता पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

### गोळवलकर केंद्र : २७ वर्षांत १३२३०० रुग्णांना दिले रक्त

माधवराव गोळवलकर स्वयंसेवी रक्तकेंद्राला शनिवारी २७ वर्षे पूर्ण झाली आहे. संस्थेचा वर्धापन दिन व रक्तदानानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४८ जणांनी रक्तदान केले. सुरुवातीपासून कोणतीही तडजोड न करता गुणवत्तापूर्ण सेवा ना नफा ना तोटा या तत्त्वावर रक्त केंद्रातर्फे दिली जात आहे. २७ वर्षांत सुमारे १३२३०० गरजू रुग्णांना रक्तपुरवठा केला आहे.



# रेडक्रॉसतर्फे सहलीत थॅलेसिमियाग्रस्त बालकांनी लुटला विविध खेळांचा आनंद

**जळगाव । प्रतिनिधी**

इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने "काही क्षण आनंदाचे" या संकल्पनेनुसार थॅलेसिमियाग्रस्त बालकांची सहल जळगाव शहरातील एडवेंचर पार्क या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. विविध प्रकारच्या अद्यावत आणि सहज सुलभ खेळता येणाऱ्या गेम्सचा या बालकांनी मनमुराद आनंद लुटला. या थॅलेसिमिया बालकांची शारीरिक क्षमता लक्षात घेता सर्व प्रकारच्या वयोगटातील मुलांसाठी अनुकूल व नवनवीन गेम असल्याने बालक आणि पालकांना ही खेळण्याचा मोह आवरता आला नाही. सर्वच थॅलेसिमिया बालकांनी या सहभाग सहलीत सहभाग नोंदवला.

उपस्थित सर्व बालक आणि त्यांच्या पालकांसाठी पाणी आणि सॉफ्ट ड्रिंकची व्यवस्था एडवेंचर पार्क यांच्या वतीने करण्यात आली होती. एडवेंचर पार्कचे संचालक श्री.महावीर व सौ.शीतल जैन, श्री. पूर्वक व सौ. ख्याती डेढीया श्री. विमल व सौ ज्योती जैन आणि श्री. देवेंद्र व सौ. नेहा व्यास यांनी या थॅलेसिमिया बालकांना काही क्षण आनंद देता यावा या उद्देश्याने कोणतेही शुल्क न घेता सर्व व्यवस्था करून दिली. या प्रसंगी रेडक्रॉसचे उपाध्यक्ष गनी मेमन, चेअरमन विनोद बियाणी, सेक्रेटरी सुभाष सांखला, रक्तकेंद्र चेअरमन डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी, धनंजय जकातदार, सहप्रशासकीय अधिकारी डॉ. राजेश सुरळकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. शंकरलाल सोनावणे, जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा व सहकारी उपस्थित होते.

दैनिक सामान्य जनतेच्या हक्काचं विचारपीठ
पोस्टल परवाना क्र.JAL/ 270/2025-2027

# पुण्य प्रताप

MAHMAR/2011/41238 जळगाव-सोमवार दि.१६ जुन २०२५ (वर्ष-१४ वे अंक-८०) पृष्ठे ४ किंमत १ रूपया
जळगाव, नवी मुंबई, रायगड, ठाणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक
Email-dailypunyapratap@gmail.com इंटरनेटआवृत्ती www.dainikpunyapratap.com

## सिंगल प्लेटलेट डोनर दाता (SDP) हा खरोखरच जीवनदाता आपण फक्त प्लेटलेट दाते नसून असंख्य गरजू रुग्णांचे जीवनदाते आहात-उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संदीप गावित



जळगाव - जागतिक रक्तदाता दिनानिमित्त इंडियन रेडक्रॉस सोसायटी रक्तकेंद्रामार्फत १० पेक्षा जास्त वेळा सिंगल डॉलर प्लेटलेट (SDP) दात्यांचा जीवनदाता या संबोधनाने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी माननीय श्री संदीप गावित यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रक्तकेंद्र चेअरमन डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी यांनी प्लेटलेटदानाची तांत्रिक प्रक्रिया सांगत प्रत्येक प्लेटलेट दाता हा रुग्णासाठी देवदूतच असतो चोवीस तास सेवेसाठी तयार असतो यासाठी यांना अभिवादन आहे अशा शब्दांत सर्व प्लेटलेट दात्यांचे कौतुक केले. रेडक्रॉस चेअरमन श्री. विनोद बियाणी यांनी रेडक्रॉसच्या सर्व सामाजिक उपक्रमांची माहिती देत जास्तीत जास्त नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. उपाध्यक्ष श्री.गनी मेमन यांनी प्लेटलेट दानाचे जे सत्कर्म आपण करत आहात, त्यासाठी तुम्हाला ईश्वरीय शक्ती प्राप्त होते. तसेच आपल्या कुटुंबाच्या सहकार्यामुळे आपण हे सेवाकार्य निरंतर करत आहात अशा भावना व्यक्त केल्या.

उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संदीप गावीत यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले कि, मी स्वतः आवश्यकतेनुसार रक्तदान केले असून या जीवनदायी कार्यात सहभाग घेता आला, यासाठी स्वतःला भाग्यवान समजतो. तुम्ही सर्व फक्त प्लेटलेट दातेच नसून असंख्य गरजू रुग्णांचे जीवनदाते आहात यासाठी उपस्थित सर्व दात्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते सर्व प्लेटलेट दात्यांचा जीवनदाता सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तसेच रेडक्रॉसमध्ये सेवा बजावत असतांना नियमित प्लेटलेट दान करणाऱ्या श्री. किरण बावस्कर, श्री. रवींद्र जाधव श्री. नरेंद्र पन्हाळे, श्री. सतीश मराठे, श्री. कामरान शेख यांचा ही सन्मान करण्यात आला. नियमित यावेळी कार्यकारिणी सदस्य सौ. पुष्पाताई भंडारी, सौ. शांताताई वाणी, डॉ. मंगला ठोंबरे, श्रीमती. उषा शर्मा, प्रशासकीय अधिकारी श्री. लक्ष्मण तिवारी, सह प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेश सुरळकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. शंकरलाल सोनवणे, लेखापाल श्री. महेश सोनगिरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार कार्यकारिणी सदस्य डॉ. नरेंद्र ठाकूर यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी सौ. उज्वला वर्मा यांनी केले.

श्री. अयाज मोहसीन, श्री. जितेंद्र बडगुजर, श्री. वसिम रानानी, श्री. रवींद्र जाधव, श्री. किरण बावस्कर, श्री. राजेंद्र फुलवानी, श्री. निखील सोमाणी, श्री. आशिष प्रभुदेसाई, श्री. सच्चीन्द्र मंडोरे, श्री. दीपक अग्रवाल, श्री. सागर पगारिया, श्री. गौतम कांकरिया, श्री. दिपक भट, श्री. अमेय राणे, श्री. केतन महाजन, श्री. परेश लड्डा, श्री. सुरेंद्र बाफना, श्री. मुकेश बारी, श्री. अमित वायकोळे, श्री. किरण सांगोरे, श्री. हर्शल दुसाने, डॉ.नितीन धांडे,

श्री. राहुल घोरपडे, श्री. ललित खडके, श्री. सुनील तापडिया, श्री. अजय धांडे, श्री. सुनील वर्मा, श्री. संजय लढे, श्री. अमोल बढे, श्री. आकाश फडे, श्री. गोकुळ बारी, श्री. शंतनू अग्रवाल, श्री. गिरीश नांदेडकर, श्री. माधव तापडिया, श्री. राजेश यावलकर, श्री. शुभम पगारिया, श्री. अमोल धांडे, श्री. सतीश मराठे, श्री. प्रतिक बियाणी, श्री. रोनक जैन, श्री. कमलेश सटाना, श्री. नरेंद्र पन्हाळे, श्री. कामरान शेख, श्री. पंकज शर्मा, श्री. मुकुंद गोसावी, श्री. सिद्धार्थ कोलते, श्री. जगदीश जाधवानी

---

# सुश्रूषा, सेवा देणाऱ्या संस्थांची उभारणी भविष्याची खरी गरज

## रेडक्रॉसच्या कार्यक्रमात सावली केअरचे संचालक किशोर देशपांडे यांचे मत

प्रतिनिधी | जळगाव

नोकरी व्यवसायानिमित्त व कुटुंब विभक्त झाल्याने वृद्ध, दिव्यांग, परावलंबित्व आलेल्या आप्तस्वकीयांची सेवा करण्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ घरात उपलब्ध नसते. त्यामुळे अशा व्यक्तींची रुग्णसेवा हा सध्या समाजा पुढील मोठा व बिकट प्रश्न आहे. या अडचणींचा विचार करत भविष्यात काळजी घेणाऱ्या संस्थांची आणि आपुलकीची जाणीव करून देणाऱ्या माणसांची गरज आहे असे मत रेडक्रॉस सुसंवाद कार्यक्रमात कोल्हापूर येथील सावली केअर सेंटरचे संचालक किशोर देशपांडे यांनी व्यक्त केले.

रेडक्रॉस सुसंवाद कार्यक्रमात सुरुवातीस जोशी बंधूंनी महाराष्ट्र गीत सादर केले. कार्यकारिणी सदस्य पुष्पा भंडारी यांनी परिचय करून दिला. या वेळी चेअरमन विनोद बियाणी, सेक्रेटरी सुभाष सांखला, डॉ. अपर्णा मकासरे, डॉ. शशिकांत गाजरे, हर्षद दोषी उपस्थित होते. प्रास्ताविकात रक्त केंद्र चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांनी केले. किशोर देशपांडे यांनी सावली अंतर्गत सुरु असलेल्या सावली सुदृढ गाव योजना, सजीव अभियान, मातुल उपक्रम, भिकारी मुक्त कोल्हापूर, हायड्रोथेरपी उपचार प्रकल्प, सावली सोशल सर्कल, कोहम, स्वावलंबन शिबिरे, माहेरवाशीण उपक्रम, स्नेहसावली शाखा विस्तार (छत्रपती संभाजीनगर, पुणे, मिरज, सांगली), गणेशोत्सव व शिवजयंती युवक वर्गात सकारात्मक व प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्याच्या संकल्पना इत्यादी उपक्रमांबाबत सविस्तर माहिती दिली. जनसंपर्क अधिकारी उज्वला वर्मा यांनी सूत्रसंचालन केले. कार्यकारिणी सदस्य धनंजय जकातदार यांनी आभार मानले. या वेळी पदाधिकारी उपस्थित होते.

### जळगावातही उपक्रम राबवण्यासाठी प्रयत्न

भविष्यात सेवाभावी नागरिकांच्या सहकार्याने रेडक्रॉसतर्फे हा उपक्रम सुरू करण्याचा निर्धार उपाध्यक्ष गनी मेमन यांनी व्यक्त केला. कार्यक्रमासाठी शांता वाणी, डॉ. मंगला ठोंबरे, डॉ. उषा शर्मा, राजकुमार वाणी, डॉ. नरेंद्र ठाकूर, रोटरी, लायन्स, आनंदाश्रम सेवा संस्थेचे डॉ. संजय सोनवणे, नवनीत पटेल, नितीन बापट यांनी सहकार्य केले.